म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध.
क्र. १६९३
१६९३



REFBK-0015198

# विहार

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग. क.
ता.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

मनोहर ग्रंथमाला प्रकाशन ३० वें

# जीवन - विहार

[ साहित्यविषयक लेखांचा संग्रह ]

लेखक

आचार्य

काका कालेलकर

अनुवादक

श्रीपाद जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0015198

किंमत २ रुपये

प्रकाशक :—
मनोहर महादेव केळकर
' मनोहर ग्रंथमाला '
टिळक रस्ता, पुणें २

[सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन]

मुद्रक :—
लक्ष्मण नारायण चापेकर
आर्यसंस्कृति मुद्रणालय
१९८/१७ सदाशिव, पुणें २

## अनुक्रमणिका


१ जीवनविहार ... ... ... १
२ साहित्याचा महिमा ... ... ... ११
३ सौंदर्याचें मर्म ... ... ... १५
४ जीवनविकासी संगठन ... ... ... १८
५ कवि आणि संत ... ... ... ३०
६ गांधीयुगाचें वैशिष्ट्य ... ... ... ३६
७ साहित्योपासना ... ... ... ४२
८ प्रेरक साहित्य ... ... ... ४५
९ साहित्याची आजची एक कसोटी ... ... ४६
१० साहित्यसेवा ... ... ४९
११ साहित्याचा उगम ... ... ... ६०
१२ पत्रकाराची दीक्षा ... ... ... ६५
१३ जुन्या शेताची नवी नांगरणी ... ... ... ७९

## आधुनिक विचारांचा ज्ञानकोश !

अर्थात्

# वाद-विवेचन-माला

संपादक — **पां. वा. गाडगीळ**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सुलभ समाजवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| २ | फॅसिझम | ,, | १-०-० |
| ३ | साम्राज्यशाही | ना. ग. गोरे | १-०-० |
| ४ | अराज्यवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ५ | लोकशाही | आचार्य जावडेकर | १-८-० |
| ६ | मार्क्सचा भौतिकवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ७ | विश्वकुटुंबवाद | ना. ग. गोरे | १-८-० |
| ८ | गांधीवाद | आचार्य जावडेकर | १-८-० |
| ९ | ईश्वरवाद | सोनोपंत दांडेकर | १-८-० |
| १० | राष्ट्रवाद | य. ह. कोल्हटकर | २-०-० |
| ११ | जडवाद | तर्कतीर्थ जोशी | १-४-० |
| १२ | हिंदुत्ववाद | ज. स. करंदीकर | २-८-० |
| १३ | मार्क्सचें कॅपिटल [सारग्रंथ] | पां. वा. गाडगीळ | १०-०-० |

हीं एकूण २६॥। रुपये किंमतीचीं पुस्तकें फक्त २३॥ रुपये मनिऑर्डरीनें पाठविल्यास आपणांस घरपोंच मिळतील. **कॅपिटल** हा १० रुपयांचा ग्रंथ सोडून राहिलेलीं १६॥। रुपये किंमतीचीं पुस्तकें फक्त १५ रुपये मनिऑर्डरीनें पाठविल्यास आपणांस घरपोंच मिळतील.

**प्रकाशकः— यशवंत गोपाळ जोशी**

६२३/१५ सदाशिव, पुणें २

कै. नरहर लक्ष्मण आठवले

तथा

पूज्य नाना

यांच्या पवित्र स्मृतीस

समर्पण

—श्रीपाद

# आमचें प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| १ | तिरंगी नवमतवाद | रु. |
| | न. चिं. केळकर | ·॥= |
| २ | विस्तवाशीं खेळ | |
| | वा. म. जोशी | १ |
| ३ | फ्रेंच राज्यक्रांति | |
| | न. चिं. केळकर | २॥ |
| ४ | हास्य-विनोद-मीमांसा | |
| | न. चिं. केळकर | ४ |
| ५ | सहारा : श्रीधर देशपांडे | १। |
| ६ | बलिदान : न. चिं. केळकर | २॥ |
| ७ | समग्र केळकर-वाङ्मय | ५० |
| ८ | चंद्रगुप्त : न. चिं. केळकर | |
| | (आवृत्ति खलास) | १ |
| ९ | राका : सौ. संजीवनी मराठे | १। |
| १० | प्रतारणा : प्रा. दांडेकर | २ |
| ११ | संसार-सोपान | |
| | सौ. गि. केळकर | १। |
| १२ | न्याहारी : वि. म. कुळकर्णी | |
| | (आवृत्ति खलास) | १ |
| १३ | वादळी वारे : प्रा केळकर | २॥ |
| १४ | इब्सेन : निरंतर | ·॥= |
| १५ | उन्माद | |
| | प्रो. ना. सी. फडके | ३ |
| १६ | बीजांकुर | |
| | शांताराम आठवले | १। |
| १७ | दुसरी सांवली | रु. |
| | श्री बोकील | २॥ |
| १८ | कागदी विमानें | |
| | र. गो. सरदेसाई | १। |
| १९ | बोकीलांच्या गोष्टी | १। |
| २० | गुप्त प्रायश्चित्त | |
| | प्रो. ना. सी. फडके | ३ |
| २१ | प्रदक्षिणा : गेल्या शतकांतील वाङ्मयसमालोचन | २॥ |
| २२ | संस्कृति-संगम | |
| | प्रा. केळकर | ५ |
| २३ | चंपी आणि मोत्या | १॥ |
| २४ | सायंतारा : श्रीधर देशपांडे | ३ |
| २५ | वेदप्रकाश | |
| | म. म. पाठकशास्त्री | १० |
| २६ | लयलूट : अनुवादित कथांचा प्रातिनिधिक संग्रह | ३ |
| २७ | Hindu-Pad-Padashahi (English) | |
| | Bar. V. D. Savarkar | 5 |
| २८ | पालापाचोळा | |
| | न. चिं. केळकर | १॥ |
| २९ | विसर्जन | |
| | वि. म. कुलकर्णी | ·॥। |

**मनोहर ग्रंथमाला, टिळक रोड, पुणें २**

# जीवन - विहार

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. १७६५-८१२
ता. २/...
ठाणे.

# जीवनविहार

क्र. १५१९८

## जीवनविहार : : १ :

जुन्या काळीं वेदान्ताची चर्चा आणि मीमांसा जितकी चालत होती त्यापेक्षां आज साहित्यचर्चा कांहीं कमी चालत नाहीं. साहित्याचें तंत्र अत्यंत सूक्ष्म आणि क्लिष्ट झालें आहे. या तंत्राप्रमाणें लिहिणें ही कांहीं साधीसुधी गोष्ट नाहीं. या तंत्राच्या अरेरावीला कंटाळून बिचारा भवभूति बोलून गेला कीं—

**सर्वथा व्यवहर्तव्यं कुतो ह्यवचनीयता ।**
**यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः ॥**

पण आद्य साहित्यकारासमोर कोणतें तंत्र होतें ? प्रत्येक देशांतील आणि समाजांतील आद्य साहित्यकार न कळतच साहित्यकार झाला असेल. कारण साहित्य ही पूर्ण नैसर्गिक प्रवृत्ति आहे. अवलोकन, निरीक्षण, विचार, कल्पना किंवा भावना जेव्हां उत्कट बनतात तेव्हां माणसाकडून बोललें जातें. आणि उत्कटतेचा असा स्वभावच आहे कीं, तिच्या भाषेंत कांहीं तरी असाधारणपणा, कांहीं तरी आकर्षण, कांहीं तरी चमत्कृति हीं याव-याचींच. उत्कटतेमध्यें स्वाभाविक सौंदर्य प्रकट झाल्यावांचून राहतच नाहीं. ही शोभा प्रथम तर आपोआपच अवतीर्ण होते. नंतर ही शोभाच लक्ष वेधून घेते आणि कौतुकाचा विषय होऊन बसते. यामधून हळूहळू साहित्याचें तंत्र रचलें जातें. प्रथम प्रथम 'लोकसाहित्या'चीच निर्मिति होते. त्यामधून हळूहळू प्रयत्नपूर्वक शोभा आणतां आणतां 'शिष्ट साहित्य' तयार होऊं लागतें. लोकसाहित्यांत दोन लक्षणें नेहमीं दिसून येतात. साहित्यशास्त्र व धर्मशास्त्र यांच्या कृत्रिम आणि निश्चित बंधनांत तें सांपडत नाहीं. सामान्य जनसमाजाची स्वतंत्र प्रवृत्ति आणि स्वयंभू प्रेरणा यांना जोंपर्यंत साहित्य वश होत असतें तोंपर्यंतच तें लोकसाहित्य राहतें. सदाचार आणि सदभिरुचि यांच्या मर्यादा स्वाभाविकपणेंच त्यांत जितक्या सांभाळल्या जातात तेवढ्यावरच तें संतोष मानतें. प्रयत्नपूर्वक मर्यादा तयार करून आग्रहानें त्यांचें पालन करूं गेल्यास लोकसाहित्याचें लौकिकत्व नष्ट होतें.

लोकसाहित्याचें भरपूर पीक आल्यानंतर तें चाळून पाखडून घेण्याची माणसाला इच्छा ही व्हावयाचीच. आणि त्यांतूनच शिष्ट समाजाचें साहित्य वाढावयाचें.

लोकसाहित्याचा ताजेपणा माझ्यांत असो किंवा नसो आणि शिष्ट साहित्याचा प्रभाव मजवर पडलेला असो किंवा नसो, पण मी स्वतःला स्वाभाविक लेखकांच्या वर्गांतच बसवितों. अनुभव आणि चिंतन यांच्या द्वारें जें कांहीं सुचेल आणि जसें कांहीं सुचेल तेंच त्या त्या वेळीं लिहून टाकण्याचें मीं पसंत केलें आहे. प्रयत्नपूर्वक साहित्यसेवा अशी माझ्या हातून झालीच नाहीं. शिष्ट समाजांत वावरत असूनहि मी शिष्ट समाजाचा

होऊं शकलों नाहीं. जसा ओबडधोबड होतों तसाच्या तसाच राहिलों आहें. मला याचें दुःख नाहीं. कारण त्यामुळेंच मी आपलें व्यक्तित्व— मग तें कितीहि स्वल्प का असेना— सांभाळूं शकलों आहें. ओबडधोबड मनुष्याला सामाजिक व्यवहारांत पदोपदीं कटु अनुभव येतातच. अशा अनुभवांनीं मजवर दोन परिणाम केले. एक म्हणजे मी समाजाला कंटाळून निसर्गाच्या मांडीवर पहुडलों आणि दुसरा म्हणजे अंतर्मुख झालों. प्रथम प्रथम दोन्ही वृत्ति साहित्यनिर्मिति करूं देत नसत. यामुळें— म्हणजे कांहीं संयमाच्या उद्देशानें नव्हे तर आत्मअविश्वास, लज्जा आणि मुग्ध भाव यांमुळें मी साहित्यापासून दूरच राहिलों. विद्याध्ययनाच्या काळांत जें कांहीं वाचावें लागलें आणि जें थोडें आपल्या असाधारण आकर्षणामुळें नजरेंत भरलें तेवढेंच मीं वाचलें. आपली साहित्यिक शक्ति वाढविण्याची जी मूल्यवान् संधि होती तिचा फायदा मीं घेतला नाहीं.

माझ्यांत जर कांहीं थोडी साहित्यशक्ति उत्पन्न झाली असेल तर ती आपले विचार आणि अनुभव व्यक्त करण्याच्या उत्कटतेमधूनच. आणि ती स्वाभाविकपणें संभाषणांतच परिणत झाली. जर त्या वेळीं मला वासरी (डायरी) लिहिण्याची संवय असती तर खूप छान झालें असतें. माझ्या एका शिक्षकांना अशी वासरी ठेवतांना मीं पाहिलें आहे. त्यांची वासरी वाचण्याची आम्हांला मोकळीक असे पण तिचा आस्वाद घेण्याइतकी आमची शक्ति नव्हती. कारण ते आपली वासरी इंग्रजींत लिहीत. ती जर त्यांनीं मराठींत लिहिली असती तर माझ्यासारख्या कित्येक मुग्ध बालकांचा असाधारण फायदा झाला असता.

एवढें मात्र खरें कीं पत्रें आणि वासरी हेंच सामान्य जनसमाजाचें साहित्य होय. माझ्या दृष्टीनें तेंच उच्च कोटीचें साहित्य. दुसऱ्याला जें सांगण्यासारखें असेल तेंच आपण पत्रांत लिहितों आणि आपल्या जीवनांपैकीं जें कांहीं नोंदून ठेवण्यासारखें असेल म्हणजे ज्यांत कांहीं तरी वैशिष्ट्य असेल तेंच वासरीच्या पानांवर उतरावयाचें. अशा उत्कृष्ट चाळणींतून चाळलें गेलेलें लिखाण साहित्याच्या दर्जास जाऊन पोहोंचेल यांत आश्चर्य तें काय? साहित्यकार खुशाल म्हणोत कीं 'नाटकान्तं कवित्वम्.' मी

त्यांच्या विधानाला विरोध करीत नाहीं. सर्व प्रकारची विविधता आणि आकर्षकता नाटकांत स्वाभाविकपणेंच एकत्र होत असते. तरी पण मी म्हणेन कीं, पत्रमूलं वासरीमूलं च साहित्यम्. दोहोंमध्यें वास्तविकतेचा मोठ्यांत मोठा आधार असतो. आजकालच्या कृत्रिम युगांत पत्रें आणि वासरी दोन्ही कृत्रिम रीतीनेंदेखील लिहिलीं जातात. त्याचा विचार मीं येथें कशाला करूं? जगांतील कोणती वस्तु विकृत होत नाहीं? संभाषण आणि मनन हे जसे उत्कट व्यापार आहेत, त्याप्रमाणेंच पत्रें आणि वासरी या दोहोंचें लेखनहि उत्कट व्यापार आहे.

* * *

आमच्या लहानपणीं साहित्य तोंडपाठ करण्याचा रिवाज खूप होता. शाळेंत आणि घरीं मुलांकडून पुष्कळ तोंडपाठ करविलें जाई. पण आमच्या प्राथमिक शाळेंत उच्च अभिरुचीनें पसन्ती करणारें कोणी नव्हतें. आणि घरीं बाळबोध व सकामभक्तीनें संग्रहित केलेलें साहित्य पाठ करण्याचा रिवाज असे. संध्याकाळीं पुराणकारांचें पुराण ऐकण्यास बसावें आणि रात्रीं हरिदासांच्या संगीतमिश्रित हरिकीर्तनाची मजा लुटण्यास जावें तेव्हांच साहित्यरसिकतेचा अखंड आस्वाद मिळावयाचा. त्यांतहि अर्थालंकाराऐवजीं शब्दालंकार आणि श्लेष यांवरच आमचे हे साहित्याचार्य जास्त भर देत.

घरामध्यें सर्वांत वडील बंधु संस्कृतचे रसिक होते. लहानपणीं त्यांना शिकविण्यासाठीं एक शास्त्रीबुवा ठेवले होते. वडील बंधु कधीं कधीं संस्कृत-मधून चांगले चांगले उतारे वाचून दाखवीत आणि येरझाऱ्या घालतां घालतां पाठ केलेले श्लोक गुणगुणत. अर्थ जरी समजत नसला तरी पण अशा प्रकारें संस्कृतवाणीच्या ध्वनीविषयीं माझ्या मनांत लहानपणींच आदर आणि प्रेम हीं जाग्रत झालीं होतीं. ज्यांचा अर्थ मी समजूं शकलों असे दोन उतारे अजूनहि मला आठवतात. एक होता सावित्रीआख्याना-चा आणि दुसरा होता शांकरभाष्याच्या एका सोप्या भागाचा.

एकीकडे आईच्या तोंडून ऐकलेलीं पौराणिक लोकगीतें आणि दुसरी-कडे संस्कृत सुभाषितें व या दोहोंमध्यें पुराणकारांनीं टाकलेली भर ही माझी लहानपणींची शिदोरी. नंतर गोडी लागली पांडवप्रताप, शिव-

लीलामृत, संतलीलामृत, भक्तिविजय, हरिविजय इत्यादि मराठी काव्यग्रंथ वाचण्याची व नवनीतांतील मराठी कवींचीं गीतें गाण्याची. या जुन्या मराठी साहित्यामुळें माझी शब्दसंपत्ति वाढली आणि संस्कृत शिकण्याची पूर्वतयारी झाली.

संस्कृतशैली कीं लोकशैली हा झगडा आजकाल प्रत्येक प्रांतांत चाललेला आहे. युरोपमधून आपण हा झगडा उसना घेतला आहे. लोकभाषा, लोकसाहित्य आणि त्यांतील मूळचे शब्द यांची मला कदर आहे. त्यांचा उद्धार झाल्याशिवाय लोकजागृति व लोकशिक्षण शक्य होणार नाहीं असेंहि मला वाटतें. तरी पण जे लोक असें म्हणतात कीं, संस्कृतचें जूं झुगारून द्या आणि फक्त लोकभाषेमधूनच प्रेरणा मिळवा त्यांच्याशीं मी सहमत होऊं शकत नाहीं. संस्कृत भाषा ही वाटेल तितकी कठीण असेल, तिचें व्याकरण वाटेल तितकें क्लिष्ट असेल, पण तरीहि ती आपली भाषा आहे, आपण बनविलेली आहे. तिच्यामध्यें आपल्या लोकांचा स्वभाव आणि त्यांची मानसिक घडण हीं प्रतिबिंबित झालीं आहेत. तिच्या पोषणामार्फतच आपण संस्कृतिपुष्ट होणार आहोंत. इंग्रजांना ग्रीक किंवा लॅटिन जशा परक्या भाषा आहेत तशी संस्कृत कांहीं आपल्याला परकी नाहीं. संस्कृतचें पोषण जर आपण सोडून दिलें तर सर्व प्रकारें आपण क्षीण होऊन जाऊं. आपली सांस्कृतिक एकता व सांस्कृतिक समृद्धि यांमध्यें संस्कृतचा वांटा सर्वांत मोठा आहे. विशाल संस्कृत साहित्याचें मंथन करून त्यांतील चौदाच नव्हेत तर चौदा हजार रत्नें आपण आपल्या देशी भाषेंत आणलीं पाहिजेत आणि या वारशाचा सुगंध आपल्या एकूण एक लिखाणांमधून दरवळला पाहिजे.

साहित्याची उत्तम तयारी, साहित्यविवेचनामधून नव्हे तर, सर्वश्रेष्ठ साहित्याच्या खोल अभ्यासांतून होऊं शकते. साहित्यविवेचन हें योग्य प्रमाणांत व खूप उशीरां आलें पाहिजे. नाहीं तर अभिप्राय आणि अभिरुचि हीं अकालीं परिपक्व होतात. आणि साहित्याची निर्मिति ही तर विवेचनामधून झाली पाहिजे. साहित्यासाठीं जबर्दस्त सिसृक्षा आणि दुसऱ्यांशीं खोलवर विचारविनिमय करण्याची आतुरता हीच मुख्य प्रेरणा होऊं शकते. आईचें

आपल्या मुलांवरील प्रेम, पतिपत्नींचा एकमेकांविषयींचा अनुराग आणि गुरु-शिष्यांमधील भक्तिवात्सल्य या भावना जितक्या उत्कट असतात, तितकीच साहित्यसिसृक्षा हींदेखील एक उत्कट आणि अदम्य वृत्ति आहे. ही सिसृक्षा जर शुभपरिणामी नसेल तर तिला पिसाळलेल्या वृत्तीचीच उपमा द्यावी लागेल. साहित्य आज जितकें स्वस्त झालें आहे आणि अविचारानें बिघडविण्यांत आलें आहे तितकें जर तें बिघडविलें गेलें नसतें तर साहित्यानें फार मोठे परिणाम करून दाखविले असते. शुभंकर साहित्य ही आत्म्याची अमृतकला आहे, कारण ती चैतन्याची प्रेरणा आहे.

साहित्याची सिसृक्षा आणि त्याचा फक्त आस्वाद घेण्याची रसिकता या गोष्टी अगदीं भिन्न भिन्न आहेत. केवळ रसिकतेमधून सिसृक्षा उत्पन्न होईलच असें म्हणतां येणार नाहीं. सिसृक्षा ही स्वतंत्र प्रेरणा आहे. साहित्याच्या सिसृक्षेत सगळ्या सिसृक्षांचीं लक्षणें दिसून येतात. बालविवाह जसा वाईट तसें कोवळ्या वयांत उतावळेपणानें केलेलें साहित्य-सर्जनहि वाईट. दोन्ही ठिकाणीं पूर्णपणें वयांत येईपर्यंतचें ब्रह्मचर्य म्हणजे वीर्यरक्षण आवश्यक आहे. आणि या दोहोंमध्यें तुलना करावयाचीच असेल, तारतम्य नक्की करावयाचें असेल, तर 'वीर्यपातापेक्षां वाक्पात हा अधिक भयंकर असतो' हें जुनें वचन नव्या अर्थानें साहित्यालादेखील लागू करतां येईल. साहित्यासारख्या मंगल गोष्टींत मर्यादा कशी घालावयाची हें सांगणें कठीण आहे. तरी पण अतिसेवन हें नडल्याशिवाय राहत नाहीं एवढें तरी समजलेंच पाहिजे. अतिसेवनानें एखादे वेळीं संस्कारितेची ओप येऊं शकेल पण तेज मात्र मुळींच येणार नाहीं.

कित्येक साहित्यवीर अखंड निर्मिति करीत असलेले आपल्याला दिसतात. हा अखंड साहित्यसृष्टीचा अधिकार जीवनवीरांना आणि जीवन्त मिशनऱ्यांनाच आहे.

* * *

विद्याध्ययनकाळीं माझ्यावर मराठी, संस्कृत आणि इंग्रजी या साहित्यांतील उत्कृष्ट ग्रंथांचा परिणाम झाला. रवीन्द्रनाथ ठाकुरांचें साहित्य आणि गांधीसाहित्य हीं त्यानंतर आलीं. या दोन्ही राष्ट्रपुरुषांच्या विभूति वेग-

वेगळया आहेत; दोघांची साधना भिन्न भिन्न आहे; पण दोघांचें दर्शन जवळ जवळ सारखेंच आहे ही गोष्ट दोघांच्या साहित्याचा खोलवर विचार केल्यावर स्पष्ट झाल्याशिवाय राहत नाहीं. आधुनिक लोकांपैकीं भांडारकर, रानडे, स्वामी विवेकानन्द, भगिनी निवेदिता, लाला हरदयाळ, आनन्द-कुमार स्वामी, बाबू बिपिनचन्द्र पाल, अरविन्द घोष, रवीन्द्रनाथ ठाकुर आणि गांधीजी यांचा प्रभाव मजवर जास्तींत जास्त आहे असें मी समजतों. आश्चर्य हें कीं लोकमान्यांचा भक्त असूनहि व त्यांच्या चळवळींत भाग घेऊनहि त्यांच्या साहित्याचा मजवर फारच थोडा प्रभाव पडला आहे. त्यांत कांहीं तरी असें आहे कीं ज्यामुळें मी त्यांचें साहित्य पचवूं शकलों नाहीं. इंग्रजी साहित्याविषयीं येथें कांहीं लिहिण्याची इच्छा नाहीं. मी एवढेंच म्हणूं शकेन कीं, जरी मी इंग्रजी साहित्याचें सेवन फारच थोडें करूं शकलों आहें तरी त्या साहित्याविषयीं माझ्या मनांत गाढ आदर आहे.

कवि असोत किंवा गद्यलेखक असोत, त्यांना जीवनाचें खोल अध्ययन अथवा दर्शन झालें पाहिजे. आणि आजकाल तर साहित्यकाराचें मानस-शास्त्र, समाजशास्त्र, भौतिकविज्ञान आणि धर्मशास्त्र यांचें विस्तृत अध्य-यन असलें पाहिजे. या आदर्शापर्यंत जे पोहोंचले आहेत त्यांचें साहित्यच समाजावर खोलवर परिणाम करूं शकतें. विवेकानन्द, निवेदिता, रवीन्द्र-नाथ आणि गांधीजी मजवर जे इतका परिणाम करूं शकले त्याचें कारण हेंच होय. त्यांच्या साहित्यानें मला जीवनामध्यें प्रेरणा दिली, हृदयाला समाधान दिलें आणि त्यानें उज्ज्वल भविष्याचें ओझरतें दर्शन घडविलें.

इतिहासकारांचाहि मजवर खूप प्रभाव पडावयास हवा होता. पण जसे इति-हास मला हवे आहेत तसे इतिहास अजून माझ्या पाहण्यांत आलेले नाहींत. माझ्या दृष्टीनें जे त्रिकालज्ञ आहेत तेच यथातथ्य इतिहास लिहूं शकतात.

*　　　*　　　*

मला वाटतें आपल्या देशासाठीं रामायण आणि महाभारत हें अत्यंत पौष्टिक खाद्य आहे. दोन्ही वेगवेगळया वस्तु आहेत. फक्त रामायणानें चालणार नाहीं; एकट्या महाभारतानें गरज भागणार नाहीं. हीं दोन्ही संक्षेपानेंहि वाचून चालणार नाहींत; हीं सर्वच्या सर्वच वाचलीं पाहिजेत.

त्यांच्याबरोबर उपनिषदें, योगसूत्र आणि मनुस्मृति एवढे ग्रंथ वाचले कीं आपली पुष्कळ तयारी झाली. त्यांतहि गीता वाचल्यानंतरच उपनिषदांचें अध्ययन झालें पाहिजे. अमेरिकन लोकांच्या दृष्टीनें जें स्थान कोलंबसाचें आहे, तेंच स्थान आपल्या संस्कृतींत उपनिषदांतील आत्मवीरांचें आहे. आपल्या साहित्यापैकीं उपनिषदाच्या कंडिका आणि पाली भाषेंतील बौद्ध संवाद हेंच सर्व प्रकारें आपलें मूलधन म्हटलें जातें. यांच्यामध्येंच आपल्याला आपल्या संस्कृतीची गंगोत्री सांपडते. तिच्यांतून प्राप्त होणारें जीवन-दर्शन अद्यतन करण्यासाठीं भौतिकशास्त्रें, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र यांची त्यांत भर घातली पाहिजे.

आणि साहित्याचा विचार करतां मला असें वाटतें कीं, संस्कृत साहित्या-बरोबर इराणांतील फारशी साहित्य, प्राचीन युरोपांतील ग्रीक साहित्य आणि पूर्वेकडील आपल्याला जवळ जवळ अज्ञात असलेलें चिनी साहित्य या सर्व साहित्यांचा खोल अभ्यास झाला पाहिजे. प्राचीन संस्कृतीच्या अध्ययना-शिवाय आधुनिक काळाचीं मुळें किती आणि कसलीं आहेत आणि त्यांचे पल्लव कुठपर्यंत पोहोंचण्यासारखे आहेत याचा थांग लागणार नाहीं. आपल्या-कडे इंग्रजी साहित्याचें अध्ययन होत असतें तितकेंच जर्मन साहित्याचेंहि अध्ययन होणें आवश्यक आहे. तरी पण त्या बाबतींत आपण अजून बेदर-कार राहिलों आहोंत. युनिव्हर्सिटया आपल्या पाठ्यक्रमाच्या द्वारें जितकें भरवितात तेवढेंच खाऊन स्वस्थ बसण्याची आपली शिशुवृत्ति अजून गेलेली नाहीं. आणि जितकें खाल्लें जात आहे तेवढ्याचा फायदा आपल्या भाषेला देण्याचें कर्तव्यहि फारच थोडे विद्वान् बजावीत असतात.

एक लहानसा प्रसंग मला खूप महत्त्वाचा वाटला आहे. मुंबई सरकारनें एकदा मुंबई युनिव्हर्सिटीकडे विचारणा केली कीं, संस्कृतच्या अध्ययनासाठीं जर आम्हीं कॉलेज उघडलें तर त्यांतील विद्यार्थ्यांना युनि-व्हर्सिटीच्या पदव्या देण्यास तुम्ही तयार आहांत काय? त्या वेळीं युनि-व्हर्सिटींत जो विचारविनिमय झाला त्यांत आमच्या प्रिन्सिपल परांजप्यांनीं असा अभिप्राय दिला कीं, संस्कृतबरोबर निदान प्रीव्हियसइतकें तरी इंग्रजीचें ज्ञान असेल तरच आम्ही पदवी देण्याचा विचार करूं. आणि

मराठी ग्रंथ संग्रहालय

त्यांतहि त्यांनीं जोर देऊन असें सांगितलें कीं, 'संस्कृत शिकल्यानंतर जर ते इंग्रजी शिकणार असतील तर तें चालणार नाहीं. इंग्रजी विद्येचे संस्कार मनावर झाल्यावर जर ते संस्कृत शिकतील तर आमची कांहीं हरकत नाहीं'. त्यांचा विचार उफराटा होता पण आग्रह सकारण होता. आपल्याकडे शिक्षणाच्या गर्भाधानांतच इंग्रजी संस्कार घालून आपण आपली विद्या निःसत्त्व आणि हीनश्रद्ध बनविली आहे. जर विद्यासंस्काराचा प्रारंभ स्वकीय भाषा आणि स्वकीय संस्कृति यांमधूनच करण्यांत आला नाहीं तर आपल्याला कोणत्याहि प्रकारची आशा नाहीं. जे लोक बाटतात तेवढेच फक्त परधर्मांत जातात असें कांहीं नाहीं. स्वधर्म आणि स्वभाषा यांच्या संस्कारांपासून जर बाल्यकाळ वंचित राहिला तर त्यासारखी दुसरी हानि एकहि नाहीं.

आपल्या घडणावळींत प्रथम स्वभाषा आणि तिचें साहित्य यांना स्थान असलें पाहिजे आणि त्याबरोबरच व त्याच्या द्वारेंच संस्कृतचे संस्कारहि मिळाले पाहिजेत. त्यानंतर राष्ट्रभाषेचें स्थान. हिच्या द्वारें संस्कृत आणि फारशी या दोन्ही साहित्यांचें पुरेपूर बळ आपल्याला मिळालें पाहिजे. इतक्या तयारीनंतर आपण जरी वाटेल ती भाषा व तिचें साहित्य घेतलें तरी तें पोषकच व्हावयाचें.

जिथें भारतवर्षाची साधना सर्वसमन्वयी आहे तिथें आपल्या युनिव्हर्सिट्यांनीं मात्र जवळ जवळ अशी व्यवस्था केली आहे कीं, जो संस्कृत शिकेल त्याला फारशी शिकतांच यावयाचें नाहीं आणि जे फारशी शिकतील त्यांनीं संस्कृतपासून विमुखच राहिलें पाहिजे. केवळ हिंदीच्या द्वारेंच आपण गंगा-यमुनेसारख्या या सुर-असुरांच्या संस्कृतींचा मेळ घालूं शकतों. ज्यांना साहित्याचे संस्कार सर्वांगसुंदर बनवावयाचे आहेत त्यांनीं संस्कृत आणि फारशी या दोन्ही साहित्यांतील उत्कृष्ट ग्रंथांचे अनुवाद हिन्दींत करविले पाहिजेत आणि ते दोन्ही (देवनागरी व फारशी) लिपींमधून उपलब्ध होतील अशी व्यवस्था केली पाहिजे. या दोहोंचें जेव्हां एकत्र सेवन होईल तेव्हां आपल्या साहित्यसर्जनामध्यें एक नवेंच तेज येईल.

* * *

जेव्हां माझे शिक्षणविषयक प्रयोग चालू होते आणि साहित्यामार्फत शिक्षण देण्याविषयींची श्रद्धा जेव्हां कमी झाली होती अशा वेळीं मीं हें सर्व लिखाण लिहिलें आहे. यांतील कांहीं मनोविनोदासाठीं लिहिलेलें आहे, कांहीं आग्रहाला बळी पडून लिहिलेलें आहे, कांहीं प्रसंगपरत्वें लिहिलेलें आहे, यामुळें यांत अनायासें येऊं शकणारें असें विस्कळलेलें चिन्तन विणलेलें आहे. गेल्या वीस वर्षांत साहित्यिक प्रवृत्तीविषयीं मी उदासीनच राहिलों आहें. शिक्षणाच्या कार्यांतून मिळविलेल्या फुरसतींतून हें सर्व लिहिलें गेलें आहे. शाळेंतून पळून जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भटकंतीसारखा हा एक स्वच्छन्द विहार म्हणतां येईल.

आधुनिक साहित्यकारांमध्यें प्राचीन लेखकांपेक्षां वरचढ कोणी नाहीं असें कांहीं लोक म्हणतात. मी त्यांच्याशीं सहमत नाहीं. सत्ययुग हें फक्त भूतकाळांतच होतें अशा प्रकारची समजूत बाळगल्यामुळें अशी विपरीत मनोदशा दिसून येते. आधुनिक साहित्यिकांमधूनहि कित्येक लोक भव्य साहित्य निर्माण करूं शकले आहेत. आणि साहित्यसेवी हे जसजसे रसास्वादपरायण न होतां जीवनपरायण होत जातील तसतसा आपल्याला साहित्यांत अखंड जीवनानुभव आणि अनिरुद्ध जीवनविहार आढळून येईल.

आपलें युग पतित असलें तरी त्यांतूनच अद्‌भुतनिर्मितीचें भविष्यसूचन होऊं लागलें आहे. हिंदुस्तानचा आत्मा जागृत झाला आहे. सध्यां तो बरेवाईट सर्वच संस्कार घेत आहे. पण यथाकाळीं त्या बाबतींत त्याला विवेक करतां येईल. आपला समाज जसजसा प्रयोगवीर होईल तसतशी त्याला शुभ दृष्टि मिळूं लागेल आणि त्यांतून त्याला भारतवर्षाचें मिशन सांपडेल. अशा प्रयोगवीरांनाच स्वातंत्र्य सोसतें. प्रयोगवीरांनाच निश्चयात्मक आणि तेजस्वी साहित्य स्फुरतें. प्रयोगवीरांनाच भूतकाळाचें ओझें हलकें वाटतें, आणि भविष्यकाळ भयानक भासण्याऐवजीं आकर्षक व उज्ज्वळ दिसूं लागतो. प्रयोगवीरच मौलिक साहित्य निर्माण करूं शकतात आणि त्याच्या द्वारें सर्वोदय साधूं शकतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

## साहित्याचा महिमा : : २ :

या विशाल विश्वांत आपल्याला जीवनाहून अधिक श्रेष्ठ अशी दुसरी कोणतीहि वस्तु नाहीं. आपण जें कांहीं पाहतों किंवा ऐकतों तें सर्व जीवनाच्या क्षेत्रांत येतेंच. कल्पनासृष्टि आणि आदर्शसृष्टि हींहि जीवन-जगताचीं दोन खंडेंच होत; आणि अज्ञात असें जें अनंत तें म्हणजे जीवनजगताचें क्षितिज होय.

आणि मरणाला काय आपण जीवनक्षेत्राच्या बाहेरील समजणार आहोंत? नाहीं, मुळींच नाहीं. मरणसुद्धां जीवनाचीच एक उत्कृष्ट विभूति आहे. जीवनांत जें कांहीं अपूर्ण राहून जाईल तें मरणांत पूर्ण आणि कृतार्थ होऊन जातें. मरणाविषयीं आपण असें अवश्य म्हणूं शकतों कीं "येथें नाहीं झाली कोणाची निरास । आल्या याचकास कृपेविषीं" येथें वाटेल तो याचक येवो, त्याची कधीं निराशा झालेली माहीत नाहीं– सर्वांवर त्याची सारखीच मर्जी असते.

दिवस आणि रात्र मिळून ज्याप्रमाणें पूर्ण दिवस होतो त्याचप्रमाणें

जीवन आणि मरण हीं दोन्ही मिळून संपूर्ण जीवन होतें. दिवसा सर्वत्र पांढरा अंधार पसरलेला असतो आणि म्हणून आपण केवळ एक सूर्य आणि एक पृथ्वी एवढेंच पाहूं शकतों. रात्रीं निर्मळ काळा प्रकाश सगळीकडे पसरतो यामुळें आकाश खुलें झालेलें दिसतें, मोकळें वाटतें, आणि म्हणून आपण अनेक पृथ्व्या व अनंत सूर्य पाहूं शकतों. रात्रीचें वैभव दिवसाच्या वैभवापेक्षां अनेक पटींनीं जास्त असतें आणि म्हणूनच अनंत सूर्यांचें दर्शन होत असूनहि कुणाचाहि ताप आपल्याला सहन करावा लागत नाहीं. अनंत कोटि सूर्य एकत्र तळपत असतात तरीहि ते आपल्याला फक्त शांतीच अर्पण करतात.

* * *

ज्याप्रमाणें मनुष्य बाळपणीं शाळेंत अनेक पाठ शिकून मोठा झाल्यावर त्याचा व्यापक जीवनांत उपयोग करतो अथवा प्रयोगशाळेंत लहान लहान प्रयोग करून नंतर लोकव्यवहारांत त्या प्रयोगांचा विस्तार करतो त्याचप्रमाणें आपण सबंध जन्मभर जें व्यक्तित्व आणि अध्यात्म प्राप्त करतों त्यालाच मरणद्वारें व्यापक आणि बृहत्तम बनवितों. म्हणूनच मरण ही जीवनाची 'सुधारून वाढविलेली आवृत्ति' आहे असें म्हटलें आहे. जीवन आणि मरण मिळून जी एक बृहत्तम वस्तु बनते तिलाच ब्रह्म म्हटलें जातें : त्याच्याबाहेर कांहीं नाहीं, त्याहून वरचढ दुसरें कांहीं नाहीं. अनंताहून श्रेष्ठ असें काय असूं शकणार ? अनंताकडे पाहण्याच्या बाजू अनंत असूं शकतात पण मूळ वस्तु तर एकमेवाद्वितीयम् च आहे.

ॐकार प्रणव ज्याप्रमाणें परब्रह्माचा वाचक आहे, त्याप्रमाणें साहित्य हें जीवनाचें– संपूर्ण जीवनाचें– वाचक होऊं शकतें. इतकी मोठी प्रतिष्ठा साहित्याची आहे. मात्र त्याची साधना अत्यंत काळजीनें योग्य प्रकारें झाली पाहिजे. ज्याप्रमाणें मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केल्यावरच तिला देवत्व प्राप्त होतें, त्याप्रमाणें साहित्यांत प्राणप्रतिष्ठा केल्यानंतरच त्याला प्रणवपूज्यता आणि वाचाशक्ति प्राप्त होते. प्राणप्रतिष्ठा करणें ही एक दैवी विद्या आहे, अमर कला आहे. ही कला, ही विद्या ज्यानें प्राप्त करून घेतली आहे असा कवि क्वचितच मिळतो. कवीचें नांव धारण करून कोंबड्याप्रमाणें छाती

काढून इकडे तिकडे भटकणारे पामर जीव मात्र अनेक आहेत! त्यांची गोष्ट सोडूनच देऊं.

प्रतिभाशाली चित्रकार निसर्गाचें सौंदर्य चित्रित करून त्याला स्थायी बनवितो. तसें पाहिलें तर निसर्गाचें सौंदर्य आपण डोळ्यांनीं बघतच असतों. त्याला चित्रबद्ध करण्याची काय जरूर? फार तर एखाद्या छायाचित्रकाराची मदत घ्यावी म्हणजे झालें. पण चित्रकाराचें कार्य याहून वेगळेंच असतें. निसर्गाचें सौंदर्य डोळ्यांनीं नव्हे तर हृदयानें कसें पहावयाचें हें तो शिकवतो. प्रत्येक सृष्टीच्या जागीं तो एक अपरसृष्टि निर्माण करतो. त्यानें निर्मिलेल्या या नवीन सृष्टीचा जीवनांत अंतर्भाव होत असूनहि ती अगदीं वेगळीच दिसूं लागते; आणि नित्याच्या अनुभवलेल्या जीवनावर कांहीं निराळाच अलौकिक प्रकाश पाडते. चित्रकाराची प्रतिभा आंतर्बाह्य विश्वाला हृदयस्रोतांत बुडवून रसस्निग्ध बनविते; आणि म्हणूनच चित्रकार रसिकांचा तीर्थरूप बनतो. इतक्या उच्च कोटीचे चित्रकार जगांत फारच थोडे होऊन गेले आहेत. नांवाचे चित्रकार तर प्रत्येक घराच्या भिंतीवर लटकत असलेले अथवा प्रत्येक प्रकाशनाच्या अंधारांत झोपलेले दिसून येतात.

खरा साहित्यकार बोध देत नाहीं, तर दृष्टि देतो. म्हणूनच शिक्षकाच्या स्थानीं न बसतांच तो गुरुस्थान प्राप्त करून घेतो. एखाद्या आंधळ्याचा हात पकडून त्याला जर आपण खोलींत घेऊन गेलों आणि खोलींतील प्रत्येक वस्तुला त्याच्या हातानें स्पर्श करवून त्याला खोलीचा परिचय करून दिला, तर तो त्या खोलींत सुखानें राहूं शकेल आणि आपला नित्य व्यवहार निभावूं शकेल. पण इतकी मानगड न करतां जर आपण त्या आंधळ्याला दृष्टि देऊं शकलों तर क्षणापूर्वींचा तो आंधळा खोलींतील सर्व वस्तूंचा स्वामी बनून जाईल. नंतर त्याला खोलींतील प्रत्येक वस्तूचा परिचय करून देण्याचें प्रयोजन राहत नाहीं. आतां तो आपल्यासारखा झाला. तो आतां आपला आश्रित नसून साथीदार झाला.

साहित्याचा महिमा हा असा आहे. साहित्य बोध देत नाहीं, दृष्टि देतें. साहित्य हें जीवनाचें उद्दीपन आहे, रहस्योद्घाटन आहे, साक्षात्करण आहे.

हे साहित्यगुरो ! परमात्मन्, तुझ्या अवतारासारखा ब्राह्मी साहित्यकार या भूतलावर धाडून दे. जग आपद्ग्रस्त झालेलें आहे. त्याला शान्ति अर्पण कर– त्याला कृतार्थ कर.



## सौंदर्याचें मर्म : : ३ :

साहित्य हें जणूं काय एक भांडेंच आहे. त्यांत ज्या प्रकारचा माल आपण भरूं पाहतों त्यावरून साहित्याची किंमत नक्की होते.

कित्येक लोक समजतात कीं साहित्याची सर्व कल्पना रूप आणि सौंदर्य यांवर रचलेली आहे. कोणताहि विचार किंवा कल्पना आकर्षक स्वरूपांत मांडली असेल, त्यांतून चमत्कृति उत्पन्न होत असेल, तर तें साहित्य होय. अत्यंत सौल्यवान् विचार किंवा अनुभव आणि आकाशापर्यंत भराऱ्या मारणारी कल्पना हीं जर रोचक स्वरूपांत मांडलीं नसतील तर त्याला आपण साहित्य म्हणूं नये; त्याला तत्त्वज्ञान म्हणा, धर्मशास्त्र म्हणा किंवा संतवाणी म्हणा, पण त्याला साहित्य कांहीं म्हणतां येणार नाहीं.

"याच्या उलट जर एखादा विचार अगदींच सामान्य असेल, कल्पना दर्पपूर्ण असेल, आदर्श हलका आणि समाजविनाशक असेल पण जर तो मनोरंजन करीत असेल आणि त्याचें रूप चित्ताकर्षक असेल तर तें उच्च कोटीचें साहित्य म्हटलें जाईल. विनोद, चित्ताकर्षण आणि रूपलावण्य हाच साहित्याचा प्राण होय."

कोणताहि वाग्व्यापार जर चित्ताकर्षक स्वरूपांत मांडला गेला नसेल तर आपण त्याला उत्कृष्ट साहित्य म्हणून ओळखीत नाहीं त्याविषयीं कांहीं शंका नाहीं; पण जर त्या साहित्यांत मांडलेला विचार हीन असेल, अनुभव उथळ असेल आणि कल्पना सडलेली असेल तर केवळ रूपावरूनच त्याला आपण उत्तम साहित्य म्हणत नाहीं.

आतां जरा रूपाचें स्वरूप तपासूं. कोणताहि तरुण किंवा तरुणी शरिरानें आणि मनानें निरोगी असेल, व्यायाम, संयम आणि प्रसन्नता यांच्या योगानें त्यानें आपलें यौवन योग्य प्रकारें संरक्षिलें असेल तर त्याच्या ठिकाणीं आपोआप एक विशिष्ट सौंदर्य येतेंच. हें सौंदर्य कांहीं साबणानें, नाना प्रकारचीं सुवासिक तेलें वापरल्यानें किंवा नव्या पद्धतीचे अनेक रंग आणि औषधें फासण्यानें येऊं शकत नाहीं. आरोग्य आणि यौवन हीं स्वभावतःच सुंदर असतात. सुंदरता आणि आकर्षकता हे त्यांचे सहज सुवास होत. पण याऐवजीं जर शरीर रोगी असेल, मन विकृत असेल, स्वभाव स्वार्थी, चिडखोर किंवा अहंकारी असेल आणि हें सर्व झांकून टाकण्यासाठीं कपड्यांची टापटीप, शिष्टाचाराचें गांभीर्य आणि हालचालींचे नखरे यांच्यामार्फत सौंदर्य आणलें असेल तर कांहीं उथळ लोक त्या डामडौलानें आकर्षित होतीलहि; पण माहीतगार लोक, स्वच्छ अभिरुचि असणारे लोक, ते सर्व प्रयास पाहून दुःखीच व्हावयाचे–त्यांच्या मनांत ग्लानीच उत्पन्न होणार.

साहित्यांतहि असेंच असतें. साहित्य हें जीवनाचें प्रतीक आहे. जीवन जर निरोगी, प्रसन्न, सेवापरायण, प्रेमपूर्ण आणि पराक्रमी असेल तर त्याचे सर्वच व्यापार आकर्षक आणि प्रभावशाली होतील. ज्या विचारांत आर्यता आहे, उदात्तता आहे, आणि सर्वमंगलकारी कल्याणाची भावना आहे त्याचें शब्दशरीर आपोआप भावगंभीर, ललित-कोमल आणि प्रसादपूर्ण व्हावयाचेंच. उच्च साहित्य सुंदर हें असतेंच; परंतु सौंदर्याचें ढोंग करण्यानें कांहीं एखादें साहित्य उच्च किंवा इष्ट होत नाहीं.

म्हणून केवळ साहित्याची उपासना न करतां जर आपण आर्य आणि प्रसन्न जीवनाची उपासना केली तर साहित्याची सुंदरता आपोआपच

प्रकट होईल. वृत्तीची आर्यता हाच विवेकाचा आत्मा होय. कोरडा विवेक हास्यास्पद होतो, किंवा कंटाळवाणा होतो. कोरडी सौंदर्योपासना यापेक्षां दुसरा कांहीं प्रभाव पाडूं शकत नाहीं.

ज्या साहित्यांत प्रगतिशील जीवनाची प्रेरणा अथवा प्रतिध्वनि असेल तें साहित्य प्रगतिशील. अशा साहित्यांत इतर कांहीं असो किंवा नसो— अनुकरण मात्र मुळींच असतां कामा नये, इतर कांहीं असो वा नसो— उद्देशाचा अभाव मात्र मुळींच असूं नये.



## जीवन-विकासी संगठन : :४:

आजकालचा कोणीहि मनुष्य घ्या. त्याला स्वाभाविकपणेंच अगदीं आंतून असें वाटत असतें कीं, आपण आतां एखाद्या नव्या जमान्याला, नव्या युगाला, नव्या जीवनक्रमाला सुरवात करीत आहोंत. भारतवर्ष एक आहे असें आपण म्हणत आलों असलों आणि आपली सांस्कृतिक एकता मुख्य मुख्य बाबतींत स्पष्टपणें दिसत असली तरीहि आजपर्यंत आपण लहानमोठ्या टोळ्यांनींच राहत आलों आहोंत हें विसरतां कामा नये. विविधतेंत एकता हें आपल्या संस्कृतीचें वैशिष्ट्य आहे. पण आपण विविधतेला अनेकधा वाढूं दिलें आणि एकता बनविण्याचें जवळ जवळ विसरूनच गेलों. त्यामुळें समाजांत बळ असूनहि आपण दुबळे ठरलों. आपणा सर्वांची राहणी, करणी व विचारसरणी एकसारखी असूनहि आपण छिन्नभिन्न होऊन गेलों.

**मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ।**

जो आपल्या जीवनांत केवळ विविधतेच्या मागें लागतो तो जीवनाच्या

एकामागून एका क्षेत्रांत मृत्यूच्या– क्षयाच्या– कैचींत सांपडतो असें आपल्या पितरांचा पिता जो यमराज त्यानें कधींच सांगून टाकलें आहे. भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंतहि सांगितलें आहे कीं "जें ज्ञान भेदभावाला पोसतें आणि विविधतेलाच ओळखतें तें ज्ञान समाजाची प्रगति थांबवितें. शिवाय कित्येक लोक वस्तूंचें तारतम्य न ओळखतां क्षुद्र एकांगी वस्तूंनाच सर्वस्व मानून अडाणीपणा करूं लागतात. असे लोक समाजाला अधिकाधिक खालीं घेऊन जातात. एकाच प्रांताला जे लोक सगळा देश मानतात, संस्कृतीच्या एखाद्या अंगालाच जीवनसर्वस्व मानूं लागतात, ते आपल्या शक्तीचा योग्य उपयोग करूं शकत नाहींत." एखाद्या गाड्याचे सर्व भाग जरी शाबूत असले तरी जर ते आपल्या जागेवरून हलले असतील किंवा ढिले पडले असतील तर तें गाडें यात्रा कशी करूं शकणार ?

एक काळ असा होता कीं जेव्हां वेदोपासना, संस्कृत विद्या, भक्तिमार्ग, विरक्ति वगैरे महान् तत्त्वांच्या जोरावर आपण सांस्कृतिक एकता स्थापन करूं शकलों. पण जसजसा युगोत्कर्ष होत जाईल तसतसें समन्वयकारी तत्त्व अधिकाधिक व्यापक होत जाणें अत्यंत आवश्यक असतें. परशुरामाच्या वेळीं ब्राह्मणसंगठन किंवा क्षत्रियसंगठन स्वाभाविक असेल, वेदकाळांत आर्यांचें संगठन महत्त्वाचें ठरलें असेल, छत्रपति शिवाजीमहाराज किंवा राणा प्रतापसिंह यांच्या काळीं हिंदुसंगठन अनिवार्य झालें असेल, पण आज मात्र भारतीय संगठन हाच एकमात्र युगधर्म आहे याविषयीं शंका घेण्याचें मुळींच कारण नाहीं.

अशा प्रकारचें संगठन वेगवेगळ्या क्षेत्रांत कधींच सुरू झालें आहे. अखिल भारतीय संस्था आणि प्रवृत्ति देशांत ठिकठिकाणीं दृष्टीस पडतात. शिक्षण आणि साहित्याच्या बाबतींत मात्र प्रत्येक प्रांत एकलकोंडा बनून आपल्या स्वतःपुरताच विचार करीत आला आहे. आधुनिक संस्कृतीचे ब्राह्मण म्हणजे इंग्रज लोक व त्यांची सत्ता या बाह्य कारणामुळें जी एकता आपणा सर्वांवर लादण्यांत आली आहे तें एखादें प्राणदायी तत्त्व आहे असें कांहीं म्हणतां येणार नाहीं.

प्रांतवार शिक्षणाची वेगवेगळी व्यवस्था झाली; सरकारी विद्यापीठें

स्थापण्यांत आलीं. या युनिव्हर्सिट्यांनीं एतद्देशीय व प्रांतिक जीवनाला नी संस्कृतीला किती प्राधान्य दिलें हें तर प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांपुढेंच आहे. यापुढें अखिल भारताचें शिक्षण एका तंत्राखालीं आणण्याचे सरकारचे प्रयत्न चालू आहेत. सरकारला जरी यांत यश आलें, तरी पण त्यामुळें समाजहृदय एक होईल कीं नाहीं याची शंकाच आहे. बाहेरून स्थापण्यांत आलेली एकता ही समाजाला काय धृति देऊं शकणार?

साहित्याच्या बाबतींत आपल्या येथें संगठन असें कांहींच नाहीं असें म्हटल्यास तें चुकीचें होणार नाहीं. साहित्याला एकाच दावणीला बांधणें किंवा एकच वेसण घालणें सोपें नाहीं. साहित्याच्या तोंडांत बोळा कोंबणें सोपें असतें पण प्रौढ साहित्याला वेसणीचें नांवच सहन होत नाहीं. कोणत्याहि क्षेत्राच्या बाल्यावस्थेंतच त्याच्यावर परकीय अंकुश टिकूं शकतो.

साहित्यांत किती शक्ति आहे याची अधिकाधिक प्रतीति मनुष्यजातीला होत चालली आहे. साहित्य हें एक प्रकारचें चैतन्य आहे, सामाजिक तेज आहे; मनुष्यसंकल्पाची अमोघ शक्ति आहे. या शक्तीच्या सहायानें मनुष्य वाटेल तो बरावाईट परिणाम नक्की घडवून आणूं शकतो. पण ही दुधारी तलवार आहे. हें एक रसायन असल्यामुळें जो हें जिरवील त्याला तें अजरामर बनवील; पण जर याचा दुरुपयोग झाला तर तें समूळ उच्छेद केल्याशिवाय राहणार नाहीं. असा एक काळ होता कीं जेव्हां लोक साहित्याचा मोक्षसाधनार्थ उपयोग करीत. पुढें पुढें सत्ताधारी आणि पैसेवाल्या लोकांच्या मनोविनोदासाठीं साहित्याचा उपयोग होऊं लागला. या काळाविषयीं हद्दपार झालेला एक जर्मन यहुदी लेखक म्हणतोः—

"हा काळ साहित्यकलेला किंवा साहित्यकारांना अत्यंत आणीबाणीचा होता. साहित्यकार म्हणजे आपल्याजवळ ठेवण्यास योग्य असा एक गुणीजन अशी कल्पना समाजांत रूढ झाली होती. त्याचा प्रत्यक्ष जीवनाशीं कांहींच संबंध असावयाचा नाहीं. साहित्यकार क्रुद्ध झाला काय किंवा संतुष्ट झाला काय दोन्ही गोष्टी सारख्याच. त्याचीं शस्त्रास्त्रें हीं आपटबारासारखीं असावयाचीं. साहित्य हें विनोदाचें एक उत्कृष्ट साधन समजलें जाई, याहून अधिक प्रतिष्ठा त्याला नव्हती.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५१९८



"आणि साहित्यकारहि एक गोष्ट विसरला. ती म्हणजे फक्त शब्द-कौशल्य किंवा कल्पनावैभव एवढ्याच वस्तु त्याच्या धंद्यासाठीं पुरेशा नाहींत तर त्यासाठीं चारित्र्याचीदेखील आवश्यकता असते. साहित्य-कलाधर हें विसरला कीं त्या त्या वेळीं लोकांची जी अभिरुचि रूढ होऊन गेली असेल तिला पोसणें किंवा तिची खिदमत करणें हा त्याचा धर्म नसून सत्य, न्याय, प्रसन्नता, सौंदर्य, स्वातंत्र्य, मानवी मन आणि चैतन्य या सनातन आणि सार्वभौम जीवनतत्त्वांची अनन्यनिष्ठेनें उपासना करणें हा त्याचा धर्म आहे. स्वधर्मकर्मांचें भान विसरल्यामुळें त्याची गणना सत्ताधारी लोकांच्या आश्रित परिवारांत होऊं लागली आणि जीवनाचें कठोर सत्य व वास्तविक परिस्थिति यांचा विसर पाडणें हेंच त्याचें एकमात्र कार्य होऊन गेलें.

"याच हेतूनें लोकरंजन करणाऱ्या अनेक वर्गांपैकीं तो एक बनला. पृथ्वीच्या पाठीवरील अत्यल्प अशा मानवी जीवनपथावर प्रकाश पाडण्याचें कार्य सोडून देऊन वेळ कसा घालवावयाचा याची चिंता तो करूं लागला. लोक कलेला Pastime (अथवा मद्रासच्या बाजूला म्हणतात त्याप्रमाणें 'कालक्षेपम्') समजूं लागले.

"याचा परिणाम म्हणजे पंडित हा आश्रयाशिवाय शोभत नाहीं अशी समजूत पसरली आणि तो वनिता व लता यांच्या पंक्तीस जाऊन बसला. खाऊनपिऊन सुखी असणाऱ्या लोकांजवळ चैनबाजी करण्यासाठीं विपुल वेळ असतो. अशा लोकांना कंटाळा येऊं नये म्हणून काय काय करणें शक्य आहे याची चिन्ता करण्याचें कार्यच या कलाधरासाठीं राहिलें. मानवी जीवनाचें ओझें घेऊन जे बिचारे केवळ भारवाहीच बनले आहेत अशा पामरांना साहित्याचा आस्वाद घ्यावयास फुरसत कोठून असणार? आणि जेव्हां कामाचाच दुष्काळ पडल्यामुळें अशा लोकांना रिकामा वेळ मिळतो तेव्हां भाकरीच्या तीव्र चिंतेपुढें साहित्य कोठून सुचणार! उपाशी मनुष्य व्याकरणानें पोट भरूं शकत नाहीं किंवा तहानेलेला जीव काव्य-रसानें आपली तहान भागवूं शकत नाहीं. थोडक्यांत म्हणजे साहित्य निर्माण झालें खरें पण तें कृतार्थ झालें नाहीं.

"अशा वेळीं ज्या वर्गानें साहित्याला आश्रय दिला त्याची मनोवृत्ति त्यांत प्रतिबिंबित झाल्याशिवाय कशी राहील ? समाजांतील भीषण जीवनकलहाचें रूप एकदम बदलून टाकून त्याला नशीबाचें रूप देण्यांत आलें. प्रचंड धार्मिक आणि सामाजिक विग्रहांना विदूषकासारखा हास्यास्पद वेष चढवून त्यांना नाटकांत उपाख्यानाचें स्थान देण्यांत आलें व मानवी रागद्वेषाच्या अदम्य प्रवाहाला अगदींच क्षुद्र बनवून कोणत्या स्त्रीनें कोणा पुरुषाबरोबर अभिसार केला आणि कोणाला टाळी दिली याचींच वर्णनें साहित्यांत सर्वत्र दिसूं लागलीं. सर्वच लोक दगाबाज– नाटककार, नट, त्यांचे शिक्षक आणि प्रेक्षकदेखील– सर्वच जुलमी किंवा जुलमाला बळी पडलेले."

या खड्डयांतून साहित्याला वर काढण्याचे प्रयत्न सेवाधुरीण असे जनतेचे कांहीं उपासक करीत आहेत. अशा लोकसेवक साहित्यकारांचें आंतरप्रांतीय संगठन करणें हा आपला मुख्य उद्देश आहे. परकीय संस्कृतीचे एकामागून एक लोंढे आल्यामुळें आपले लोक गांगरून गेले असल्यास नवल नाहीं. पण प्रत्येक नवा पूर आपल्या पाण्याबरोबर जो पौष्टिक गाळ घेऊन येतो तोच चैतन्याच्या अंकुरासाठीं सर्वोत्कृष्ट असें खत बनतो. आणि मग जीवनांकुर उगवून वर येतांच त्यापासून सतरा आणे पीक निघतें.

आम्हांला वाटतें कीं आपल्या देशाच्या इतिहासांत असा काळ आतां आलेला आहे.

जमीन तयार झालेली आहे. अशा वेळीं जो निर्भय होऊन बीज पेरीत नाहीं आणि आजपर्यंत जिवापाड मेहनत करून सांठविलेलें बीं जमिनींत पेरल्यास तें चिखलांत पडून कुजून जाईल अशी भीति मनांत बाळगतो आणि जुनें भांडवल संभाळून ठेवण्यांतच मोठा पुरुषार्थ आहे असें मानतो तो आस्तिकतेची भाषा बोलत असला तरी वास्तविकपणें नास्तिक आहे, जीवनद्रोही आहे– प्रेताला जतन करून चैतन्याची उपासना उलटवून टाकणारा आहे. तो तोंडानें धर्माचा जयजयकार करील खरा पण हातानें असें कार्य करील कीं धर्माचा क्षयच व्हावा. आतां यापुढें आपल्याला धर्माचे रक्षक बनावयाचें नाहीं तर धर्माचें तत्त्वच प्राप्त करून घ्यावयाचें

आहे. अर्थात् हा धर्म म्हणजे जुन्या, सडलेल्या किंवा विचलेल्या रूढीचा धर्म नसून चैतन्याचा सनातनधर्म असेल.

हा धर्म देवाण-घेवाण करण्यास कधींहि मागेंपुढें पाहणार नाहीं. जगणें म्हणजेच देवाण-घेवाण करणें. जो देतो आणि घेतो त्याच्यावर ही जीवनदेवता प्रसन्न होते. "ददाति प्रतिगृह्णाति नान्यथैषा प्रसीदति।" पण देणें म्हणजे गुलामाप्रमाणें कर, जकात किंवा दंड म्हणून जें दिलें जातें तें नव्हे; आणि घेणें म्हणजेहि भिकाऱ्याप्रमाणें फेकून दिलेले तुकडे उचलणें नव्हे. जगामध्यें समानभावानें सर्वांशीं बरोबरीच्या नात्यानें राहतां आलें पाहिजे. हा साम्ययोग साधण्यासाठींच परस्परसहकाराची कला हस्तगत करण्याची जरूर आहे. आपल्या देशांत प्रत्येक प्रांताचें कांहीं तरी वैशिष्ट्य हें असतेंच. प्रांतीय भेद स्पष्ट दिसण्यासारखे आहेत; पण संस्कृति कांहीं प्रांतवार वेगवेगळी नाहीं. संगीताच्या एखाद्या समृद्ध आणि संपूर्ण रागांत ज्याप्रमाणें आरोही व अवरोही स्वरांमध्यें भिन्नता असते त्याच प्रकारची भिन्नता आपल्या विविध प्रान्तांत आणि त्यांच्यांतील वेगवेगळ्या वर्गांत आहे.

ज्या वेळीं राष्ट्राचा आत्मविश्वास साफ उडून गेला होता, त्यांत कोठल्याहि प्रकारची हिंमत राहिली नव्हती, अशा वेळीं कांहीं लोक परकीयांचें फक्त अनुकरण करण्याचा उपदेश करूं लागले; आणि कांहीं त्यांना विरोध करून जुन्या मुडद्यांना मसाल्यांत पुरून टाकून त्याची ममी बनवून तिची पूजा केली पाहिजे असें सांगूं लागले. आपल्याकडे हा झगडा कित्येक वर्षें चालला. पण नंतर खऱ्या जागृतीचा उदय होतांच जुन्या पुंजीवर जगण्याची अथवा डब्यांतून पॅक करून मिळणाऱ्या परदेशी अन्नावर आजीविका चालविण्याची मुळींच आवश्यकता नाहीं, तर आपल्या स्वतःच्या जमिनीला घरचें व बाहेरचें खत घालून नवें पीक तयार करणें आवश्यक आहे ही गोष्ट शहाण्या लोकांच्या मनावर ठसली. कष्टपूर्वक जमिनीची मशागत करून ताजें पीक काढल्यानेंच राष्ट्रजीवनाला आवश्यक अशीं सर्व जीवनसत्त्वें (व्हिटॅमिन्स) मिळूं शकतात एवढी साधी गोष्ट देखील आपल्या गळीं उतरण्यास दोन पिढ्यांपर्यंत वाट पाहावी लागली. आणि म्हणूनच आंतरप्रांतीय संगठनाची जरूर आपल्याला आजपर्यंत भासली

नाहीं. स्वावलंबनाचा प्रयत्न करतेवेळींच परस्परसहकाराची जरूर भासूं लागते. परावलंबनांत मात्र केवळ नाथ-निष्ठा भरपूर असली म्हणजे पुरे. आतां जेव्हां आपण स्वानुभवाचें महत्त्व समजून पराक्रम किंवा पुरुषार्थ करूं लागलों आहोंत अशा वेळीं एकमेकांचा सल्ला घेण्याची जरूर आपल्याला भासूं लागली आहे.

मनुष्य जर प्रयोगवीर नसेल, अनुभवपरायण नसेल, तर 'कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ।' अशा प्रकारची पूर्वानुसारी वृत्ति त्याच्या अंगवळणीं पडून जाते. त्या कालखंडांत आपण बाहेरचे गुरु पुष्कळ केले पण आत्मगुरूचा शोध केला नाहीं.

राजकारणामध्यें आपण १८५७ सालीं प्रथम जुन्या पद्धतीनें साधेंसुधें असें एक बंड करून पाहिलें. त्यानंतर राज्यकर्त्यांचा इतिहास वाचून त्यांचेंच अनुकरण सुरू केलें. प्रथम आपल्याला आशा होती कीं लिबरल पक्षाचे लोक भले आहेत, त्यांच्या हातूनच आपलें कल्याण होणार आहे. ती आशा दुराशा आहे असा अनुभव आल्यावर आपण मजूर-पक्षाकडे वळलों. त्याच काळीं फ्रान्स, इटली, अमेरिका वगैरे देशांचा इतिहास वाचून त्यांतून प्रेरणा मिळविण्याचा आपण प्रयत्न केला. इतक्यांत रशियाच्या प्रगतीनें सारें जग दिपून गेलें आणि त्या देशांत झालेली क्रांति इतिहाससिद्ध शास्त्राच्या मजबूत पायावर रचलेली आहे अशी बातमी आपल्याला कळली.

आपण कोणाकडूनहि गुरुमंत्र घेऊं शकतों; पण जर तो आत्मसात् करूं शकलों नाहीं, तर त्यांतून सामर्थ्य प्राप्त होणार नाहीं. साहित्याच्या बाबतींतहि अनुकरणाला आणि उसनें घेण्याला कांहीं मर्यादा असते. एखाद्या ग्रंथाचें आपण स्वभाषेंत भाषान्तर केलें व तें जर लोक समजूं शकले नाहींत तर त्याचा काय फायदा ? अथवा जरी समजलें तरी त्या-विषयीं जर सहानुभूति उत्पन्न झाली नाहीं, तें कोणालाहि आकर्षक वाटलें नाहीं, तर तें व्यर्थच गेलें म्हटलें पाहिजे. समजा, तें आकर्षकहि झालें पण जर तें लोकांच्या मनांत प्रवेश करणार नाहीं, विचारसरणीवर प्रभाव पाडणार नाहीं, लोकांच्या जीवनांत किंवा त्यांच्या भाषेंत उतरणार नाहीं,

तरीहि तें निष्फळच समजलें पाहिजे. साहित्याची शक्ति अद्‌भुत आहे, पण ती रसायनासारखी आहे. फक्त साहित्यवाचनानें आणि परक्यांपासून आदर्श व अनुभव उसने घेण्यानें फार फार तर साहित्यक्षेत्र समृद्ध होईल पण त्यांतून जीवनसाफल्य कोठून निष्पन्न होणार ?

जीवन जर समृद्ध, व्यापक आणि गंभीर होईल तरच वरील गुण साहित्यांत उतरणार. शोध, पराक्रम, प्रवास, व्यापार, हुन्नर, कलाकौशल्य, निरीक्षण, परीक्षण इत्यादि गोष्टींत जेव्हां समाज आघाडीवर असतो, त्याची महत्त्वाकांक्षा जेव्हां उत्तुंग होते आणि कर्तव्यबुद्धि भेदक होते तेव्हांच साहित्य जोमदार बनतें.

अशा प्रकारचें पोषण साहित्याला आतां मिळूं लागलें आहे आणि म्हणूनच साहित्याचें आंतरप्रांतीय संगठन करण्याची जरूर आज भासूं लागली आहे; व त्या बाबतींत उत्साहहि दिसूं लागला आहे. तसें पाहूं गेल्यास ही कल्पना पंचवीस तीस वर्षांची जुनी आहे. पण साहित्यसंगठन करण्याची आवश्यकता त्या वेळीं उत्पन्न झाली नव्हती असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं.

जीवनाला विसरून जाऊन, जीवनाचा द्रोह करून, केवळ साहित्याचेंच पोषण आम्हांला करावयाचें नाहीं. जीवनासाठीं साहित्य आहे, जीवनामधून साहित्याचा उद्‌गम आहे आणि साहित्याचें फळहि संस्कारी व समर्थ जीवनांतच आहे. विविधतेमधून ऐक्य हा जो आपला जीवनमंत्र त्याला साहित्यांतहि स्पष्टपणें आणि पूर्णपणें व्यक्त करावयाचें आहे. आणि म्हणून सर्वसमन्वय हाच आमचा ध्यानमंत्र होय.

कांहीं लोकांना असें वाटतें कीं, अनेक वस्तूंची खिचडी बनवून टाकली कीं साधला समन्वय. उलट दुसऱ्या कांहीं लोकांना असें वाटतें कीं, कोणत्या तरी एका विशेष वस्तूचा स्वीकार करून तिचा विस्तार करावयाचा आणि इतर वस्तूंना तिलांजलि द्यावयाची हेंच ऐक्याचें एकमात्र साधन आहे. पण या दोन्ही दृष्टि चुकीच्या आहेत. विविधतेविना ऐक्यांत कांहीं अर्थच नाहीं. विविध घटकांचें आपापलें स्वत्व योग्य प्रमाणांत संभाळलें गेलें नाहीं तर समन्वय कोणाचा करावयाचा ? स्वत्व आणि

समन्वय हीं एकमेकांच्या विरोधी अशीं तत्त्वें दिसतात; तीं सहजासहजीं एकमेकांत मिसळत नाहींत हें खरें; पण समाजानें योग्य साधना करून ती समन्वयशक्ति अंगीं बाणवावयाची असते. अनेक चुका होतील; कित्येक पिढ्यांचा होम होईल; पण स्वत्व आणि समन्वय या दोहोंची एकरूप उपासना झाल्यास त्यांतून जीवनाचे दिव्य स्फुलिंग निघाल्याशिवाय राहणारच नाहींत. याचेंच दुसरें नांव म्हणजे जीवनरसायन.

केवळ खिचडी बनविण्यानें कधीं कधीं अनिष्ट गोष्टीच उत्पन्न होतात. बाजारांत सर्व चिजा एकत्र झालेल्या असतात. पण म्हणून दुकानाला कोणी घर म्हणत नाहीं; पुस्तकांचें दुकान म्हणजे कांहीं पुस्तकालय (लायब्ररी) नव्हे.

वर सांगितल्याप्रमाणें व्यापक जीवन हेंच साहित्याचें क्षेत्र होय. यामुळें जीवनाचीं सर्व क्षेत्रें हे आपल्या चिंतनाचे विषय होत. पण या क्षेत्रांतील फारच महत्त्वाचें आणि व्यापक क्षेत्र आपण समजूनउमजून तूर्त सोडून देणार आहोंत. राजकारणाची– उच्च भूमिकेवरून चर्चिल्या जाणाऱ्या राजकारणाची– आपण कल्पिलेल्या साहित्याला कांहीं आडकाठी नाहीं. पण सध्यांच्या परिस्थितींत आपण आपल्या भावना मौनाच्या द्वारें व्यक्त कराव्यात हेंच इष्ट आहे. आज राष्ट्रामध्यें सर्वांना एकत्र आणण्याची अत्यंत आवश्यकता आहे. धर्माभिमान, जात्यभिमान, प्रांताभिमान आणि राजकीय पक्षभेद वगैरे गोष्टींनीं आपल्या मनोवृत्ति इतक्या प्रक्षुब्ध, संकुचित आणि बुद्धिविमुख होऊन जातात, कीं त्यामुळें सांस्कृतिक संगठन अधिकाधिक कठीण होतें. जेथें मोकळ्या अंतःकरणानें बोलतां येत नसेल तेथें मौन सेवन करणें चांगलें. भीत भीत किंवा कोणाच्या तरी भरीस पडून खऱ्याखोटयाचें मिश्रण करण्यांत अथवा आडवळणानें बोलण्यांत सत्याचें पालन नाहीं, सामर्थ्य नाहीं, तेजस्विता नाहीं आणि मानसिक समाधान तर नाहींच नाहीं. आणि परिणाम पाहावा तर–शून्य ! या सर्व कारणांमुळें आमच्या कार्यास राजकारणापासून अलिप्त ठेवण्याचें आम्हीं पसंत केलें आहे.

वैयक्तिक टीका देखील शक्यतोंवर टाळावयाची असें आम्हीं ठरविलें आहे. सगळेच जेथें स्खलनशील तेथें कोणी कोणाचा उपहास करावयाचा ?

मराठी ग्रंथ संग्रहालय

प्रथम दगड कोणीं मारावयाचा ? आणि वैयक्तिक टीकेनें टीका करणाऱ्याचाहि फायदा होत नाहीं व टीकेचा विषय झालेला माणूसहि सुधारत नाहीं. एक तर तो चिडून जाईल किंवा निराश होईल. यामुळें सामाजिक जीवन अधिकाधिक खालच्या दर्जास जातें असा सार्वत्रिक अनुभव आहे.

कांहीं लोक म्हणतात कीं साहित्य हें जीवनाचें समालोचन आहे. गोष्ट खरी आहे. पण तिच्यांत सारें सत्य येत नाहीं. साहित्य ही जीवनाची पुनर्घटना आहे, नवनिर्मितिहि आहे आणि कित्येक वेळां ती जीवन-प्रेरणाहि असते. हे सर्व आदर्श आमच्या दृष्टीसमोर आहेत.

भारतीय साहित्याचें मुख्य काम राष्ट्रभाषेच्या द्वारेंच चालेल. पण त्याचा संदेश प्रत्येक प्रांतीय भाषेनें आपापल्या प्रांतांत, आपापल्या पद्धतीनें पोहोंचवावयाचा आहे. सगळे मिळून एकाच पंक्तींत जेवावयास बसले असले तरी काय खावयाचें, किती खावयाचें आणि कोणत्या पद्धतीनें खावयाचें हें प्रत्येकानें आपली भूक, तब्येत आणि अभिरुचि यांचा विचार करूनच नक्की करावयाचें असतें. याचप्रमाणें प्रांतीय भाषांना करावें लागेल.

आणि सर्व द्यावयाचें असलें तरी देतेवेळीं शबरीप्रमाणें एकेक बोर तपासूनच अर्पण करणें चांगलें. दुसऱ्या एका पद्धतीनें विचार करण्यासारखा आहे. आपण 'महाराष्ट्रीय साहित्य' किंवा 'भारतीय साहित्य' असे शब्द वापरतों. 'महाराष्ट्रीय संस्कृति' व 'भारतीय संस्कृति' असे शब्दहि आपण वापरतों. पण त्या त्या साहित्याला अथवा संस्कृतीला एकरूप बनविण्याचा आपण कधीं तरी प्रयत्न केला आहे काय ? 'मराठी बोलणारे ते सर्व महाराष्ट्रीय' ही व्याख्या बरोबर आहे; पण मराठी बोलणारे आपण सर्व एक आहोंत, एकमेकांचे आहोंत, या प्रकारची वृत्ति जागृत करण्यासाठीं किंवा दृढ करण्यासाठीं आपण साहित्यांत कांहीं प्रयत्न केला आहे काय ? एकमेकांवर टीका करून, एकमेकांचे दोष उघडे करून आपण एकमेकांची सेवा केली आहे असें कदाचित् आपण मानीत असूं; पण असें करण्यानें हृदयांचें मीलन झालें आहे काय ? संकटाच्या वेळीं आपल्या मदतीस कोणी तरी धावून येईल असा विश्वास एकमेकांच्या

मनांत उत्पन्न झाला आहे काय ? महाराष्ट्राविषयीं अभिमान म्हणजे मी आणि माझें एवढ्यापुरताच अभिमान नव्हे, तर सर्व महाराष्ट्रीयांविषयीं आपलेपणा, सर्वांविषयीं प्रेम, असा अर्थ आपल्या येथें होतो का ? अशी भावना असो किंवा नसो ती उत्पन्न करण्याची तळमळ असेल तरच भारतीय साहित्याच्या संगठनेची कल्पना आणि आस्था आपल्यांत उत्पन्न होणार आहे. आपलें आजचें साहित्य मुख्यतः पुढारलेल्या वर्गाचें साहित्य आहे. कित्येक लोक त्याला ब्राह्मणी साहित्य म्हणतात. 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या पुस्तकाचे लेखक प्रिन्सिपल गोळे यांच्या व्याख्येप्रमाणें आजचें साहित्य ब्राह्मणी साहित्य आहे यांत शंका नाहीं. एक प्रकारें पाहिलें असतां पुढारलेलें साहित्य हें पराभूत (defeatist) साहित्य आहे. पराभूत साहित्याचें हें एक लक्षण आहे कीं आपल्या पतित देशासाठीं अधूनमधून रडगाणीं गावयाचीं; कधीं दुसऱ्याचे दोष काढावयाचे; कधीं देशाच्या पतित दशेचा विसर पाडण्यासाठीं पूर्वजांचें गुणगांन करावयाचें; वेळीं-अवेळीं इतरांशीं तुलना करीत बसावयाचें आणि आपल्याला दुसऱ्याइतकें यश कां मिळालें नाहीं त्याची कारणमीमांसा खूप बारकाईनें करावयाची; एखाद्याला यश मिळाल्यास त्याचें अभिनंदन करून त्याचें अनुकरण करण्याऐवजीं कोणकोणत्या बाह्य कारणांमुळें त्याला यश मिळालें याची चिकित्सा करून अशी संधि आम्हांला मिळाली असती तर आम्हीं देखील असाच पराक्रम करून दाखविला असता असें ध्वनित करण्याचा प्रयत्न करावयाचा; आणि यश मिळविण्यासाठीं जो पुरुषार्थ करावा लागतो, त्यासाठीं जो संयम बाणवावा लागतो त्यासाठीं प्रयत्न करण्याऐवजीं ध्येय-वाद, साधकजीवन, संयम आणि त्याग यांचा उपहास करून धूर्ततेला, वाचाळतेलाच महत्त्व देऊन सर्व प्रकारच्या विलासालाच जीवनसर्वस्व मानून क्षुद्र परिस्थितींतहि जें कांहीं विलाससेवन व विलासचिंतन शक्य असेल त्यांतच गढून जावयाचें आणि तेंच स्वाभाविक आहे असें लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करावयाचा.

ध्येयवादाची देखील अशीच एक (dafeatist) आवृत्ति असते व तीहि आपल्या ध्यानांत असली पाहिजे. ज्यांना पराक्रम किंवा पुरुषार्थ

करावयाचे नसतात त्यांना मनोराज्यें उभारण्याची सवय असते. अशीं मनोराज्यें कधीं कधीं ध्येयवादाचें रूप धारण करतात आणि त्यामुळें प्रत्यक्ष कार्याला आरंभ करण्याचें टाळतात. असें साहित्यहि पराभूत साहित्यच होय हें ओळखलें पाहिजे. आदर्शचित्रण हें कांहीं आदर्शसेवन म्हणतां यावयाचें नाहीं. समर्थभक्ति ही कांहीं सामर्थ्याची उपासना नव्हे. सचेत साहित्याचें स्वरूप आपण ओळखलें पाहिजे. जीवन्त विचारचिन्तनाची सवय केली पाहिजे, आणि तसें करण्यासाठीं जीवनाचीच उपासना केली पाहिजे.

साहित्याचा दावानल प्रकटविल्यानें, यादवी माजविल्यानें समाज समर्थ अथवा समृद्ध होणार नाहीं. खरी सेवा करावयाची असेल तर जीवनानें परिप्लुत अशा साहित्याचा पाऊस पाडण्याची शक्ति हस्तगत केली पाहिजे.



## कवि आणि सन्त : :५:

जुन्या काळीं भक्तिमार्गी आणि योगमार्गी सन्त बऱ्याच कविता करीत. सन्तांच्या कृतींत कविता ही यावयाचीच. सर्व सन्तांच्या कवितेंत काव्य-गुण किंवा प्रसादगुण असतोच असें नाहीं; पण ज्याचें जीवन पवित्र आहे, ज्यानें आपलें जीवन ईश्वराच्या चरणीं अर्पण केलें आहे, त्याची छंदोबद्ध वाणी पवित्र आणि बोधामृत पाजणारी व अनुभवमूलक असल्यामुळें तिला प्रासादिक समजावयाचें आणि तिच्यांत काव्य पाहावयाचें अशी भाविक लोकांच्या मनाची घडण म्हणा किंवा त्यांच्या मनाची पूर्वतयारी म्हणा चालत आली आहे. यामुळें त्यांनीं काव्याचें खरें लक्षण कोणतें हें न पाहतां ज्यांत सन्तवाणीचा समावेश होऊं शकेल अशीच काव्याची व्याख्या करण्याचें ठरविलें.

ही झाली सन्तांची गोष्ट. इतिहास, पुराणें आणि पौराणिक काव्यें लिहिणारे कवि सर्व सन्त होते असा जरी दावा करण्यांत येत नसला तरी पण ते धर्मग्रंथ लिहीत असतात, ईश्वरी लीलेचा वाङ्मयविस्तार करीत

असतात आणि धर्मबोधाला दृढ करीत असतात, म्हणून त्यांच्या छंदोबद्ध रचनेला देखील काव्यच म्हटलें पाहिजे असें लोकांना वाटे. छंदरचना हेंच काव्य अशी आजहि सामान्य लोकांची समजूत असते. पौराणिक कथा आणि अवतारी पुरुषांचीं लीलामृतें हीं वर्णनात्मक असल्यामुळें त्यांत काव्यगुणाला चांगला वाव मिळत असे. अशा रचनांमध्यें काव्यगुण अधून-मधून चमकला तरीहि त्याच्या वातावरणांत रचनेचा रूक्ष भाग देखील वस्तूच्या किंवा गोष्टीच्या प्रवाहांत रोचक वाटतो आणि वाटेल तितकी लांबलचक कृति देखील वाचनीय बनते.

केवळ शृंगारिक किंवा अश्लील लावण्या अथवा शृंगारशतकांची गोष्ट अगदींच वेगळी आहे. त्यांच्या रचनेंत काव्यगुण असो किंवा नसो, कामुकतेला उद्दीपित करण्याची स्वस्त शक्ति त्यांच्यात असल्यामुळें विलास-प्रिय माणसाला त्यांत सहजच काव्यगुण दिसावयाचा आणि दुसऱ्या बाजूनें अशा रंगेलपणांत खरा काव्यगुण असला तरीहि तो नीतिविघातक असल्या-मुळें शिष्ट समाजाला किंवा दांभिक प्रतिष्ठेला त्याची निंदाच करावी लागते. आणि म्हणूनच 'हा श्लोक अश्लील असूनहि रम्य आहे' अशी टीका टीकाकार करीत असतात ! (खरें पाहिलें असतां श्री म्हणजे रमणीयता; अश्री म्हणजे रमणीयतेचा अभाव आणि अश्री वरूनच अश्लील हें विशेषण बनलें आहे. अश्लील शब्द सदाचारवादी लोकांनीं बनविलेला नसून सुरुचिवादी– कलाकोविद लोकांनीं बनविलेला आहे. तेव्हां जें अश्री– अश्लील– असेल तें रम्य किंवा रमणीय कसें होऊं शकेल ?) अश्लील पद्य-रचनेंत काव्यगुण नसला तरी ती रंगेल लोकांत अत्यंत प्रिय होणारच. आणि अश्लीलतेचें वातावरण भेदून त्यांतून काव्यरसाचे फवारे उडाले तरी-हि शिष्ट किंवा समाजहितैषी लोक त्याला मान्यता देणार नाहींत.

जुन्या काळची परिस्थिति अशा प्रकारची होती. चालू काळांतील सन्त काव्यें फार थोडीं करतात. जुनीं काव्यें पुष्कळ असल्यानें त्यांनींच त्यांचें काम भागतें आणि आधुनिक युग सन्तकाव्यांचें नसल्यामुळें (त्यांना अनुकूल नसल्यामुळें) आधुनिक सन्त व्याख्यानें, प्रवचनें, बोधवचनें किंवा सुभाषितें यांच्या द्वारेंच आपलें हृदय, आपली श्रद्धा आणि आपलें

## कवि आणि सन्त : 	: ५ :

जुन्या काळीं भक्तिमार्गी आणि योगमार्गी सन्त बऱ्याच कविता करीत. सन्तांच्या कृतींत कविता ही यावयाचीच. सर्व सन्तांच्या कवितेंत काव्य-गुण किंवा प्रसादगुण असतोच असें नाहीं; पण ज्याचें जीवन पवित्र आहे, ज्यानें आपलें जीवन ईश्वराच्या चरणीं अर्पण केलें आहे, त्याची छंदोबद्ध वाणी पवित्र आणि बोधामृत पाजणारी व अनुभवमूलक असल्यामुळें तिला प्रासादिक समजावयाचें आणि तिच्यांत काव्य पाहावयाचें अशी भाविक लोकांच्या मनाची घडण म्हणा किंवा त्यांच्या मनाची पूर्वतयारी म्हणा चालत आली आहे. यामुळें त्यांनीं काव्याचें खरें लक्षण कोणतें हें न पाहतां ज्यांत सन्तवाणीचा समावेश होऊं शकेल अशीच काव्याची व्याख्या करण्याचें ठरविलें.

ही झाली सन्तांची गोष्ट. इतिहास, पुराणें आणि पौराणिक काव्यें लिहिणारे कवि सर्व सन्त होते असा जरी दावा करण्यांत येत नसला तरी पण ते धर्मग्रंथ लिहीत असतात, ईश्वरी लीलेचा वाङ्मयविस्तार करीत

असतात आणि धर्मबोधाला दृढ करीत असतात, म्हणून त्यांच्या छंदोबद्ध रचनेला देखील काव्यच म्हटलें पाहिजे असें लोकांना वाटे. छंदरचना हेंच काव्य अशी आजहि सामान्य लोकांची समजूत असते. पौराणिक कथा आणि अवतारी पुरुषांचीं लीलामृतें हीं वर्णनात्मक असल्यामुळें त्यांत काव्यगुणाला चांगला वाव मिळत असे. अशा रचनांमध्यें काव्यगुण अधून-मधून चमकला तरीहि त्याच्या वातावरणांत रचनेचा रूक्ष भाग देखील वस्तूच्या किंवा गोष्टीच्या प्रवाहांत रोचक वाटतो आणि वाटेल तितकी लांबलचक कृति देखील वाचनीय बनते.

केवळ शृंगारिक किंवा अश्लील लावण्या अथवा शृंगारशतकांची गोष्ट अगदींच वेगळी आहे. त्यांच्या रचनेंत काव्यगुण असो किंवा नसो, कामुकतेला उद्दीपित करण्याची स्वस्त शक्ति त्यांच्यात असल्यामुळें विलास-प्रिय माणसाला त्यांत सहजच काव्यगुण दिसावयाचा आणि दुसऱ्या बाजूनें अशा रंगेलपणांत खरा काव्यगुण असला तरीहि तो नीतिविघातक असल्या-मुळें शिष्ट समाजाला किंवा दांभिक प्रतिष्ठेला त्याची निंदाच करावी लागते. आणि म्हणूनच 'हा श्लोक अश्लील असूनहि रम्य आहे' अशी टीका टीकाकार करीत असतात ! (खरें पाहिलें असतां श्री म्हणजे रमणीयता; अश्री म्हणजे रमणीयतेचा अभाव आणि अश्री वरूनच अश्लील हें विशेषण बनलें आहे. अश्लील शब्द सदाचारवादी लोकांनीं बनविलेला नसून सुरुचिवादी– कलाकोविद लोकांनीं बनविलेला आहे. तेव्हां जें अश्री– अश्लील– असेल तें रम्य किंवा रमणीय कसें होऊं शकेल ?) अश्लील पद्य-रचनेंत काव्यगुण नसला तरी ती रंगेल लोकांत अत्यंत प्रिय होणारच. आणि अश्लीलतेचें वातावरण भेदून त्यांतून काव्यरसाचे फवारे उडाले तरी-हि शिष्ट किंवा समाजहितैषी लोक त्याला मान्यता देणार नाहींत.

जुन्या काळची परिस्थिति अशा प्रकारची होती. चालू काळांतील सन्त काव्यें फार थोडीं करतात. जुनीं काव्यें पुष्कळ असल्यानें त्यांनींच त्यांचें काम भागतें आणि आधुनिक युग सन्तकाव्यांचें नसल्यामुळें (त्यांना अनुकूल नसल्यामुळें) आधुनिक सन्त व्याख्यानें, प्रवचनें, बोधवचनें किंवा सुभाषितें यांच्या द्वारेंच आपलें हृदय, आपली श्रद्धा आणि आपले

अनुभव व्यक्त करतात. आणि इकडे नेहमीं सन्तपणांतच गर्क होऊन राहण्याची आवश्यकता व जबाबदारी आतां कवींना मासत नसल्यामुळें ते वाटेल त्या विषयावर वाटेल त्या वृत्तींत येऊन किंवा ती धारण करून काव्यें रचूं लागले आहेत.

सन्त काय किंवा कवि काय दोघांनाहि अनन्त प्रकारच्या वृत्ति आणि भावना (moods) स्फुरतच असतात. ज्या वेळीं जी भावना प्रबळ असेल त्या वेळीं ती भावना त्यांच्यापुरती खरी असते. कित्येक वेळां या भावनांमध्यें उच्च कोटीची उत्कटता असली तरी स्थिरता, वीर्य किंवा जोश असत नाहीं. ज्याप्रमाणें नाटकांतील नटानें वीररसाचा वाटेल तितका आविर्भाव केला तरी आपण त्याच्या पाठीशीं वीरोचित जीवनाची अपेक्षा राखीत नाहीं, त्याप्रमाणें कवीनें वेगवेगळे भाव प्रकट केले तरी त्याच्याकडून त्या त्या भावांना अनुकूल अशा वर्तनाची आपण अपेक्षा राखीत नाहीं. पण सन्तांचें तसें नसतें. सन्त हा एक परम पारमार्थिक प्राणी आहे असें आपण धरूनच चालतों. सन्त 'बोले तैसा चाले' अशी आपल्यांत एक अपेक्षा असते. आणि म्हणून सन्तांना अनेक प्रकारच्या भावनांमध्यें विहार करण्याची, उंच उडण्याची आणि आशा-निराशा, सन्तोष-असन्तोष, संभोग-विप्रलंभ इत्यादि आरोह-अवरोह घेण्याची पूर्णपणें मोकळीक असूनहि त्यांना अनुभवाच्या तंबोऱ्याचा सूर कायम ठेवून त्याला विसंवादी होणार नाहींत अशा तऱ्हेनेंच सर्व आलापाच्या व प्रलापाच्या तारा छेडाव्या लागतात. आणि एखादे वेळीं शब्दार्थालाच चिकटून राहणारा असा एखादा दुर्दैवी भक्त भेटला तर आपल्या परस्परविरोधी वचनांची एकवाक्यता करून दाखविण्याची जबाबदारी त्यांच्यावर किंवा त्यांचा अभिमान बाळगणाऱ्या विवेचकांवर येऊन पडते. (तें जर साधलें नाहीं तर गूढवादाचा (mysticismचा) आश्रय घेण्याची सोय असतेच. एकुणएक अनुभव हें पारमार्थिक आणि परम सत्य असल्यामुळें विरोधाचा परिहार करण्याची जबाबदारी कधींहि टाळतां येत नाहीं.) पण कवि हा निरंकुशच. तो म्हणणार "एकवाक्यता कसली! जड आणि मूढ यांच्या वचनांत एकवाक्यता असली तर असो; पण मी मात्र माझी प्रतिभा जसें

मजकडून वदविते तसें बोलतों. मी एक व्यक्ति आहें अशी मजविषयीं तुम्ही चुकीची कल्पनाच मुळीं कां करून घेतां? माझें चित्त ही एक आकर्षक धर्मशाळा आहे. तेथें कितीतरी नमुनेदार लोक येऊन राहतात आणि निघून जातात. तुमच्या टेबलावरील टेलिफोननें एकाच प्रकारचें भाषण करावें, तुमच्या ग्रामोफोननें एकाच तऱ्हेचें संगीत गावें, तुमच्या पार्लमेंटनें किंवा कायदेमंडळांनीं परस्परसंवादी असेच ठराव तयार करावेत किंवा पास करावेत, तुमच्या म्युनिसिपालिटीनें एकच धर्म पाळावा असें तुम्हांला कधीं काळीं वाटलें आहे काय? मी एक नसून अनेक आहें, मी एखादी व्यक्ति नसून समुदाय आहें, समुदायाकडे तुम्ही ज्या दृष्टीनें पाहतां तीच दृष्टि तुम्ही मजविषयीं ठेवा, उत्कट भावनांना वश होण्याची अनाग्रहिता (passivity) माझ्यांत आहे. हें सर्व तुम्हांला समजत नसेल तर मी काय करणार? मी तर जसा आहें तसा आहें. माझें जें कांहीं तुम्हांला करावयाचें असेल तें करा. माझ्याकडे दुर्लक्ष करून तुमचें चालणार नाहीं. एखाद्या मोहक सुन्दर मुलानें दंगामस्ती करून तुम्हांला सतावलें तरी तें सर्व ज्याप्रमाणें तुम्हांला प्रिय वाटतें, त्याप्रमाणें माझे परस्परविरोधी बोल तुमच्या हृदयांत जबरदस्तीनें घुसतात आणि तुम्हांला आरी टोचून अभिमुख करतात. त्याला तुम्ही तरी काय करणार आणि मी तरी काय करणार? मला माझें अस्तित्व सिद्ध करावें लागत नाहीं आणि त्याचा बचावहि करावा लागत नाहीं. तर मग विनाकारण तंटा कशाला करायचा! मला आपला साथी समजा किंवा एक व्यसन समजा. एका गोष्टीविषयीं मात्र मुळींच शंका नाहीं. आणि ती म्हणजे मी तुम्हांला चिकटलोंच आहें."

हे कवि लोक आपल्या दुर्बळतेचा खरोखर गैरफायदा घेतात काय? आपलें जीवन व्यवस्थित नसतें, मोठ्या समूहापुढें ज्याप्रमाणें कुठलाहि स्थायी आदर्श किंवा हेतु नसतो तसेंच आपलें जीवन आहे, म्हणून ते त्याचा गैरफायदा घेतात काय? कीं कवीच्या साधनाशून्य, साधनाविहीन भावनांमध्यें देखील बुद्धीहून पर असें एखादें एकतेचें तत्त्व खरोखरीच लपलेलें असतें? कीं मग संत आणि कवि या दोघांमध्यें शेवटीं कांहीं अंतिम भेदच नाहीं? संत म्हणजे उत्कट भावनेनें ज्यांनीं साधनेला वरिलें

आहे असे लोक; आणि कवि म्हणजे अनंत प्रकारच्या साधनप्रवाहांत अवश होऊन वाहत जाणारे विचित्र समुदाय एवढाच त्या दोघांत फरक आहे ? वाटेल तें असो. पण सर्व संतांचीं वचनें एकत्र केलीं असतां त्यांच्यांत देखील कांहीं थोडाथोडका परस्परविरोध दिसून येत नाहीं. जी कांहीं कविता संतवाणीच्या नांवावर खपते ती सर्व अनुभववाणीच असेल अशी श्रद्धा बसत नाहीं. अनुभवाचा थोडादेखील गंध नसतांनासुद्धां जुन्या संतांची परिभाषा वापरून संतवाणीसारखी कविता सहजासहजीं तयार करणें अगदीं शक्य आहे. संतवाणीचें एक तंत्र तयार झालें आहे; तेवढें संभाळून जर कविता रचली गेली तर मग कोणी अडवील अशी भीति बाळगण्याचें कारण उरणार नाहीं. आणि समजा कीं थोडासा अनुभव आहेहि; तरी पण तो जीवनाच्या परमरहस्याच्या दृष्टीनें खरा आहे असें कोण सांगूं शकेल ? असें शाबीत करण्याची जबाबदारी तरी कोण कबूल करणार ? एकीकडून संतवाणीमध्यें परस्परमेळ असलाच पाहिजे, तो सांपडलाच पाहिजे असा आग्रह धरण्यांत येतो तर दुसरीकडून वाटेल त्या प्रकारें अशा तऱ्हेचा मेळ कमी करून देणारे तर्कवीर किंवा बुद्धीची कसरत करणारे नट वाटेल तितके पडले आहेत.

आतां मात्र अशी वेळ आली आहे कीं संतवाणींत मोडणाऱ्या सर्व कवितेमध्यें परमरहस्याचा अनुभव आहेच असें न मानतां सामान्य कवीच्या काव्याप्रमाणेंच तिला समजून सत्य आणि समृद्ध अशा जीवनतत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें तिचें संशोधन झालें पाहिजे. ज्या भावना आत्मिक विकासाला प्रतिकूल असतील त्यांना सावध केलें पाहिजे आणि प्रसंगवशात् त्यांचे कानहि पिरगाळले पाहिजेत. आणि संतवाणीचा पासपोर्ट (परवाना) घेऊन ज्या कल्पना आज समाजांत बेलगामपणें पसरल्या आहेत आणि विचारांचें व भावनांचें अराजक माजवून समाजाला बुद्धिदुर्बळ, विचारदुर्बळ आणि प्रयत्नशिथिल बनवीत आहेत त्या सर्व कल्पना गोळा करून अशोकाच्या वेळीं ज्याप्रमाणें बौद्धभिक्षूंची परीक्षा घेण्यांत आली होती, कोणतीं वचनें धर्मानुकूल व कोणतीं धर्मबाह्य आहेत तें धर्मसंगीतीमध्यें नक्की करण्यांत आलें होतें, त्याप्रमाणें आतांहि करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. या संगीतींत

कोणाला घ्यावयाचें व कोणाला नाहीं आणि खरें समृद्ध तत्त्वज्ञान कशाला म्हणावयाचें हें ठरविण्याचें अवघड काम आहे एवढीच एक मोठी अडचण आहे.

स्वामी दयानंदजींनीं फारच संकुचित कसोटी घेऊन तिच्यावर प्राचीन धर्मग्रंथ कसून पाहिले आणि त्यांचें प्रामाण्य-अप्रामाण्य नक्की केलें. जीवन कांहीं इतकें तर्कसंकुचित असत नाहीं. जगांतील सर्व चिंतनराशीचा विचार करून भिन्न भिन्न संस्कृतींची व्यापक दृष्टि धारण करून प्रत्येक मंडळानें कांहीं नाहीं तरी निदान आपल्यापुरतें तरी असें संशोधन करण्याची जरूर आहेच आहे.

संतवाणींत आढळणाऱ्या वेगवेगळ्या भावनांना एकामागून एक असें कसोटीवर कसून दाखवूनच वर केलेलें विधान स्पष्ट करतां येईल. या कसोटीवर कसण्याच्या शास्त्राचें किंवा संशोधनशास्त्राचें आलोचन आणि संतवाणीमध्यें अवगाहन हें जितकें जास्त केलें असेल तितकें हें काम जास्त चांगल्या प्रकारें पार पडणार आहे. पण कोणी ना कोणीतरी या दिशेनें प्रयाणाची सुरवातहि केलीच पाहिजे. —जानेवारी, १९३६.



# गांधीयुगाचें वैशिष्टय :  : ६ :

(एक जुनें पत्र)

[ जेव्हां जेव्हां मी मुंबईला व पार्ल्याला जाईं, तेव्हां तेव्हां श्री. नरसिंहराव-भाईना भेटण्याची संधि मिळाल्यास सोडीत नसें. गांधीजींच्या हीरकमहोत्सवाच्या प्रसंगीं श्री. उमाशंकर जोशी यांनीं 'विश्वशान्ति' नांवाचें खंडकाव्य लिहिलें. मीं त्याला प्रस्तावना म्हणून 'आमंत्रण' लिहिलें आणि आम्हीं दोघांनीं तें पुस्तक श्री. नरसिंहरावभाईना धाडून दिलें. थोड्या दिवसांनीं जेव्हां मी त्यांना भेटलों तेव्हां ते म्हणाले, "त्या पुस्तकाचें अवलोकन मीं लिहिलें आहे. तें तुम्ही 'वसंत'मध्यें पाहा." 'वसन्ता'चा तो अंक प्रसिद्ध होण्यापूर्वींच मी तुरुंगांत गेलों. बाहेर आल्यानंतर पुष्कळ दिवसांनीं तो अंक हातीं आला. त्यांत त्यांनीं मला उद्देशून एक प्रश्न विचारला होता. त्याचें उत्तर म्हणून मीं खालील पत्र लिहिलें होतें. प्रत्युत्तर म्हणून ते कांहीं तरी लिहितील अशी आशा– जवळ जवळ खात्रीच– होती.

पुन्हा जेव्हां त्यांना भेटावयास गेलों तेव्हां ते ही चर्चा पुनश्च सुरू करतील अशी कल्पना होती; पण त्या वेळीं समयाभावामुळें तसें होऊं शकलें नाहीं.

नरसिंहरावभाईनीं आपलें तें अवलोकन 'भावी युगाचें साक्षरदर्शन' या मथळ्याखालीं छापलेलें मीं नुकतेंच 'मनोमुकुर भाग २' मध्यें पाहिलें. तेव्हां माझ्या पत्राची नक्कल एके ठिकाणीं होती ती मिळवून येथें सहज एखाद्या शब्दाचा फेरफार करून देत आहें.

नरसिंहरावभाई जिवंत होते तेव्हां त्यांचें उत्तर येईपर्यंत हें पत्र कसें छापावें असा संकोच होता. आतां त्यांच्या मृत्यूनंतर तर अशा प्रकारचें पत्र छापतांना मला पहिल्यापेक्षांहि जास्त संकोच वाटला. पण ते तात्त्विक चर्चेचे रसिक होते आणि मतभेद खूप गाळून, पारखून घेतले जावेत अशी त्यांची इच्छा होती; व पत्रहि पूर्ण आदरभावानें लिहिलेलें आहे. यामुळें माझा संकोच दडपून हें प्रकट करीत आहें. 'मनोमुकुर' (भा. २, पा. ३०२-३१६) मध्यें आलेल्या विवेचनाबरोबर हें वाचावयाचें आहे.

—का. का.]

सत्याग्रहाश्रम, वर्धा.
१५-१०-३३.

मुरब्बी श्री. नरसिंहरावभाई,

चि. उमाशंकर जोशीच्या 'विश्वशांति' वर आपण 'वसंत' मध्यें जें लिहिलें होतें तें पाहण्याची उत्सुकता खूप होती. जेलमध्यें असल्यामुळें त्या वेळीं 'वसंत'चा अंक हातीं आला नाहीं. बाहेर आल्यावरहि तो कोठेंच मिळेना. शेवटीं एका मित्रानें तो मिळवून मजकडे धाडून दिला. तो परवांचे दिवशींच मिळाला. विद्यापीठाच्या एका तरुण कवीची गुजरातच्या समर्थ विद्वानाकडून झालेली कदर पाहून आनंद व्हावा यांत आश्चर्य तें कसलें ? कवितेमध्यें सौष्ठवाच्या लालित्यापेक्षां भावनेची आणि नादाची गंभीरता विशेष आहे हें आपलें म्हणणें अगदीं खरें आहे.

अशा प्रकारचा कवितेचा आस्वाद घेण्यासाठीं ज्या प्रकारचे वाचक उत्सुक असतात त्यांच्यासारख्यांसाठींच मीं माझें आमंत्रण लिहिलें होतें.

त्या आमंत्रणाच्या शेवटच्या कंडिकेंत मीं जो गांधीयुगाच्या वैशिष्ट्याकडे इशारा केला आहे तो शैलीपरत्वें नसून आदर्शपरत्वें आहे, आणि तो आदर्शहि साहित्याचा नसून जीवनाचा आहे.

साहित्याच्या शैलीविषयीं माझें असें मत आहे कीं जीवनाचें संगीत जितकें समृद्ध असेल तितकी शैलीची विविधता देखील साहित्यांत यावयाचीच. जसा विषय, जसें विवेचन आणि जशी विवेचकाची वृत्ति तशी शैली आपोआपच तयार व्हावयाची. एखाद्या उत्सवाच्या प्रसंगीं प्रवचन करीत असतां जी शैली बोलली किंवा लिहिली जाईल तीच शैली विनोदलोलुप विद्यार्थ्यांच्या वाग्वर्धिनी सभेंत वापरूं पाहीन म्हटलें तरी तें शक्य नाहीं. पॉल रिशार भारतवर्षाला आपला संदेश विशिष्ट शैलींत ऐकवील. त्याचें अवलोकन आणि अभिनंदन त्याला लागू पडेल अशाच शैलींत निघावयाचें. लेखक आणि वक्ता यांच्या शक्तीच्या आणि वृत्तीच्या गहनतेचा अभाव ही मर्यादा तर नेहमींच राहावयाची.

गुजरातच्या विद्वानांनीं गुजराती भाषेची आजपर्यंत सेवा केली आहे. ती अवगणना करण्यासारखी मुळींच नाहीं. नर्मदाशंकरांनीं लोकांतील भ्रम आणि खराब रूढि यांच्याविरुद्ध जी गर्जना केली त्यामुळें जनतेची सेवा झाली नाहीं काय? आचार्य आनंदशंकर ध्रुवांनीं आपल्या धर्माचें रहस्य उकलेलें ती काय थोडथोडकी सेवा आहे? 'अभंगमाले' मध्यें जो भक्तिभाव प्रकट झाला आहे त्यानें काय हृदय उन्नत होत नाहीं? अंबालाल साकरलाल यांनीं आपल्या लेखांच्या द्वारें समाजाला मार्ग दाखविण्याचें जें कार्य केलें तें काय कमी महत्त्वाचें आहे? (ज्यांच्या ज्यांच्या साहित्यसेवेविषयीं माझ्या मनांत उच्च विचार आहेत त्या सर्वांचा येथें उल्लेख करण्याचा माझा इरादा नाहीं. मी कांहीं येथें साहित्यसभेच्या अध्यक्षाचें भाषण लिहिण्यास बसलों नाहीं, तर एका एकनिष्ठ साहित्यसेवकाला नम्रभावानें पत्र लिहीत आहें.)

गांधीयुगामध्यें गांधीजींच्या आणि देशांतील सर्वच प्रांतांच्या अनेक देशसेवकांच्या तपस्येची परिणति दिसून येते. लोकमान्य टिळक, रानडे, गोखले, भांडारकर, रवीन्द्रनाथ, अरविन्द घोष, स्वामी विवेकानंद, लाला

लजपतराय, हरदयाळ, मिसेस बेझंट, सर राधाकृष्णन् , आनंदकुमार स्वामी, भगिनी निवेदिता इत्यादि अनेक समाजसेवकांनीं जें चिंतन आणि जो पराक्रम जोपासला त्याचा परिपाक म्हणजेच गांधीयुग होय. गांधीजींना मी एकाकी भारतसेवक समजत नाहीं. त्यांची प्रतिभा राष्ट्रांतील या वेगवेगळ्या शक्तींचा समन्वय करूं शकली आणि राष्ट्राला लोकजागृति, धर्मसंस्करण आणि स्वराज्यप्राप्ति यांच्या दिशेकडे एकाग्र करूं शकली हीच त्यांची विशेषता. गांधीयुगाच्या पायामध्यें इतर अनेक वस्तूंबरोबर सुशिक्षितांच्या साहित्यसेवेलादेखील स्थान आहेच. गांधीयुगाचा महिमा हा कांहीं फक्त गांधीजींचा महिमा नव्हे; तर तो भारतवर्षाच्या भाग्योदयाचा महिमा आहे. गांधीजींचें नांव फक्त संज्ञारूप आणि अन्वर्थक आहे.

ज्या देशांतील अधिकांश लोकसंख्या अशिक्षित आहे, जेथील जनता नव्या जमान्यामध्यें जुन्या खानदानीचे संस्कार आणि आदर्श मोठ्या वेगानें विसरून जात आहे, नवे संस्कार संघटित स्वरूपांत अजून जनतेमध्यें दाखल झालेले नाहींत, आणि जेथें हिंदु, मुसलमान, पारशी इत्यादि भेदांमुळें जनता ओतप्रोत होण्यास अडखळते तेथें सर्वांना उद्देशून लिहिलेलीं लिखाणें, कवनें आणि केलेलीं भाषणें अगदीं साध्या शैलींत असणें आवश्यक आहे. साध्या शैलीमध्यें सर्व प्रकारची संस्कारिता, विचारांची सखोलता आणि चारित्र्याचें बळ येऊं शकतें हें गांधीजींनीं आपल्याला प्रथम दाखवून दिलें. सरदार वल्लभभाई तर खेडुतांचे सरदार; पण त्यांनीं आपल्या भाषणांत जी तेजस्विता, बंदुकीच्या गोळीची भेदकता आणि झोंबणारा विनोद इत्यादि गुण दाखविले आहेत तिच्यासाठीं तर गुजराती जनता अभिमानच बाळगील. आणि तें वाचण्यासाठीं लिहिलेलें 'आमंत्रण' खबरदारांसारखे बोटावर मोजण्याइतके अपवाद सोडून दिल्यास किती पारशी लोक समजूं शकतील ? मीं कांहीं तरी लिहिलें आणि श्री. अब्बाससाहेब तैयबजी अथवा डॉ. रजबअली तें समजूं शकले नाहींत तर मीं त्यांना दोष द्यावा कीं आपली भाषा सुधारावी ? पुष्कळ लोक उत्तर देतील कीं या दोन्ही गोष्टी करतां येणार नाहींत, आणि आज तरी मला तें उत्तर स्वीकारावें लागणार आहे.

भाषा ही समाजपरत्वें भिन्न भिन्न असते. जर आपण सर्व एकमेकांत ओतप्रोत होऊन गेलों तर आपली भाषा हळूहळू एकरूप व्हावयाचीच. गांधीयुगापूर्वींच्या समाजसुधारकांनीं समस्त जनतेला एकमेकांशीं ओतप्रोत होण्याकडे वळविलें नाहीं असें दुःखानें म्हणावें लागतें. सामाजिक रूढि तोडून थोडींशीं शिष्ट कुटुंबें कांहीं अंशीं एकमेकांत मिसळलीं खरीं; पण इतकेंच पुरेसें नाहीं. आजहि सर्व वर्ग एकमेकांत मिसळूं शकले आहेत असें म्हणतां यावयाचें नाहीं. पण त्याविषयीं जबरदस्त प्रेरणा लोकांना मिळून चुकली आहे आणि तिचा ओघ आतां थांबणार नाहीं.

अशा प्रकारें मी जें आदर्शभेदाविषयीं म्हणत आहें तें साहित्यपरत्वें नसून जीवनपरत्वें आहे. आणि त्यांतहि मी जुन्याला मुळींच दोष देत नाहीं. ज्याच्या खांद्यावर चढल्यानें मी दूरवर पाहूं शकतों त्यालाच अदूरदृष्टि म्हणण्याची चूक आणि धृष्टता मी करणार नाहीं. पण आदर्श उच्च झाला कीं दृष्टि दूरपर्यंत पोहोंचावयाचीच ही वस्तुस्थिति कशी नाकारतां येईल?

एका गोष्टीची मात्र मला टोंचणी लागत आली आहे. आपण इंग्रजी शिकलेले लोक जर इंग्रजी साहित्याचा उत्कृष्ट भाग आत्मसात् करून तें शुद्ध, चांगल्या आणि आजची जनता समजूं शकेल अशा भाषेंत व स्वरूपांत आणूं शकलों असतों तर त्यासारखें सुंदर काय झालें असतें? जनतेकडून पोषण घेऊन आपण इंग्रजी शिकलों त्याचा फायदा जनतेला द्यावयास हवा होता. जी गोष्ट इंग्रजीची तीच संस्कृत साहित्याची. आपण संस्कृत आणि इंग्रजी शिकलों खरे, दोन्हींतील विचारप्रणाली आणि भाषाशैली उत्तम प्रकारें मिसळून आपण गुजरातची सेवाहि केली, पण जनतेशीं पुरेसे ओतप्रोत झालों नाहीं. यामुळें आपण वाचकवर्ग तयार करूं शकलों नाहीं. लोक जुनी विद्वत्तापूर्ण शैली पेलूं शकले नाहींत हा दोष कांहीं लोकांचा नव्हे. आपण जितकी साहित्यसेवा केली त्याहून अधिक जर लोकसेवा केली असती तर जनतेच्या मनोभूमिकेशीं आपण समरस झालों असतों आणि ती आपलें सांगणें पेलूं शकली असती. आपण या प्रकारचाहि ज्ञातिभेद तोडण्याचा प्रयत्न केला असता तर


आपण केव्हांच लोकसम्राट् होऊन गेलों असतों. पण आपण लोकांना सांगितलें : "तुम्हीहि आमच्यासारखे इंग्रजी शिका, संस्कृत शिका आणि साहित्याचा आस्वाद घेण्याचे अधिकारी व्हा." या उत्तरांत कठोरता आणि बेजबाबदारी आहे हें आपण त्या वेळीं समजूं शकलों नाहीं.

आज देखील देशसेवक साहित्याचे द्वारा जितकी लोकसेवा करीत आहेत तितकी फक्त साहित्यसेवक करीत नाहींत. साहित्य हें नेहमीं जीवनाचें एक अंग समजलें पाहिजे. जीवनशुद्धि आणि जीवनसमृद्धि हें ज्या दिवशीं साध्य समजलें जाईल आणि साहित्य हें अशा अनेक साधनां-पैकीं एक पवित्र साधन समजलें जाईल तेव्हांच समाज आणि चारित्र्य या दोघांची उत्तम सेवा होईल.

हें सर्व आपल्याला माहीतच आहे; आणि त्याचा आपण स्वीकारहि करतां. मीं फक्त माझें मन्तव्य स्पष्ट करण्यासाठींच इतकें लिहिलें. विस्तारा-बद्दल क्षमा कराल.

थोड्याच दिवसांत पुन्हा तुरुंगांत जाणार आहें. शक्य झाल्यास मुंबईस आपल्याला भेटण्यास येईन.

सेवक
**काका कालेलकरचे**
वन्दे मातरम्.



## साहित्योपासना : : ७ :

कोणी परीक्षेंत उत्तीर्ण झाला, कुणाला मुलगा झाला, कोणाचा हरवलेला भाऊ सांपडला किंवा लॉटरीमध्यें कुणाला इनाम मिळालें तर त्याची बातमी देणारी तार आणणाऱ्याला तो कांहीं तरी बक्षिसी देतो. मालकाला तारेचें महत्त्व जितकें अधिक त्या प्रमाणांत तारवाल्याविषयीं एक प्रकारची कांहींशी उपकारबुद्धि त्याच्या मनांत असते. आणि म्हणून चांगलेंसें बक्षिस देऊन उपकार फेडण्याचा तो प्रयत्न करतो. खरें पाहिलें असतां तार आणणाऱ्याचा उपकार तो कसला ? तारेंतील बातमींतील सत्यस्थिति निर्माण करण्यांत त्याचा हिस्सा थोडाच असतो ? मनिऑर्डर किंवा पार्सल देणाऱ्या पोस्टमनचेंहि असेंच असतें.

तरी पण आनंदमूढ होणें हा मनुष्याचा स्वभाव आहे. असें असूनहि मनुष्यस्वभावामुळें इनाम मिळालेली रक्कम खिशांत टाकणारा तारवाला जर स्वतःची पाठ थोपटून घेऊं लागला तर त्याच्यासारखा मूर्ख तोच.

अध्यापकाच्या खुर्चीवर बसून विद्यार्थ्यांना सुंदर साहित्य वाढण्याचें

काम जे लोक करतात त्यांच्याविषयींसुद्धां अशाच प्रकारची कृतज्ञताबुद्धि विद्यार्थ्यांच्या मनांत वास करीत असते. साहित्यक्षेत्रांतील उत्तम उत्तम फळें वेंचून काढण्यांत अध्यापकाची कुशलता, सदभिरुचि आणि विद्यार्थ्यांचें कल्याण समजण्याची सद्‌बुद्धि या सर्व गोष्टींना महत्त्व आहे याविषयीं शंका नाहीं. परंतु जणुं काय या परिपक्व साहित्यफळांना स्वतःच जन्म दिला आहे असा गर्व जर तो अध्यापक करूं लागेल तर त्याचें तें कृत्य हास्यास्पद ठरेल.

आपल्याला ज्या वस्तूमुळें आनंद झाला असेल त्याच वस्तूचा आपल्या सांगण्यावरून आस्वाद घेण्यानें दुसरा माणूस जर आपल्याइतकाच आनंदित झाला तर तसें करण्यानें त्यानें आपला आनंद द्विगुणित करण्यांत मदत केली हा त्याचाच आपल्यावर उपकार झाला असें समजणें कदाचित् जास्त बरोबर होईल.

* * *

तें कसेंहि असो. दुनियेकडे पाहण्याची दृष्टि आणि जीवन उन्नत करण्याचा मार्ग ज्या साहित्यांत विशद आणि सुभग रीतीनें व्यक्त झाला असेल तें साहित्य फक्त वाचून राहूं देण्यासाठीं नसतें, तर अमृतमय **रसायना**प्रमाणें त्याचें विधिपुरस्सर आदरयुक्त सेवन करावयाचें असतें. परंतु जो एक वेळ साहित्योपसेवी ठरतो त्याला तूप किंवा खीर वाढण्याच्या दर्वी (पळी) प्रमाणें फक्त वाढण्याचा आनंद घेऊनच बसून राहण्याची सवय पडते आणि तें पक्वान्न कशा प्रकारें लोकांच्या पुढें वाढलें असतां हुशार वाढप्याच्या वांट्यास येणारी वाहवा स्वतःला मिळेल याचाच तो विचार करीत असतो. हें दर्वीव्रत निष्काम असो किंवा सकाम असो जीवनाला उन्नत करणारें मात्र खास नाहीं.

खरें पाहिलें असतां साहित्य—उच्च साहित्य—हें हृदयांत आभिजात्य उत्पन्न करणारें आणि जीवनाला उन्नत करणारें एक साधन मात्र आहे. उत्तम साहित्याचा फक्त प्रचार करण्याऐवजीं तें साहित्य पचवून, आपलें जीवन उन्नत करून, त्या जीवनाचा सुवास सेवेच्या द्वारा पसरवून समाजाला आणि स्वतःला कृतार्थ केलें पाहिजे. अशा तऱ्हेची सेवा करतां करतां आपल्यालाहि कधीं कधीं सरस्वतीवैखरीचा उपयोग करण्याची संधि प्राप्त

होतें, आणि आपल्या हातून किंवा तोंडून प्रसन्न साहित्य निर्माण होतें. अशा प्रकारें होणारा साहित्याचा प्रचार अपरिहार्य, सहज आणि शुभ-परिणामकारी होतो.

उत्तम साहित्य पाहिल्यानंतर मनामध्यें फक्त वाढप्याची वृत्ति निर्माण होतां कामा नये, तर 'इष्टैः सह भुज्यतां' या प्राचीन आज्ञेनुसार किंवा सामाजिक मनोवृत्तीप्रमाणें त्याचें सेवन करून इष्टमित्रांच्या बरोबर आपलें जीवन उन्नत आणि परिपुष्ट करण्याकडेच आपली प्रवृत्ति असली पाहिजे.

येथपर्यंत केलेल्या विवेचनांत एखादी असाधारण गोष्ट सांगितली आहे अशांतला भाग नाहीं. परंतु वाढपीवृत्तीचा दोष आजकालचे अध्यापक, लेखक, प्रचारक, कवि आणि पत्रकार या सर्वांमध्यें खूप वाढला आहे व त्यामुळें साहित्याचें सेवन करून साधनेच्या द्वारा तें पचवून जीवन उन्नत करण्याकडे इतकी बेदरकारी होऊं लागली आहे कीं शहाण्या लोकांनासुद्धां ही लहानशी सूचना करण्याची जरूर भासत आहे.

* * *

कोणताहि ग्रंथ वाचतेवेळीं ग्रंथकाराची वृत्ति आणि दृष्टि यांचेशीं तदाकार होऊन तो वाचावा. परंतु कधींहि ग्रंथाविषयीं प्रामाण्यबुद्धि उत्पन्न होऊं देऊं नये. ज्ञान कोठूनहि मिळो, कसलेंहि मिळो, तरी पण तारतम्य-बुद्धि ही स्वतःचीच असली पाहिजे. प्रत्येक ग्रंथाचें कालिक, दैशिक आणि वैयक्तिक संस्करण करावेंच लागतें. हें जो करूं शकतो त्याचेंच वाचन सफळ आणि कृतार्थ होतें.

हिंडलगा जेल, १९३२.



## प्रेरक साहित्य : : ८ :

साहित्याचे सामान्यपणें दोन विभाग करण्यांत येतात : विचारप्रेरक आणि आचारप्रेरक. जें साहित्य वाचल्यानें माणसाला उठून काम करण्याची बुद्धि होईल, स्वतःच्या जीवनांत व समाजांत मोठें परिवर्तन करण्याची इच्छा होईल, अशा साहित्याला आचारप्रधान किंवा पुरुषार्थी साहित्य म्हणतां येईल. साहित्याचे आपल्याला दुसऱ्या प्रकारें आणखी दोन भाग पाडतां येतील : अनुभवप्रधान साहित्य आणि कल्पनाप्रधान. मनुष्यजातीच्या प्रगतीच्या अग्रभागीं नेहमीं कल्पनाच असते. कल्पना हें मनुष्याच्या नावेचें शीड होय. पण जर नावेंत अनुभवाचें ओझें नसेल तर वारें तिला कोठें घेऊन जाईल आणि केव्हां खडकावर नेऊन आपटील हें सांगणें कठीण आहे.

डिसेंबर, १९२९.

## साहित्याची आजची एक कसोटी : : ९ :

संस्कारी लोकांची बाजू घेऊन राजा भर्तृहरीनें साहित्य, संगीत आणि कला यांनीं विरहित असलेल्या लोकांना शिंगें आणि शेपूट नसलेले पशु म्हटलें आहे. असें लिहितांना भर्तृहरीच्या मनांत साहित्याविषयीं किती उच्च कल्पना असली पाहिजे ! आजच्या प्रथेला अनुसरून जर आपण त्या साहित्यस्वामीला विचारिलें असतें कीं 'तुझी साहित्याची व्याख्या काय ?' तर लागलीच एका वाक्यांत तो म्हणाला असता, 'नरपशूला जें पुरुषोत्तम बनवूं शकेल तें साहित्य'. भर्तृहरीचा एकान्ततो निःस्पृह पंडित लोभाला किंवा कीर्तीला भुलणार नाहीं, राजालाहि डरणार नाहीं. अशा माणसांनाच आपण साहित्यवीर म्हणूं शकतों.

साहित्य ही एक दैवी शक्ति आहे. या शक्तीच्या जोरावर निर्धन मनुष्यसुद्धां लोकप्रभु होऊं शकतो; आणि महान् सम्राटहि राजदंडानें जें करूं शकत नाहींत तें शब्दशक्तीच्या द्वारें तो सहज साधतो. राजाला स्वतः-जवळ पगार देऊन 'प्राणत्राणप्रवणमति' असे हृदयशून्य शिपाई ठेवावे

लागतात; तर साहित्यसम्राटाजवळ सहृदय सज्जनांची स्वयंसेवी फौज नेहमीं खडी असते. सच्चा साहित्यवीर असें म्हणूं शकणार नाहीं कीं अमुक एक वस्तु मला अशक्य आहे. साहित्याची दीक्षा घेतल्यानंतर त्यानें प्रत्येक न्याय्य आणि धर्म्य कार्य आपलेंच समजलें पाहिजे. सुखी लोक फुरसतीच्या वेळीं वेळ घालविण्यासाठीं कांहींतरी सरस वाचावयाला मागतात तेवढ्याचा पुरवठा केला आणि भाषासौंदर्याचे नवे नवे प्रकार उत्पन्न केले म्हणजे झाली साहित्यसेवा असें कोणीहि समजूं नये. लोकांना उत्साह द्यावयाचा, लोकांची शुभवृत्ति जागृत करावयाची, सरस्वतीच्या प्रसादानें लोकांचें धर्मतेज प्रज्वलित करावयाचें हें साहित्यकाराचें काम होय. फक्त लोकरंजन करणें, लोकांमध्यें ज्या ज्या वृत्ति उत्पन्न होतील त्या सर्वांना खाद्यसामुग्री पुरविणें, हा कांहीं साहित्यकाराचा धंदा नव्हे. 'अशा लोकांमध्यें मी नाहीं' असें सांगतांना भर्तृहरीनें गायलें होतें:—

**न नटा न विटा गायकः न परद्रोहनिबद्धबुद्धयः** —इ०

सौंदर्याबरोबर शील असेल तरच तें शोभतें, साहित्याबरोबर सात्त्विक तेज असेल तरच तेंहि कृतार्थ होणार.

आपल्या या युगामध्यें माणुसकीची कसोटी करणारा एक मोठा सवाल आपल्यापुढें उभा आहे. प्रत्येक मनुष्याला तो कसत असतो, मग तो राजसेवक असो किंवा लोकसेवक, धर्माधिकारी असो वा अर्थाधिकारी, हिंदु असो वा हिंद्वितर. शेतांत हिंडत असतां धोतरामध्यें जशीं कुसळें घुसतात त्याप्रमाणें अस्पृश्यता आपल्या समाजांत, आपल्या समजुतींत घुसलेली आहे. ती जोंपर्यंत मुळांतून निघून जाणार नाहीं तोंपर्यंत आपल्याला शान्ति मिळणार नाहीं.

राजकारणी लोक कंबर कसून तिच्या मागें लागले आहेत. सामाजिक रूढींविषयीं उदासीन असलेल्या आपल्या साधुसंतांनीं या अस्पृश्यतेला बदनाम करण्यासाठीं आपली प्रासादिक वाणी वापरली आहे. महाराष्ट्रांत वाण्यांमध्यें तुकाराम आणि ब्राह्मणांमध्यें गृहस्थाश्रमी एकनाथ व ब्रह्मचारी रामदास अस्पृश्यता सहन करूं शकत नव्हते. गुजराथेंत ज्ञानी संत अखा

आणि भक्तशिरोमणि नरसैया अस्पृश्यता दूर करण्यासाठीं धर्मवीराप्रमाणें लढले आहेत. आजच्या काळीं श्रद्धामूर्ति श्रद्धानंदजींचें बलिदानहि याच कारणासाठीं दिलें गेलें आहे. साहित्यवीरांनीं पण आपली शक्ति– नव्हे शक्तिसर्वस्व– याच धर्मकार्यासाठीं आज वापरलें पाहिजे. अस्पृश्यता-निवारण हा आपला युगधर्म होय. आपण मरून जाऊं तत्पूर्वी अस्पृश्यता मरून गेलीच पाहिजे. नाहीं तर सनातनधर्महि टिकण्याची आशा नको.

आजचें साहित्य या एका वीरकर्माच्या सफलतेसाठीं काय काय करायला तयार आहे हें पाहावयाचें आहे. —१९२९.



## साहित्यसेवा : : १० :

मी साहित्यसेवक नाहीं, साहित्योपासक पण नाहीं. साहित्यप्रेमी मात्र अवश्य आहें. मीं साहित्याचा आस्वाद घेतलेला आहे. त्याची छाप मजवर पडलेली आहे. मला असें दिसून आलें आहे कीं उत्तम साहित्य बुद्धीला प्रगल्भ करतें, भावनांना सूक्ष्म बनवितें, अनुभवाला पिंजून विशद करतें, धर्मबुद्धीला जागृत करतें, हृदयाच्या वेदनेला व्यक्त आणि तेजस्वी करतें, समभाव उत्पन्न करतें आणि आनंदाला स्थायी करतें. यामुळें साहित्याविषयीं माझ्या मनांत आदर आहे. पण मीं माझी निष्ठा साहित्याला अर्पण केलेली नाहीं. साहित्याला मी आपली इष्ट देवता मानीत नाहीं. साहित्याला मी साधन म्हणूनच स्वीकारतों. आणि तें साधन म्हणूनच राहावें असें– मला क्षमा कराल तर मी म्हणेन कीं– मी इच्छितोंहि. तुळसीदासाच्या मनांत हनुमानाविषयीं आदर होता; पण त्याची निष्ठा तर श्रीरामचंद्रांवरच होती. त्याचप्रमाणें मला असें वाटतें कीं आपली उपासना ही जीवनाचीच

असावी. साहित्य हें जीवनरूपी प्रभूची सेवा करणाऱ्या अनन्यनिष्ठ भक्ताच्या ठिकाणींच शोभतें. तें जेव्हां स्वतःचीच उपासना सुरू करतें तेव्हां तें आपला धर्म विसरून जातें. मनुष्य जर आपल्याच सुखाचा विचार करूं लागला, स्वतःच्याच सुखसोयी शोधण्यांत आपली बुद्धि खर्च करूं लागला आणि आपल्या आनंदांतच स्वतः रममाण होऊं लागला, तर ज्याप्रमाणें त्याचा जीवनविकास कुंठित होतो, आणि त्याच्यांत विकृति उत्पन्न होते त्याप्रमाणें साहित्याचेंहि आहे. साहित्यासाठीं साहित्य जेव्हां उत्पन्न होतें, म्हणजे लोक जेव्हां साहित्याची केवळ साहित्य म्हणूनच उपासना करतात, तेव्हां सुरुवातीला तर तें सर्व सुंदर दिसतें, अधिक आकर्षक वाटतें, त्याची जुनी पुण्याई जोंपर्यंत संपलेली नाहीं तोंपर्यंत त्याचा खूप विकास होत आहे असेंहि वाटतें, पण तें निःसत्त्व होत जातें. साहित्याला त्याचें पोषण साहित्यामधून नव्हे तर जीवनामधून, मनुष्याच्या पुरुषार्थामधून मिळालें पाहिजे. साहित्यामधूनच पोषण मिळविणारें साहित्य कृत्रिम होय; तें आपल्याला पुढें नेऊं शकत नाहीं.

अशा प्रकारें माझे विचार कांहींसे संकुचित अथवा जहाल असल्यामुळें 'केवळ साहित्याच्या उपासकांना' मी घाबरतों. त्यांचा देव वेगळा आहे, माझा देव वेगळा आहे. पण साहित्योपासक खूप उदार असतो. मी साहित्योपासक नाहीं तरीहि ते कबूल करतात कीं 'अविधिपूर्वकम्' का होईना पण मी साहित्याचेंच यजन करतों. कारण मी 'श्रद्धयान्वित' आहें. म्हणून साहित्यविषयक माझे कांहीं विचार आपल्यासमोर मांडण्याची धृष्टता मी करीत आहें. आपणा सर्वांच्या उदारतेवर माझा विश्वास आहे.

माणसाचे विचार, त्याच्या कल्पना, समजुती, भावना अथवा भावना-प्रधान अनुभव दुसऱ्यापुढें परिणामकारक रीतीनें व्यक्त करण्याची शक्ति ज्या वस्तूंत आहे तें साहित्य, ही माझ्यापुरती साहित्याची व्याख्या आहे. तार्किक लोक एका क्षणांत तिला उधळून लावूं शकतील हें मला माहीत आहे. पण अपूर्ण माणसानें केलेल्या व्याख्या अपूर्ण असल्या तर त्यांत नवल तें काय ? ज्यामध्यें भावनांवर अनायासें प्रभाव पाडण्याची शक्ति आहे तें साहित्य. संसर्गजन्यता हा साहित्याचा प्रधान गुण होय.

दा. क. १५१९८

हा प्रभाव चांगलाहि असेल आणि वाईटहि असेल. भावना या मनुष्य-जीवनाचें जवळ जवळ सर्वस्व असल्यामुळें त्यांच्यावर ज्या गोष्टींचा परिणाम होतो त्या गोष्टीविषयीं बेदरकार राहणें आपल्याला परवडणार नाहीं. हवा, पाणी, अन्न वगैरे शुद्ध ठेवण्याचा ज्याप्रमाणें आपण आग्रह धरतों, अथवा धरला पाहिजे, त्याप्रमाणें–.किंबहुना त्याहूनहि अधिक–साहित्याच्या शुद्धीविषयीं आपला आग्रह असला पाहिजे. शीलाप्रमाणें जेथें साहित्याचा सांभाळ केला जातो तेथें जीवन हें पवित्र, प्रसन्न आणि पुरुषार्थी व्हावयाचेंच. उच्चारशुद्धि, जोडणी (स्पेलिंग)ची शुद्धि, व्याकरण-शुद्धि वगैरे प्राथमिक वस्तूंपासून थेट साहित्याच्या एकूण एक अंग-प्रत्यंगापर्यंत शुद्धीचा आग्रह असला पाहिजे; मात्र त्यांत कृत्रिमता येऊं नये; वरपांगीपणा किंवा भपका येऊं नये, दंभ येऊं नये, कर्मकांड येऊं नये.

निर्व्याज मुग्धता ही शुद्धीची एक बाजू आहे आणि संस्कारिता ही दुसरी बाजू आहे. दोन्ही रीतींनीं शुद्धि राखतां येईल. पण जर आपण शिथिलतेचेच पाठीराखे झालों आणि जर प्रत्येक प्रकारच्या विकृतीकडेहि काणाडोळा करण्यास तयार झालों, जर सामाजिक जीवनांत सदाचाराचा आणि साहित्यांत शुद्धीचा जो कोणी थोडा पण आग्रह धरील त्याच्या-विरुद्ध अकांडतांडव माजवून त्याला गप्प बसविण्याचा प्रयत्न करूं लागलों तर त्यापासून समाजाचें अतोनात नुकसान होईल. सामाजिक जीवनांत काय किंवा साहित्यांत काय शुद्धि राखण्याची जबाबदारी विशिष्ट श्रेष्ठ वर्गाचीच असते. पोलिसांच्या किंवा कोर्टांच्या द्वारें सामाजिक सदा-चाराचा सर्वोच्च आदर्श टिकणार नाहीं. साहित्याचेंहि तसेंच आहे. समा-जाचे स्वाभाविक पुढारी जेव्हां शिथिल होतात, भीरु होतात अथवा उदासीन होतात, तेव्हां समाजाला वांचविणारी एकहि शक्ति उरत नाहीं.

हें खरें आहे कीं साहित्याची प्रवृत्ति नेहमीं समाजसेवेसाठींच होते असें नाहीं. मानसिक आनंद, समाधान, व्यग्रता किंवा व्यथा प्रकट करण्याची, शब्दबद्ध करण्याची मनुष्यामध्यें जी एक सहजवृत्ति आहे तींतूनच साहित्याचा उद्गम होतो; संगीताप्रमाणें साहित्याचा आनंदहि मनुष्य

एकएकटा घेऊं शकतो; तरी पण सर्व वाग्व्यापार सामाजिक जीवनासाठीं आहे. साहित्याची प्रवृत्ति मुख्यत्वें आपलें भावनाप्रधान मनन किंवा उद्गार यांना दुसऱ्यामध्यें संक्रांत करण्याच्या इच्छेनें होते. यामुळें साहित्य ही मुख्यत्वें सामाजिक वस्तु आहे असें म्हणतां येईल. जीवनांतील सर्वच चांगल्या वस्तूंप्रमाणें साहित्य आत्मनेपदी पण आहे आणि परस्मैपदी पण आहे. मनुष्याचे सर्वोच्च सद्गुण त्याच्या सामाजिक जीवनामधून उद्भवतात. इतर सर्व तर राहूंच द्या, पण अन्यनिरपेक्ष मोक्षेच्छा सुद्धां आत्मौपम्यासाठीं असते; म्हणजे तिची सुरवात आणि अंत सामाजिक जीवनाच्या कृतार्थतेबरोबरच असतात. साहित्याविषयीं देखील असेंच म्हणतां येईल. गायनाबरोबर ज्याप्रमाणें तंबोऱ्याचा ध्वनि तान घेतच असतो, त्याप्रमाणें साहित्याच्या सगळ्या विस्तारांत प्रजाहिताचा, लोककल्याणाचा सूर कायम राहिलाच पाहिजे. जें कांहीं त्याहून विसंवादी असेल तें संगीत नसून कोलाहल होय. तें साहित्य नव्हे तर मानसिक जहर होय.

एकदां हिंदुस्तानांतील ऐतिहासिक पुरुषांच्या यादींत मीं भगवद्गीतेचें नांवहि जोडलें होतें. जिच्या व्यक्तित्वाची छाप समाजावर वेगवेगळ्या वेळीं वेगवेगळ्या प्रकारें पडते आणि म्हणून जिच्या जीवंतपणाचा अनुभव हमेशा होत असतो ती व्यक्ति अथवा पुरुष अशी व्याख्या केली तर भगवद्गीतेला राष्ट्रपुरुष म्हणण्यांत औचित्याचा भंग नाहीं असें मानतां येईल. साहित्याविषयीं सुद्धां असेंच आहे. साहित्य हें या ना त्या प्रकारें सामर्थ्य प्रकट करणाऱ्या व्यक्तीचें हृदयसर्वस्व असल्यामुळें व्यक्तीच्या प्रभावाप्रमाणें त्याचाहि प्रभाव असतो. प्रभु, मित्र किंवा कान्ता यांच्याशीं साहित्याची तुलना करणाऱ्या साहित्याचार्यानें हीच गोष्ट वेगळ्या रीतीनें सांगितली आहे. 'प्रभु'च्या जागीं आपण आज 'गुरु' हा शब्द जास्त पसंत करतों. गुरु, मित्र आणि जीवनसहचरी– तिन्ही संबंध पवित्र आहेत, उदात्त आहेत. साहित्याचें ब्रीद असेंच असलें पाहिजे. सामाजिक व्यवहारांत आपण वाटेल त्या माणसाला घरांत घुसूं देत नाहीं. चोर, शठ, पिशुन किंवा भुजंग यांच्या कोटीच्या लोकांना आपण उंबऱ्याच्या आंत

मराठी ग्रंथ संग्रहालय

पाऊल टाकूं देत नाहीं. साहित्यावर देखील आपला असाच पहारा असला पाहिजे; आणि तो आपला स्वतःचाच असला पाहिजे. अपवित्र मनुष्य वाटेल तितका विवेकी असला तरी ज्याप्रमाणें आपण त्याला आपल्या मुलांशीं मोकळेपणानें मिसळूं देंत नाहीं त्याचप्रमाणें पापाचरणाला उत्तेजन देणाऱ्या साहित्यालाहि आपण आपल्या घरांत शिरूं देतां कामा नये. आणि घराबाहेरील व्यवहारांत जेथें सर्वच प्रकारच्या लोकांशीं संबंध येतो तेथें बऱ्यावाईट गोष्टींची पारख करण्याची कला ज्याप्रमाणें आपण आपल्या मुलांना अर्पण करतों आणि अतिप्रसंगी माणसाला दूर ठेवण्याचें शिकवितों त्याप्रमाणें साहित्यांतहि दुष्ट साहित्याच्या हावभावांना बळी न पडतां त्याला दूर ठेवण्याची कला मुलांना शिकविली पाहिजे.

पण आजचें वारें अशा प्रकारचें नाहीं हें मला माहीत आहे. शिष्टाचाराचे जुने तट तोडण्याचाच प्रयत्न आपण करूं लागलों आहोंत. त्यांचे जागीं नव्या आदर्शांच्या नव्या मर्यादा तयार करण्याचें आपल्याला सुचलेलें नाहीं. कृत्रिम किंवा यांत्रिक कुंपणाची शिफारस मी देखील करीत नाहीं. पण समाजहृदयांत कांहीं ना कांहीं आदर्श हा असलाच पाहिजे. आणि तो आदर्श संभाळण्याचा आग्रह बाळगणारे समाजधुरीणहि असले पाहिजेत. ते जर आपलें हें स्वभावसिद्ध कुलव्रत सोडून देतील तर संस्कृति कशी टिकणार ? संस्कृति ही शेगडींतील आगीप्रमाणें जोंपर्यंत हवा असेल तोंपर्यंतच टिकणारी वस्तु आहे. पुरुषार्थ आणि जागृति यांच्या पहाऱ्याशिवाय एकहि संस्कृति टिकलेली नाहीं. संस्कृतीला निसर्गावर सोपवून देतां येणार नाहीं. पण आज तर आपण जणूं काय सामाजिक अराजकच पसंत करीत आहोंत असें दिसतें. जुनी व्यवस्था टिकूंच शकणार नाहीं ही गोष्ट तर धडधडीत दिसत आहे; आणि ती टिकूंहि नये. पण जुन्या व्यवस्थेच्या ठिकाणीं नवी व्यवस्था रचण्याइतकें प्राणबळ आपल्या समाजांत असलें पाहिजे.

कायद्याच्या अंकुशाच्या गोष्टी मी बोलत नाहीं. मला तर असेंच वाटतें कीं साहित्यावर कायद्याचा अंकुश कमींत कमी असला पाहिजे. सदाचाराच्या सर्वोच्च कोटीचा विचार करून कायदा चालत नसतो.

कायद्याचे डोळे स्थूल असतात, जड असतात; आणि त्याचे उपाय असंस्कारी असतात. साहित्यावर अंकुश असला पाहिजे लोकमताचा. लोकमताचा म्हणजे संस्कारी, उदार, चारित्र्यवत्सल समाजधुरीणांचा. असें कांहीं करायला आजचा समाज तयार नाहीं हें मला माहीत नाहीं असें नाहीं. पण अशानें समाज स्वतःचेंच नुकसान करून घेत आहे असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. 'नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम्' ही सबब पुढें करून आपल्याला सर्वच मर्यादांना छेद तर द्यावयाचा नाहीं ना ?

साहित्य हा कलेचाच एक भाग आहे. म्हणून आपण कलेचे नियम त्यालाहि लावतों. कलेसाठींच कला आहे, कला कधींहि कुठल्याहि बाह्य वस्तूचा अंकुश स्वीकारणार नाहीं असें म्हणणारे केवळ कलावादी नीतिच्या अंकुशाची नेहमीं हेटाळणी करीत आले अहेत. 'स्वात्मनि एव समाप्त महिमा' अशी ही केवळ कला बघतां बघतां निरर्गल, स्वार्थी बनून जाते. आणि स्वार्थाबरोबर सत्त्व कधीं टिकलें आहे ? Art for Art's sake ची परिणति Art for Artist's sake मध्यें होऊन जाते.

कलेनें नीतीचा अंकुश स्वीकारलाच पाहिजे असा माझा आग्रह नाहीं. पण याचें कारण वेगळें आहे. साहित्याजवळ त्याचें स्वतःचें गांभीर्य, स्वतःची प्रसन्नता आणि पवित्रता कां असूं नये ? हास्यविनोद कांहीं या तिघांचा विरोधक नाहीं. उलट तो या तिघांना उच्च कोटीस पोहोंचवून दाखवूं शकतो. साहित्यानें जर स्वधर्माचें पालन केलें तर त्याला नीतीचा अंकुश स्वीकारावा लागणार नाहीं. साहित्य जेव्हां हीन अभिरुचि आणि कलाशत्रु-विलासितेच्या गुत्त्यांत जाऊन पडतें तेव्हांच नीतीला नाइलाजानें त्याला तेथून उठवून घरीं आणावें लागतें. स्वराज्यांत किंवा सुराज्यांत सदाचारी आणि स्वयंशासित नागरिकांना नगररक्षकांना घाबरण्याचें कारण राहत नाहीं.

पण कला आणि साहित्य एकच वस्तु नाहींत. सुंदरता ही साहित्याचें भूषण आहे पण ती साहित्याचें सर्वस्व नव्हे. साहित्याचें सर्वस्व, साहित्याचा प्राण म्हणजे ओजस्विता होय, विक्रमशीलता होय, सत्त्ववृद्धि होय. जीवनाच्या विविध क्षेत्रांत पौरुषाची वृद्धि करण्यांतच साहित्याची उन्नति आहे.

विषयसेवन हें समाजांत इतकें का क्षीण झालें आहे कीं विलासप्रेरक साहित्याच्या द्वारें त्याला उत्तेजन देण्याची गरज उत्पन्न व्हावी ? समाजा-प्रमाणें साहित्यालाहि देहधाऱ्याच्या नियमांना वश होऊन उच्चनीच स्थिति भोगाव्या लागतात. जेव्हां समाजाचा संपूर्ण उत्कर्ष होऊन चुकला असेल, त्यामुळें येणाऱ्या समृद्धीचाहि शीण आला असेल, त्या वेळीं समाजानें विला-सितेंत बुडून जाऊन सर्वस्व गमावण्यास खुशाल तयार व्हावें. पण जेव्हां पतित समाज मनुष्यजातीवर येणाऱ्या सर्वच आपत्तींचें दुर्दैवी संग्रहस्थान बनला असेल, कोट्यवधि जीवांचा भुकेनें नसला तरी निराशेनें छळवाद मांडला असेल, जिकडे तिकडे पुरुषार्थाला ओहोटीच लागलेली दिसत असेल आणि पावसाळ्यांतील काळ्याकुट्ट अंधाऱ्या रात्रीप्रमाणें चोहोंकडे अज्ञान पसरलेलें असेल, अशा वेळीं तरी हृदयाची दुर्बलता वाढविणारें, नामर्द वासनांना सुंदर करून दाखविणारें, आणि अनेक हीन वृत्तींचा बचाव करणारें घातकी साहित्य उत्पन्न करूं नये. चढण्यापूर्वीच पडण्याची कसली तयारी ?

सिंहासनबत्तिशी आणि वेताळपंचविशी यांच्या वातावरणांतून आपण जरा कुठें वर आलों आहोंत तों त्याच वातावरणाच्या सुधारलेल्या आणि चतुर आवृत्त्या काढून आपली उन्नति होणार आहे काय ? दुर्गुणाचें कले-वर सुंदर असेल, त्याचा पोशाख प्रतिष्ठित असेल, पण एवढ्यावरूनच कांहीं तो कमी मारक ठरत नाहीं. उलट तो अधिकच धोक्याचा ठरतो.

आपल्या समाजव्यवस्थेच्या सुंदरतेचें आपण वाटेल तितकें जरी वर्णन केलें तरी आज तिच्यांत एक उणीव तर स्पष्ट दिसून येत आहे. एके काळीं आपण सर्व संस्कृतांतच लिहीत असूं. यामुळें आपले प्रौढ आणि ललित विचार सामान्य समाजाला दुष्प्राप्य झाले होते. पण त्या वेळीं संतकवि आणि कथाकीर्तनकार तो सर्व किंमती माल आपल्या कुवतीप्रमाणें स्व-भाषेच्या फुटकळ दुकानांत स्वस्त दरानें विकीत. मोंगलांच्या वेळीं उर्दूची प्रतिष्ठा वाढली, आणि आरबी-फारसी भाषांमधून कवींना प्रेरणा मिळूं लागली. इंग्रजी जमाना सुरू झाला आणि आपलें सर्व मानसिक खाद्य इंग्रजीमधून घेण्याची आपल्याला सवय पडली. त्याचा बरावाईट प्रभाव

आपल्या मनोरचनेवर पडला आहे; साहित्यावर तर तो पडलाच आहे. आजकालचीं आपलीं वर्तमानपत्रें आणि मासिकें नव्या युगाचे विचार किरकोळ भावानें विकण्याचें काम करूं लागलीं आहेत. पण या तिन्ही युगांमध्यें गरीब वर्गासाठीं, खेडुत आणि मजूर यांच्यासाठीं, स्त्रियांसाठीं आणि मुलांसाठीं विशेष प्रयत्न झालेले नाहींत. अशिक्षित समाजांतहि त्यांचा सामाजिक प्राण कांहींसें साहित्य उत्पन्न करीत असतो. आपल्या संस्कारी देशांत साधुसंतांच्या कृपेनें त्यांत अमुक एक वाढ झाली याबद्दल आश्चर्य करण्याचें कारण नाहीं. पण आपण मुख्यत्वें मध्यमवर्गाचाच हमेशा विचार करीत आलों आहोंत. गरीब लोकांचें जीवन संतोषमय, आशामय आणि संस्कारमय करण्याचें धार्मिक कर्तव्य आपलें आहे हें आपण विसरलों आहोत. धूमकेतु किंवा द्विरेफ यांच्यासारख्या लेखकांच्या मूठभर गोष्टी सोडून दिल्या तर आपल्या गोष्टींमध्यें आणि कादंबऱ्यांमध्यें गरिबांच्या करुण काव्यमय जीवनाचा विचारसुद्धां असत नाहीं. पुराणकारांनीं ज्याप्रमाणें अमृत, अप्सरा आणि हेवा वाटण्यासारखा स्वर्ग यांची कल्पना केली, त्याप्रमाणें आजचे कादंबरीकार वकील-बॅरिस्टर झालेला, विलायतेला जाऊन आलेला, किंवा मृत्युपत्रानें ज्याला खूप पैसा मिळालेला आहे असा एखादा रिकामटेकडा माणूस कल्पितात आणि त्याच्या आत्मसंतुष्ट अशा निरर्थक जीवनाचा विस्तार वर्णन करतात. जातिभेद आपल्या मनोरथांतसुद्धां इतका कांहीं व्यापून राहिलेला आहे कीं मध्यमवर्गाच्या बाहेरील दुनिया आपण पाहूं शकत नाहीं. अगदीं गरीब लोकांचें जीवन आपल्याला दयापात्र पण रहस्यशून्य वाटतें. इसापाच्या त्या सांबराप्रमाणें आपण डोकीवरील शिंगांच्या अभिमानांत हडकुळ्या पायांचा तिरस्कार करूं लागलों आहोंत; अथवा तिरस्कार करण्याइतपत देखील ध्यान त्यांच्याकडे देत नाहीं. कर्म आणि पुनर्जन्म यांच्या सिद्धान्ताचा आश्रय घेऊन आपण आपला अनाथद्रोह झाकून टाकतों. अनाथांची सेवा तर दूर राहिली, त्यांचें स्मरणसुद्धां आपण करीत नाहीं. इंग्रज कवि हूड याच्या Song of the Shirt ची बरोबरी करील असें मौलिक काव्य आजच्या काळच्या सुशिक्षितांमधून कोणीं लिहिलें आहे काय ? इसापाच्या सांबराची जी गत झाली तीच गत

आपली नेहमीं होत आली आहे. आणि आतां तर विनाश होऊं पाहत आहे. आपलें लोकप्रिय साहित्य आपल्या सामाजिक स्थितींचें सूचन करतें. हृदयांत असेल तेंच ओठावर येणार ना? गरिबांची गांजणूक कोठें आहे, त्यांचें दुःख काय आहे, त्यांचा प्रश्न किती बिकट आणि विशाल आहे याचा जबाबदार विचार करून प्रश्नाला शोभेल अशी योजना तयार केली असेल तरच गरिबांना कांहीं आशा वाटणार ना? ज्याची ऐरण चोरा-वयाची त्यालाच जर आपण दान म्हणून सुई देत असूं तर ती घेतांना घेणाऱ्याच्या मनांत कोणती भावना उत्पन्न होईल? आपलें साहित्य जर आपल्याला आपला युगधर्म सांगणार नाहीं, आणि तो धर्म पाळण्याची आपल्याला प्रेरणा देणार नाहीं, तर तें इतर सर्व प्रकारें उत्कृष्ट असलें तरीहि विफलच म्हटलें पाहिजे.

गरिबांना बाहेर ठेवण्यासाठीं ज्याप्रमाणें आपण दारें लावून जेवावयास बसतों आणि पंक्तिभेदाचें स्तोम माजवितों, त्याचप्रमाणें साहित्याच्या विशिष्ट शैल्या निर्माण करून ज्ञानाच्या पाणपोईवर आपण ज्ञातिभेद उत्पन्न केला आहे. उदात्त, उन्नत विचार सर्वसामान्य जनतेला जे सकरतेनें मिळाले पाहिजेत ते मिळत नाहींत. आपल्या साधुसंतांनीं गरिबीचें व्रत घेतलें म्हणूनच ते गरिबांची सेवा करूं शकले, आणि गरिबांसाठीं प्राणपूर्ण साहित्य लिहूं शकले. हिंदुस्तानचें मोठ्यांत मोठें बळ म्हणजे त्याची लोकसंख्या होय. पण आपण गरिबांचा द्रोह करून याच बळाला भाररूप करून टाकलें आहे. जोंपर्यंत आपण गरिबांसाठीं साहित्य लिहिणार नाहीं, हजारांनीं बाहेर पडून गरिबांना आपला इतिहास आणि आपली आजची स्थिति, आपलें काव्य आणि आपला धर्म व त्याचीं वैशिष्ट्यें समजावून सांगणार नाहीं, आपल्या जीवनावरील राख झाडून टाकून त्याला प्रदीप्त करण्याची प्रेरणा देणार नाहीं, तोंपर्यंत आपलें साहित्य पांडुरोगीच राहावयाचें.

साहित्याच्या उन्नतीसाठीं घडविण्यांत येणाऱ्या योजनांमध्यें कोष आणि संदर्भग्रंथ, इतिहास आणि विवेचनें, पाठ्यपुस्तकें आणि प्रमाणग्रंथ, परिषदा आणि समित्या– कितीतरी गोष्टी असतात. हें सर्व सोडून साहित्या-च्या उद्धाराकरितां मी गरीब प्रजेची सेवा करण्याचें सुचवीत आहें हें

पाहून कांहीं लोकांना असें वाटेल कीं साहित्यमंडळाला समाजसुधारक परिषद् समजण्याची चूक करून मी बोलत आहें. माझ्यावर हा आरोप खुशाल येवो. पण मीं अगदीं निश्चितपणें असें समजतों कीं ज्याप्रमाणें झाडाला मुख्यत्वें जमिनींतूनच पोषण मिळत असतें त्याप्रमाणें साहित्याचें पोषण समाजांतच असतें. मनुष्यता आणि धर्मनिष्ठा यांमधूनच आपलें साहित्य समृद्ध होणार आहे याविषयीं मला मुळींच शंका नाहीं.

वर वर्णिलेल्या योजनांचें महत्त्व कमी लेखण्याची माझी इच्छा नाहीं; त्यांत मी यथाशक्ति भागहि घेऊं इच्छितों; पण मुख्य वस्तु विसरून चालणार नाहीं.

जेथें पुरुषार्थ अल्प झालेला असतो आणि जीवनांत शिथिलता आलेली असते तेथें साहित्याच्या बाबतींत अल्पसंतोष आणि रसिकतेची हीनता स्वाभाविकपणेंच दाखल होतात. आज आपण महाकाव्यें लिहूं शकत नाहीं, आपली प्रतिभा चौदा ओळी कशाबशा पूर्ण भरण्यापूर्वींच ओसरून जाते, अशी टीका मला करावयाची नाहीं. काव्याच्या दीर्घत्वावर मी अधिक भार देऊं इच्छीत नाहीं. पण आपले काव्यविषय उत्तुंग अथवा गंभीर असत नाहींत, आपलीं काव्यविवेचनें सर्वंकष आणि उत्कट असत नाहींत, अशी टीका मी अवश्य करीन.

साहित्य हा मुख्यत्वें व्यक्तिगत प्रयासच होय. तें जोंपर्यंत गंभीर आणि दीर्घ उद्योगाचा परिणाम म्हणून होणार नाहीं तोंपर्यंत उथळच राहावयाचें. ईश्वरानें असाधारण प्रतिभा दिलेली असली तरी ती शक्ति बीजरूपच असणार. मनुष्यानें निदान माळ्याचें काम तरी इमानदारीनें केलेंच पाहिजे. साहित्यांत सहकारानें काम केल्याशिवाय देखील चालणार नाहीं. सहकारासाठीं जे सद्गुण आवश्यक आहेत ते अंगीं बाणविल्या-खेरीज आतां एक पाऊलहि पुढें टाकणें कठीण आहे. सिद्धान्ताचा आग्रह आणि स्वभावभेदाकडे काणाडोळा करण्याची शक्ति, खुलाशांत जाण्याची सूक्ष्मता आणि एकाच संकल्पाला पुष्कळ काळपर्यंत चिटकून राहण्याची दृढता या सामाजिक सद्गुणांचा जर आपण विकास करणार नाहीं तर फारशी साहित्यसेवा होऊंच शकणार नाहीं.

पण ही झाली साहित्यसेवा. परंतु खऱ्या साहित्याची निर्मिति म्हणजे जनतेच्या पुरुषार्थाचेंच फळ होय. 'कारभारांत बोलण्याचा अधिकार नसेल तर करभारहि मिळावयाचा नाहीं' या जगविख्यात सुत्रामध्यें भाषासौष्ठव किंवा अनुप्रासाची लज्जत नाहीं. जी लज्जत आहे तिच्यापेक्षां अमेरिकन जनतेचा पुरुषार्थ हीच त्याच्यांत मुख्य वस्तु आहे. साहित्याची उन्नति जनतेच्या उन्नतीबरोबरच होत असते. आपल्या जिल्ह्यांतील ग्रामीणांनीं गुजराती भाषेंत जी वाढ केली आहे ती आपल्या दोन चार परिषदांच्या हातूनहि झाली नसती. 'आम्ही वल्लभभाईच्या हातीं आमचें शिर सोपविलें आहे, नाक सोपविलें नाहीं' या वचनासाठीं गुजराती भाषा नेहमीं अभिमानी राहील. 'आमच्या खर्चानें बंदुका आणि तोफा ठेवतात पण कधीं दाखवीतहि नाहींत. आमच्या मुलांबाळांना बंदुकांचा आणि तोफांचा स्वाद चाखवितील तर संतान तरी सुधरेल' हें एकच वाक्य गुजराती भाषेला वीर्यशाली बनवावयास पुरें आहे. साबरमतीच्या कांठीं गांधीजींनीं आणि बारडोलीच्या शेतांतून वल्लभभाईनीं जी भाषा घडविली आहे ती भाषा आपल्या स्वाभाविकपणानेंच धीरोदात्त आणि प्रौढ बनलेली आहे. साहित्य हा जनतेच्या पराक्रमाचा प्रसार आहे. म्हातारा मिशनरी टेलर आपल्याला सांगून गेला आहे 'यथा भाषकस्तथा भाषा'. साहित्याची उन्नति करावयाची असेल तर जीवनाची उन्नति करूं या. साहित्य ही जीवनाची छाया आहे; जीवनाचा सुगंध आहे.*

---

* ता. १६।९।२८ रोजीं सुरत साहित्यमंडळाच्या वार्षिक उत्सवप्रसंगीं दिलेलें व्याख्यान.

## साहित्याचा उगम : : ११ :

अमदाबादेस आल्याला मला बारा वर्षे झालीं. तरी पण या उद्यमी नगरीच्या सार्वजनिक कार्यक्रमांपासून मी जवळ जवळ दूरच राहिलों आहें. साहित्य-उत्तेजन-समाजाशीं माझा परिचय वार्षिक 'वीणा'-द्वारें जितका कांहीं झाला तेवढाच. कै. भाई रामप्रसाद जेश्वर यांच्या-विषयीं मीं थोडेंसें वाचलें आहे. त्यावरून मनांत अनुमान झालें होतें कीं या समाजाच्या मुळाशीं शुभ प्रेरणा आहे, म्हणून याचा विकास झालाच पाहिजे. भाई जेश्वरांचा उद्देश पाहतां तो साहित्याला उत्तेजन देण्यापेक्षां लोकशिक्षणाचा प्रारंभ करण्याचाच विशेषतः दिसून येतो. तेव्हां माझ्या-सारखा शिक्षणप्रेमी मनुष्य या समाजाकडे आकर्षिला गेल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. दरवर्षी आपण चांगल्या चांगल्या प्रख्यात साहित्याचार्यांना येथें बोलावूं शकलां याबद्दल मुळींच शंका नाहीं. पण लोकशिक्षणाचा आदर्श देखील या समाजाच्या हृदयांत वसत असल्यामुळें माझे मित्र श्री. गिदवाणी यांना व माझ्यासारख्यांना बोलावण्याची आपण कृपा करीत असतां.

मी कांहीं साहित्यसेवक नाहीं, पण साहित्याशीं मीं असहकारहि केलेला नाहीं. साहित्यानें शिक्षणाला आतांपर्यंत खूप मदत केली आहे आणि अजूनहि करील. शिक्षणाचे उपासक साहित्याची सीधी (Direct) सेवा कदाचित् करूं शकणार नाहींत; पण साहित्याच्या परिचयांत तर त्यांना राहिलेंच पाहिजे. कारण ते दोन्ही परस्परपोषक आहेत; इतके कीं, ते दोन्ही एकच आहेत असें कित्येकांना वाटतें; अथवा दोहोंमध्यें साध्य-साधनांचा संबंध आहे अशी समजूत रूढ झालेली आहे.

या शहरांतील तरुणांना व गरिबांना साहित्याची सेवा मिळावी म्हणून आपण जें कार्य सुरू केलें आहे त्यांतूनच लोकशिक्षणाचीं अनेक क्षेत्रें नांगरलीं जाणार आहेत. 'वीणा' हा त्याचा अल्पमात्र मंगलाचरण होय.

'वीणे'शीं माझा परिचय अकल्पित रीतीनें झाला आहे. आश्रमाच्या रस्त्यानें सायकलवर माझें चंक्रमण चाललें होतें. इतक्यांत कोणींतरी मला हटकलें आणि म्हटलें, "ऑटोग्राफ हवा आहे तुमचा!" तेथून विद्या-पीठाची इमारत जवळच होती. तेथें जाऊन मनांत घोळत असलेला विचार मीं लिहून टाकला. 'वीणे'ला तो कोठून मिळाला हें मला माहीत नाहीं. पण माझ्या आजारीपणामुळें मजकडून लेख मागणें अशक्य असल्यामुळें त्या वेळच्या संपादकांनीं ऑटोग्राफच्या त्या वाक्यावरच संतोष मानला असला पाहिजे. स्वाक्षरी (ऑटोग्राफ)चें तें वाक्य अशा प्रकारें प्रकट झालेलें पाहून मला खरोखरीच आनंद झाला. त्या वाक्याचा प्रचारहि खूप झाला आहे असें दिसतें. त्यावरून मला एका नव्याच क्षेत्राचें दर्शन झालें. आपण लोकशिक्षणाच्या उत्साहांत लांब लांब लेख, निबंध आणि भाषणें तयार करतों आणि छापण्याच्या सुगमतेमुळें तें सर्व अनायासें प्रसिद्ध पण होतें. उद्योगी जनसमाज हें सर्व ध्यानपूर्वक कसें काय वाचणार? त्याऐवजीं स्वतःला जें कांहीं म्हणावयाचें असेल तें थोड्या शब्दांत जनतेसमोर मांडलें असेल तर लांब लांब लेख वाचण्यांतून वांचलेला वेळ विचार करण्यांत लोक सहज घालवूं शकतील. वादविवाद आणि चर्चा यांचा रस जर आपल्यांत कमी असता आणि शान्तपणें विचार करण्याची संवय जास्त असती तर आपलें पुष्कळसें काम सूत्ररूपानें भागूं

शकलें असतें आणि जनतेच्या विचारशक्तीला खूप मोकळेपणा मिळाला असता. वर्तमानपत्रें आणि मासिकें रात्रंदिवस इतकी कांहीं सामग्री आपल्यापुढें वाढीत असतात कीं त्या सर्वांचा आस्वाद घेऊं जातां कांहीं पचावयास वेळच राहात नाहीं. निर्मात्या मनाला मोकळेपणा हवा आणि एकान्त पण हवा.

मानसशास्त्राचा हा सिद्धान्त जाहिरातदारांच्या ध्यानीं कांहींसा आलेला आहे. प्रकाशक आणि शिक्षणशास्त्रज्ञ यांना मात्र तो अजून समजलेला नाहीं. 'वीणा' याला अपवाद आहे. तें वार्षिक आहे. सबंध वर्षांत लेखकांनीं जो कांहीं विचार केला असेल तो जर थोडक्यांत दिला गेला तर देणाऱ्यालाहि सोयीचें आणि घेणाऱ्यालाहि सोयीचें. जुन्या काळचीं सुभाषितें देखील अशाच प्रकारें तयार झालीं आहेत. ज्या काळीं आजीविकेसाठीं किंवा प्रचारासाठीं धावपळ करावी लागत नव्हती, पर-राज्य जनतेचें रक्त सक्शन पंपाप्रमाणें शोषून घेत नव्हतें, त्या काळीं विचारक लोक शांतपणें एखादें सुभाषित उत्सवप्रसंगीं किंवा दरबाराच्या वेळीं जनतेसमोर आणीत; आणि त्यांत जर कांहीं तेज असलें तर तें लागलींच नाण्याप्रमाणें चलनामध्यें प्रवेश करी. त्या वेळच्या राजे लोकांना अशा सुभाषितासाठीं लक्ष लक्ष मुद्रा देतांना संकोच वाटत नसे. आज सुभाषित लिहून आपण लक्ष मुद्रा मिळवूं शकणार नाहीं हें खरें; पण जनतेचें लक्ष मात्र अवश्य आकर्षित करूं शकूं याविषयीं मुळींच शंका नाहीं.

कोणाला वाटेल कीं आपण लिहिलेल्या एका वाक्यावर किती बोलतो आहे हा ! पण तें मी माझें वाक्य समजतच नाहीं मुळीं. 'सुरक्षितता शोधण्यानें पुरुषार्थ मारला जातो' हें वाक्य स्वयंस्फूर्तीनें आणि माझ्या स्वयंवाहिनींतून निघालेलें असलें, माझ्या शब्दांनीं बनलेलें असलें, तरी पण तें कांहीं माझें नव्हे. समाजाचा तो अनुभव आहे, इतिहासाचें तें सार आहे, राष्ट्रीय पश्चात्तापामधून तें प्रज्वलित झालें आहे. फ्रान्सचा जुबेर म्हणतो त्याप्रमाणें 'खरीं सुभाषितें ज्याच्या तोंडून निघतात त्यालाहि ऐकणाऱ्याइतकेंच आश्चर्यचकित करतात. तें आपल्या मनांत स्फुरतें हें कांहीं आपल्या हातीं नसतें. प्रेरणा ही कधीं मनुष्यानें विचार करून काढ-

लेली असते काय ?* ती त्याच्यांत घुसते. आपले लोक अशा उद्गारांना 'अपौरुषेय' म्हणून ओळखतात. आतां मागून आलेल्या टीकाकारांनीं 'अपौरुषेय' शब्दाचा वाजवीपेक्षां जास्त अर्थ केला ही गोष्ट वेगळी. महाराष्ट्रीय कवि रेवरंड टिळकांनीं म्हटलें आहे,

**'हीं निःश्वसितें। कोण सोडितें।**
**मम हृदयीं तें। विचारूनि, भिउनी त्याला।'**

कायदा आणि सरकारी लिखाणें ज्याप्रमाणें लिहिणाऱ्यांच्या नांवें चढत नाहींत पण त्यांचें कर्तृत्व सरकारकडे जातें, त्याप्रमाणें समाजमान्य उद्गारांचें कर्तृत्व समाजाचेंच आहे. असे उद्गार अथवा सुभाषितें समाजाच्या सत्तेनेंच प्रचलित होतात. त्यांची प्रतिष्ठा आणि त्यांचें वैभव हीं त्यांना समाजाकडून मिळालेलीं असतात. कमळ हें चिखलाचें समजलें जात नाहीं, तलावाचें समजलें जात नाहीं, तर श्रीविष्णूचें अथवा लक्ष्मीचें समजलें जातें; कारण त्यांच्या हातांतच तें कृतार्थ होतें.

एवढी एक गोष्ट आजच्या युगाचे लोक स्वीकारतील आणि समजतील तर साहित्य शुद्ध होईल व साहित्यकारांचे अहंकारी झगडे मिटून जातील.

पण हें विषयान्तर झालें. मला म्हणावयाचें होतें असें कीं विचार आणि कल्पनाशक्ति यांना जर मोकळीक मिळेल आणि त्यांना अनुभवानें परिपक्व होऊं दिलें जाईल तर त्यांतून लोकमान्य साहित्य तयार होईल. मासिकांपेक्षां वार्षिकें या कामांत अधिक मदतगार होऊं शकतील. अपरिपक्व साहित्य हें अपरिपक्व अन्नाप्रमाणें सामाजिक शरीर बिघडवून टाकतें, विकृति उत्पन्न करतें आणि समाजाला क्षीण करतें. साहित्यसेवकांनीं देखील साहित्यापुढें नम्र झालें पाहिजे. जनतात्मा नारायणाच्या पूजेचा एक प्रकार म्हणूनच साहित्याकडे पाहिलें पाहिजे. ज्याप्रमाणें सर्वोत्कृष्ट फळें आणि

---

* 'Genuine *Bons mots* surprise those from whose lips they fall, no less than they do those who listen to them, they crop in our minds in spite of ourselves; or at least, intuitively— as is the case with all inspirations.'

फुलें वेंचून आपण भगवानाच्या पूजेंत अर्पण करतों, सुकलेलीं किंवा भोकें पडलेलीं फुलें किंवा पानें ईश्वराला वाहत नाहींत, त्याचप्रमाणें हलक्या, विचारहीन कल्पना, पापी उत्तेजना आपण कधींहि साहित्यांत गुंफतां कामा नये. शिवरात्रीच्या दिवशीं ज्याप्रमाणें 'त्रिशाखैः बिल्वपत्रैश्च अच्छिद्रैः कोमलैः शुभैः' आपण पूजा करतों, त्याप्रमाणें 'विशुद्धैः वाक्प्रसूनैश्च अच्छिद्रैः कोमलैः शुभैः' साहित्याची आणि समाजाची उपासना आपण केली पाहिजे. असें साहित्य जर आपण तयार करूं तर आपल्या लिखाणाविषयीं देखील आपल्या मनांत आदर उत्पन्न होईल. प्रपत्तियोगी डॉ. भांडारकरांनीं म्हटलें आहे कीं "माझें स्वतःचें लिखाण मीं कित्येक वेळां वाचलें आहे. मला त्यांतून आश्वासन मिळालें आहे." हें वचन एका अत्यंत नम्र अशा साहित्यसेवकाचें आहे.

साहित्याची ही प्रतिष्ठा आज राहिलेली नाहीं. लहानपणीं आपण वाचलेला भर्तृहरीचा श्लोक आतां नव्या अर्थानें खरा वाटतो.

> पुरा विद्वत्ताऽऽसीदुपशमवतां क्लेशहतये
> गता कालेनासौ विषयसुखसिद्ध्यै विषयिणाम् ।
> इदानीं तु प्रेक्ष्य क्षितितलभुजः शास्त्रविमुखा
> नही कष्टं सापि प्रतिदिनमधोऽधः प्रविशति ॥

साहित्य हें वैराग्यवृत्तीसाठींच वापरलें जावें असें कांहीं कोणी म्हणत नाहीं; पण पौरुष, पराक्रम, पवित्रता, प्रसन्नता आणि पारमार्थिकता हीं पांच लक्षणें मात्र त्यांत असलींच पाहिजेत.*



* अमदाबाद येथील साहित्य-उत्तेजक-समाजाच्या वार्षिक उत्सवाच्या प्रसंगीं अध्यक्षपदावरून दिलेलं व्याख्यान. (१९२८)

## पत्रकाराची दीक्षा : : १२ :

या परिषदेसमोर एकादा निबंध वाचण्याचा अधिकार मला आहे कीं नाहीं याचा विचार करीत होतों. असें वाटतें कीं अधिकार आहेहि आणि नाहींहि. खूप वर्षांपूर्वी देशांतील आणि परदेशांतील वर्तमानपत्रें मी रसपूर्वक वाचीत होतों. पत्रकाराचें कार्य आणि कर्तव्य याविषयीं मी विचार करीत आलों आहे. वंगभंगानंतरच्या राष्ट्रीय चळवळींत प्रथम एका स्थानिक साप्ताहिक पत्राशीं आणि नंतर एका प्रमुख दैनिकाशीं अत्यंत निकटचा संबंध मीं ठेवला होता. या वेळच्या जनजागृतीच्या आणि आत्मशुद्धीच्या चळवळींत देखील 'नवजीवना' सारख्या पत्राशीं तितकाच निकटचा संबंध आला. आणि या दोन चळवळींमधील मोठ्या कालखंडांत विचाराचें आणि लेखणीचें ब्रह्मचर्य देखील पाळलें होतें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. अशा प्रकारें पत्रकारपरिषदेसमोर माझे विचार मांडण्याइतका अधिकार मीं मिळविला आहे असें म्हणतां येईल. तरी पण

हेंहि खरें आहे कीं आजकाल पत्रकाराच्या धंद्याचा जो आदर्श तयार होत आहे त्याचा विचार करतां या धंद्याची लायकी मिळविण्याची मला कधीं इच्छाच झाली नाहीं. पत्रकारापेक्षां शिक्षणकाराचें कार्य अधिक उपयोगी आहे असें मला पहिल्यापासूनच वाटत असल्यामुळें पत्रकारासाठीं लागणारी योग्यता आलीच नाहीं. पत्रकाराला आवश्यक असणारा एक गुणच मला हा निबंध लिहिण्याची प्रेरणा देत आहे. पत्रकार हा मुख्यत्वें विचार-प्रचारक असतो. विचाराचा प्रचार करण्याची, विचार 'ब्रॉडकास्ट' करण्या-ची, वृत्ति म्हणा किंवा खाज म्हणा– पत्रकारांत जितकी असते तितकी दुसऱ्या कोणांत क्वचितच असेल. धर्मोपदेशक आणि अध्यापक या दोघां-मध्यें देखील ही वृत्ति कमीजास्त प्रमाणांत अवश्य असते खरी.

१

खरें पाहिलें असतां धर्मोपदेशक, पत्रकार आणि शिक्षणकार या तिघांचें कार्य जवळ जवळ एकसारखेंच आहे. निद्रिस्त जनता जेव्हां जागृत होऊं पाहते त्या वेळीं तर पत्रकाराच्या स्थानावर असाधारण महत्त्व आणि जबाबदारी येऊन पडलेली असते. पत्रकार म्हणजे लोकशिक्षणाचा आचार्य, ब्राह्मणांचा ब्राह्मण आणि चारणांचा चारण. जनता जेव्हां युयुत्सु होते तेव्हां पुष्कळ वेळां पत्रकाराला लढवय्या आणि सेनापति देखील व्हावें लागतें आणि उत्तम प्रकारें क्षात्रधर्म बाणवावा लागतो. जेथें जेथें अन्याय होत असेल, जेथें जेथें दीनदुर्बळ आणि मूक वर्गांवर जुलूम चालत असेल, तेथें तेथें 'क्षतात्किल त्रायते' या आपल्या ब्रीदाचें स्मरण करून पत्रकार हिरीरीनें उडी घेतो. ज्या वेळीं असे प्रसंग नसतील त्या वेळीं विचार, माहिती, संस्कार, अभिरुचि आणि आदर्श यांची पाणपोई घालून तो समाजसेवक बनतो. अज्ञानामुळें अथवा अदूरदृष्टीमुळें लोक जेथें भांडत असतील तेथें 'ज्ञानांजनशलाकया' लोकांची दृष्टि शुद्ध करण्याची तो कोशिस करतो. समाजचक्राचीं चाकें जेव्हां एकराग विसरून चीत्कार करूं लागतात तेव्हां तो योग्य ठिकाणीं स्नेह घालून घर्षण दूर करतो; आणि जेव्हां जेव्हां सरकारदरबारशीं संबंध येतो तेव्हां तेव्हां तो जनतेचा प्रतिनिधि होऊन

लोकमताला एकसूची बनवून लोकशक्ति चेतवतो. अशा रीतीनें लोकसेवक, लोकप्रतिनिधि, लोकनायक आणि लोकगुरु अशी चतुर्विध पदवी पत्रकार उपभोगूं शकतो.

आजकालच्या वैश्ययुगांत पत्रकाराचा एक निराळाच आदर्श तयार होत आहे आणि तो शिष्टसंमत होत आहे. "आमच्यापुढें धर्माची गोष्ट काढूं नका. आम्ही फक्त व्यवहार ओळखतों; आदर्शांच्या तारस्वरांत गावयास लोकांना सांगूं नका, मध्यम किंवा मंद्रस्वरांत जें गातां येईल तेंच गावयास सांगा; आमच्याकडून साधूची किंवा वीराची अपेक्षा ठेवूं नका, तर नफ्यातोट्याचीं गणितें करणाऱ्या कुटुंबी मनुष्याला रुचतील आणि झेपतील अशाच गोष्टी आम्हांला सुचवा; दुनिया आमची आहे, वीर आणि साधु पुरुष समाजाला शोभारूप आहेत खरे पण ते पगडीच्या कडेला असलेल्या कलाकुसरीप्रमाणें होत, ते म्हणजे कांहीं पगडी नव्हे." हा आदर्श मान्य करणारे लोक म्हणतात, "पत्रकारानें आपल्या आदर्शांची पातळी विनाकारण उंच ठेवूं नये. लोक जें मागतील त्याचाच पुरवठा करणें हाच पत्रकाराचा आदर्श असला पाहिजे. आपण कांहीं लोकांचे विद्यागुरु नाहीं कीं त्यांना आपण मारपीट करून शिकवावें! आपण म्हणजे लोकांचे खिदमतगार आहोंत. ग्राहकाला हवा असलेला माल पुरवून त्याला राजी ठेवणें हाच दुकानदाराचा आदर्श; राजा इच्छील तो राग गाऊन त्याचें रंजन करणें हाच गायकाचा आदर्श; लोक कांहीं आपले शिष्य नाहींत, ते आपले शेठ आहेत. शेठजीला शिकवूं पाहणारा नोकर कसला? ग्राहकाला धर्मशास्त्र किंवा संयम शिकवूं पाहणारा दुकानदार कसला?

येथपर्यंत आलों कीं मग अशा दुकानदारीचेंच तत्त्वज्ञान पुढें चालतें. ग्राहकाला कोणता माल हवा याचा विचार दुकानदार नेहमीं करीत नाहीं. पण आपल्याजवळ पडून राहिलेला माल ग्राहकाला हवासा कसा करावयाचा याचाच विचार तो करीत असतो. ग्राहकाला मालक मानण्याऐवजीं तो त्याला शिकार समजतों आणि जगाला खालीं ओढतो. उत्तर हिंदुस्तानांत आज काय चाललें आहे? कित्येक पत्रकार कज्जेदलाल बनले

आहेत, त्यांनीं निन्देचे गुत्ते उघडले आहेत, राष्ट्रीय आपत्ति आणि जातीय गैरसमजुती यांवर ते व्यापार करूं पाहतात. लोककथेमध्यें गांवांतील भड-मड्या स्वभावाचा माणूस हा ज्याप्रमाणें एक मुख्य पात्र असतो, त्याप्रमाणें हे पत्रकार महापिशुन बनून हिंडत असतात. शेक्सपियरच्या आयागोनें ऑथेल्लोची आणि डेस्डिमोनाची जी दशा करून टाकली तीच दशा हे लोक या भोळ्या राष्ट्राची करावयास तयार झाले आहेत. फरक एवढाच कीं आयागोला आपल्या धंद्याचें स्वरूप आणि परिणाम बरोबर माहीत होते आणि तो इरादापूर्वक नीचता करीत होता; या सर्वांची स्थिति कांहीं तशी नाहीं. हे दुर्दैवी लोक स्वतःच विकारमत्त झाले आहेत आणि यादवीं-तील यादवांचें अनुकरण करीत आहेत.

पत्रकाराची वृत्ति 'जें समजलें तें जाहीर केलें' अशी खाजाळू मुळींच असतां कामा नये. खानदानी माणसाच्या पोटांत कितीतरी गोष्टी सामाव-लेल्या असतात. पण कित्येक बाबतींत तो ओठ देखील हलवीत नाहीं. पत्रकारानें कार्यानंद शोधला पाहिजे, वादानंद नव्हे. नाहीं तर लेखणीचा दांडपट्टा एकदां सुरू केला रे केला, कीं साऱ्या दुनियेचा संहार होऊन जावयाचा. विलायतेंत तर जेव्हां चळवळींचा किंवा चर्चाविषयांचा दुष्काळ असतो तेव्हां पत्रकार एकमेकांविरुद्ध अभद्र टीका करून एकमेकांवर जगत असतात. 'भिक्षुको भिक्षुकं दृष्ट्वा श्वानवत् घुर्घुरायते ।''

सुदैवानें गुजरातेंत वर्तमानपत्रें सज्जनतेची मर्यादा क्वचितच उल्लंघितात. गुजरातचे पत्रकार सौम्य असतात, भांडकुदळ नसतात; कज्जा-खटल्यां-पासून कांहींसे दूर राहतात असेंहि म्हणतां येईल. यामुळें समाज एक प्रकारच्या शापापासून मुक्त राहिला आहे. पण ही वादविमुखता गुण-रूपच आहे असें म्हणणें कठीण आहे. सामाजिक जबाबदारी ओळखणाऱ्या प्रखर समालोचनेच्या अभावामुळें राष्ट्रीय चळवळींत आणि साहित्योद्यानांत कांटेरी झाडांझुडपांचें रान बेफामपणें वाढूं लागतें. प्रत्येक सुंदर आदर्शा-च्या दुबळ्या नकला समाजांत पसरूं लागतात. रविवर्म्याचीं चित्रें ज्या-प्रमाणें आगपेट्यांवर काढलीं जातात त्याप्रमाणें हीन आणि हीनतर नकला फोफावूं लागतात आणि मूळ वस्तूचा कोंडमारा करतात. 'तूं मला कालिदास

म्हण, मी तुला भवभूति म्हणेन' असा 'अहो रूपम् अहो ध्वनिः' चालतो आणि समाजांत आदर्श वर चढूंच शकत नाहींत. जेथें पहावें तेथें अल्प संतोष. यामुळें विचारशुद्धि, भाषाशुद्धि, कार्यशुद्धि वगैरे गोष्टी तर दूरच पण जोडणीशुद्धि देखील संभाळली जात नाहीं. मतभेदामुळें येणारी विविधता कांहीं कमी नसते, आणि ती बाधकहि होत नाहीं. पण आज तर सर्वत्र अनवस्था आहे.

मला वाटतें कीं टीका करावयाचा मला अधिकार नाहीं म्हणून ही गोष्ट येथेंच सोडून देतों आणि वर्तमानपत्रें चालविण्यास उपयोगीं पडतील अशा कांहीं सूचनाच मी आपल्यापुढें मांडतों.

२

वर्तमानपत्र हें मुख्यतः बातमीपत्र असतें. जनतेच्या फायद्याचा विचार करून साऱ्या जगांतील बातम्या देणें हें पत्रकाराचें प्रथम कर्तव्य होय. पण या बाबतींत– आणि अत्यंत महत्त्वाच्या बाबतींत– आपल्याला परक्यांच्या डोळ्यांनीं पहावें लागतें. आंकडे ज्याप्रमाणें सरकारकडूनच मिळूं शकतात त्याप्रमाणें माहिती ही रॉयटर किंवा असोशिएटेड प्रेसकडूनच मिळूं शकते. ते लोक त्यांच्या दृष्टीनें महत्त्वाच्या अशाच बातम्या आपल्याला पुरवितात, आणि हळूहळू कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यावयाचें, कोणत्या प्रश्नाकडे कोणत्या दृष्टीनें पहावयाचें याविषयीं त्यांची स्वतःची दृष्टि ते आपल्यावर लादतात. शिक्षण व साहित्य याप्रमाणें वृत्तविवेचनांत ( Journalism)*

---

* Journalism साठीं आपल्या इथें अजून एक निश्चित शब्द रूढ झाला नाहीं ही आश्चर्याची गोष्ट आहे. यासाठीं दैनिकापासून मासिक, त्रैमासिक आणि वार्षिकापर्यंतचीं सर्व पत्रें व त्यांत येणाऱ्या किरकोळ बातमीपासून गंभीर चर्चेपर्यंत सर्व कांहीं ज्यांत सामावेल असा शब्द पाहिजे. आपल्या इथें 'लोकजीवनांतील घटना' या अर्थीं 'लोकवृत्त' हा असा एक जुना आणि विपुलार्थवाही शब्द आहे. यांत लोकजीवनाचीं सर्व अंगें येऊन जातात. यावरून जर्नालिझम्‌ला 'लोकवृत्तविवेचन' अथवा थोडक्यांत 'वृत्तविवेचन' म्हणतां येईल. जेथें जेथें जर्नालिझम् शब्द वापरला जातो तेथें तेथें हा शब्द अगदीं बरोबर लागू पडतो.

आपण परकीयांचे अनुयायी बनलों आहोंत, त्यामुळें आलेली स्लेव्ह मेन्टॅ-लिटी (परप्रत्ययनेयबुद्धिः) अजून जात नाहीं. आज आपल्या इथें अनेक पक्ष पडले आहेत आणि विचारप्रगति होत नाहीं यामध्यें या परप्रत्ययाच्या अवलंबनाचा कमी हात नाहीं. आणि आश्चर्य हें कीं स्लेव्ह मेंटॅलिटीविरुद्ध ओरड तर सर्वच करतात. वृत्तविवेचनाचा मूळ आधार म्हणजे अधिकृत बातम्या. पण त्याचें तंत्र आपण अजून तयार केलेलें नाहीं. पायांतच परावलंबन.

जेव्हां मी इंग्रजी वाचावयास शिकलों तेव्हां चार आण्यांचा 'टाइम्स ऑफ इंडिया' मिळत असे तो वाचण्याचा प्रयत्न करीं. हिंदुस्तानांतील सर्व बातम्या वाचून झाल्यावर मला वाटे, हिंदुस्तानांत काय फक्त इंग्रजच राहात असतील? सरकारी अंमलदार आणि गोरे लोक यांच्या सामाजिक जीवनाच्या बातम्या आणि जाहिरातीच त्यांत मुख्यतः येत. मारामाऱ्या किंवा अपघात यांचीं वर्णनें जेव्हां येतील तेव्हांच माहीत व्हावयाचें कीं गोऱ्या थराखालीं नेटिव लोकांचा काळा समुद्रहि आहे. इंग्रजी वर्तमानपत्रांनीं गोऱ्यांच्या दृष्टीनें जी गोष्ट महत्त्वाची असेल तीच द्यावी यांत आश्चर्यकारक किंवा अयोग्य असें कांहीं नाहीं. आपल्याला जर आपलें स्वतःचें जीवन विकसित करावयाचें असेल तर आपल्या स्वतःच्या दृष्टीनें माहिती दिली पाहिजे. बंगाली लोकांनीं ही कला कांहींशी शिकून घेतली आहे असें दिसतें.

आपल्या वृत्तविवेचनांत आपण इंग्रजी शिकलेल्या दुनियेचाच विचार करीत असतों. सरकार आणि त्याचीं कृत्यें, परदेशाशीं चालणार व्यापार, इंग्रजी शिक्षण, कोर्टें, विद्वानांचें साहित्य आणि सुशिक्षित वर्गाचीं सुखदुःखें हाच आपल्या वृत्तविवेचनाचा मुख्य विषय असतो. हिंदुस्तानची जनता, हिंदुस्तानांतील हुन्नर आणि कारागीर, खेडुतांचें जीवन, खेडेगांवांची स्थिति, धर्मप्रचार, गरिबांचें गृहजीवन, मागासलेल्या जातींची छळणूक वगैरे राष्ट्रीय जीवनाच्या प्रधान प्रश्नांना हवें असलेलें प्राधान्य आपण देतच नाहीं. स्थानिक पत्राचा एक देखील उत्तम नमुना आपल्यापुढें नाहीं. आपले बातमीदार खेड्यांतून जातच नाहींत. खरी स्थिति अशी असली पाहिजे कीं प्रत्येक वर्तमानपत्रानें खेड्यांतील रहिवाशांमधून समभाववाले

कांहीं बातमीदार शोधून काढले पाहिजेत, त्यांना त्या कलेचें धीरतापूर्वक शिक्षण दिलें पाहिजे आणि ग्रामीण जीवनाच्या चर्चेंत प्रत्येक पत्रानें रस घेतला पाहिजे. आपल्या सभांमध्यें ज्याप्रमाणें शहरवासी हे उच्चासनावर बसतात आणि बिचारे ग्रामप्रतिनिधि आपल्या स्वाभाविक विनम्रतेला अनुसरून दूर कोपऱ्यामध्यें कोठें तरी बसून जातो त्याप्रमाणें वर्तमानपत्रांतहि लोकजीवनाला एखादा कोपराच मिळतो आणि तो देखील नेहमींच मिळतो असें नाहीं. ग्रामवासी लोक जेव्हां आत्मनिन्दा सोडून स्वमान आणि आत्मप्रत्यय अंगीं बाणवतील तेव्हांच ही स्थिति सुधारणार आहे हें खरें, तरीहि वर्तमानपत्रें या कामास सुरवात आणि मदत अवश्य करूं शकतात. रेल्वे कंपनी तिसऱ्या वर्गाची उपेक्षा खुशाल करो. पण वर्तमानपत्रकारांना जेथें त्यांची चाळीस टक्के गिऱ्हाइकी आहे अशा ग्रामजीवनाची अगदींच उपेक्षा करून चालावयाचें नाहीं. प्रतिष्ठित आणि जबाबदार पत्रें याविषयीं बेदरकार राहतील तर त्यांत त्यांची सुरक्षिततताहि नाहीं. जनतेंत अस्मिता येऊं लागली आहे हें पाहतांच कित्येक त्वरितदृष्टि पत्रकार अशिक्षित वर्गाची खुशामत करून त्यांना वाटेल त्या मार्गानें नेऊन आपली प्रतिष्ठा बसवितील आणि खऱ्या लोकशक्तीचे असे हे बेजबाबदार सरदार देशांत कोणता उत्पात माजवूं शकणार नाहींत ? याचा परिणाम असा होईल कीं प्रतिष्ठित पुढाऱ्यांना अखेर अशांनाहि मान्यता द्यावी लागेल आणि त्यांच्याशीं मिळतें घ्यावें लागेल. अज्ञानी जनता जर बेजबाबदार लोकांच्या नेतृत्वाखालीं गेली तर सरकारला आमचें आंदोलन मोडून पाडण्यास तें एक रामबाण अस्त्र सांपडलें असें होईल. इंग्रज सरकारला लोकमताशीं परिचित करण्यांत आणि विलायतेंतील लोकांमध्यें हिंदुस्तानच्या परिस्थितीविषयीं लोकमत तयार करण्यांत आपण जो काळ घालविला तेवढाच काळ जर हिंदुस्तानांतील ग्रामनिवासी जनतेला तयार करण्यांत घालविला असता तर आज आपण स्वराज्यांत जुने झालों असतों. खऱ्या कामाची सुरवात कष्टदायक असेना का, प्रारंभींचा मंदपणा असह्य असेना का, पण एकूण विचार करतां सच्च्या कामाचींच फळें लवकर पिकतात. अजूनहि 'जागे झालों तेथून सकाळ' समजून शेतकरी, विणकरी, कारागीर, मजूर, स्त्रिया आणि कारकून

यांच्या स्थितीचें महत्त्व समजून त्यांची दुर्दशा दूर करण्यासाठीं त्यांना सुधारण्याच्या दृष्टीनें त्यांच्या प्रश्नाकडे ध्यान देण्याचें व्रत पत्रकारांनीं घेतलें पाहिजे. आतांपर्यंत तर समाजसुधारणा आणि धर्मसंस्करण अशा महत्त्वाच्या विषयांचें देखील आपण मध्यमवर्गापुरतेंच विवेचन केलें आहे.

पत्रकार जसजसें ग्रामीण जीवनाविषयीं अधिकाधिक लिहीत जातील तसतसें प्रचारक, उपदेशक, पुढारी, आणि मुत्सद्दी यांना खेड्यांची मुलाखत घेणें भाग पडेल. पण तसें होण्यासाठीं पत्रकारांचीं लिखाणें स्थानिक रंगानें रंगलेलीं असलीं पाहिजेत. स्थानिक अध्ययन आणि स्थानिक समभाव त्यांच्यांत पूर्णपणें असले पाहिजेत. 'संपादकीय' खुर्चीवरून हेंहि खरें नी तेंहि खरें अशा प्रकारें लिहिलेल्या गुळमुळीत सामान्य सिद्धान्तांनीं भागावयाचें नाहीं.

पूर्ण तयारीनिशीं जर या दिशेनें प्रयत्न होईल तर तो कांहीं घाट्याचा व्यवहार ठरणार नाहीं. लोकांना गम्मत वाटेल आणि बोधशून्य मनोरंजन होईल असे लेख लिहून कित्येक पत्रकारांनीं वाचकवर्गाची अभिरुचि बिघडवून टाकली आहे. नाहीं तर ज्यांत ज्यांत आपलें हित चर्चिलें गेलें आहे अशा वृत्तविवेचनाला जनता जरूर तेवढा मेहेनताना दिल्याशिवाय राहणार नाहीं. वर्तमानपत्र हा खिसे गरम करण्याचा धंदा मुळींच होतां कामा नये. न्यायाखातर, धर्माखातर, लोककल्याणाखातर, पत्रकारानें लोकमताच्या विरुद्धहि गेलें पाहिजे. परकीय जुलमाचें वर्णन आणि त्याचा निषेध लोकप्रिय होऊं शकेल; पण सामाजिक अन्याय आणि खराब चालीरीती यांचा जर आपण विरोध करूं लागलों तर मात्र लोक चिडतील. खुशामतीची संवय असलेले वाचक आणि लेखक असलें वीरकर्म कोठून करणार? एखाद्या महाअन्यायाविरुद्ध अभिमन्यूसारखा एखादा वीर एकाकी आणि असहाय होऊन लढत असेल तर पत्रकारानें त्याच्या खांद्याला खांदा लावून दृढ राहिलें पाहिजे. प्रतिष्ठेची जात पुष्कळ वेळां लायक परंतु प्रतिष्ठाविरहित मनुष्याला दाबून टाकण्याचा खूप प्रयत्न करते. पत्रकार जर हिम्मतवान् असेल तर त्यानें प्रतिष्ठेची जात तोडून देखील लायकीचा पुरस्कार करावा.

जी गोष्ट व्यक्तीची तीच संस्थांची. देशांत काम करणाऱ्या, खरी सेवा

करणाऱ्या संस्थांचें स्वरूप समजून घेऊन त्यांचा परिचय लोकांना करून द्यावयाचा आणि संस्थांनीं ऐदी बनून जाऊं नये म्हणून त्यांच्यावर पहारा ठेवावयाचा हें पत्रकाराचें खास कर्तव्य होय. देशांत जितकें सार्वजनिक प्रत्यक्ष कार्य होत असेल त्याला मदत करावयाची यांतच वृत्तविवेचनाच्या सगळया कर्तव्याचा समावेश होतो. वृत्तविवेचनानें जर हें कर्तव्य बरोबर पार पाडलें तर त्याची शक्ति इतकी वाढते कीं ज्याप्रमाणें सरकारें आणि विद्यापीठें लायकीसाठीं पदव्या देतात त्याप्रमाणें वर्तमानपत्रें देखील करूं शकतात आणि मग अशा लोकमान्यतेपुढें राजमान्यता तुच्छ होऊन जाते.

कोणताहि विशाल आणि नवा प्रश्न हातीं घ्यावयाचा असेल तर मासिकांनीं प्रथम त्याचें विवेचन करावें आणि मग साप्ताहिकांनीं तो हाताळावा हा क्रम योग्य आहे. असें करण्यानें विषय आडवाटेस जात नाहीं व काम बिघडत नाहीं. दैनिक वर्तमानपत्रांनीं मात्र जी चळवळ चालू असेल तिच्याविषयींच लिहावें एवढी मर्यादा असणें आवश्यक आहे.

आपल्याकडे दैनिक वर्तमानपत्रांचें संपादकमंडळ विशाल असत नाहीं. पुष्कळ वेळां राजा, प्रधान, सेनापति सर्व कांहीं एकच असतो आणि रोजच्या रोज लेख तर प्रसवावेच लागतात. अशा स्थितींत समाजाला जर कच्चें वाढलें गेलें तर चळवळीला पोटदुखीची व्यथा जडावयाचीच. आपल्या येथें विद्याव्यासंगी लोकांनीं वर्तमानपत्रांना नियमित मदत करण्याची प्रथा अजून बरोबर पाडलेली नाहीं. एका वर्तमानपत्रामागें भिन्न भिन्न क्षेत्रांत विशेष योग्यता बाळगणाऱ्या लोकांचें एक मोठें मंडळ असेल आणि त्याची निरपेक्ष सेवा सतत मिळत राहील तरच वृत्तविवेचन प्रौढ आणि समृद्ध होईल. भगिनी निवेदिता किंवा दीनबंधु अँड्र्यूज हे जसे अनेक वर्तमानपत्रांचे मदतगार होते आणि आहेत त्याप्रमाणें आपल्याकडील अशा कित्येक विद्वानांचीं नांवें घेतां येतील कीं जे अशा तऱ्हेची मदत करूं शकतील. लेखांच्या द्वारें कांहींजण मदत करीत असतील पण सूचना करण्याइतका रस फारच थोडे लोक घेतात.

या आक्षेपाविरुद्ध लेखक अशी सबब सांगूं शकतील कीं पत्रकारांमध्यें

विद्वान् लोकांच्या वचनाला मान देण्याची वृत्तिच कोठें आहे कीं त्यांना सल्ला द्यावी ? खरें पाहिलें असतां सल्लागार आग्रही सास्वा बनतील तर तेंहि जुळणार नाहीं आणि पत्रकार पंडितमन्य बनतील तर तेंहि असहनीय होईल. जसें आपलें सामाजिक जीवन बिघडलें आहे तसें आपल्या जाहीर जीवनाचेंहि झालें आहे. संघशक्तीनें काम करण्याचे नियम अजून आपल्या गळीं उतरलेच नाहींत. नीतीचीं बंधनें शिथिल करण्यांत, अभिरुचीच्या आदर्शांना खालीं आणण्यांत आणि दरेक प्रकारचा स्वच्छंद रूढ करण्यांत आतांपर्यंत वर्तमानपत्रांनीं कांहीं कसर ठेवलेली नाहीं. जिकडे पहावें तिकडे नवीन पत्रें सुरू होतात, थोडासा जीवनकलह चालवितात आणि पदवीधरांच्या विद्याव्यासंगाप्रमाणें थोड्याच दिवसांत मावळून जातात. स्वतंत्र मौलिक कल्पनांचा दुष्काळ असूनहि प्रतिमेचा दावा करणारें आडंबरी साहित्य इतकें कांहीं वाढलें आहे कीं साहित्य-संरक्षक-मंडळ स्थापण्याची वेळ येऊन ठेपली आहे असें वाटूं लागतें.

## ३

पत्रकार दोन प्रकारचे असतात. कांहीं आपल्या पत्राच्या द्वारें जितकी वाङ्मयी सेवा होते तेवढ्यावरच संतोष मानून स्वस्थ बसतात. मोतीलाल घोष, रामानंद चट्टोपाध्याय आणि नटराजन् हे या वर्गाचे नमुने समजले जातील. दुसरे प्रत्यक्ष देशकार्य करीत असतां आपले विचार जाहीर करण्याचें एक साधन म्हणून वर्तमानपत्र चालवितात. गांधीजी, देशबंधु, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक हे या वर्गाचे प्रतिनिधि होत. पहिल्या वर्गाचे पत्रकार विविधतेचे उपासक असतात. प्रत्येकाचा कांहीं ना कांहीं मुख्य विषय असूनहि ते सर्वांगी विचारप्रचाराचे पक्षपाती असतात. दुसऱ्या वर्गाचे लोक कार्यपरायण असल्यामुळें शक्यतोंवर एकाग्रता आणूं इच्छितात. दोघांचाहि उपयोग आहे. पण या दोन्ही आदर्शांची सरमिसळ करणें उचित नाहीं. पहिल्या वर्गाचे पत्रकार मनांत आणतील तर आपल्या पत्राला संस्कृतीचें केंद्र बनवून एक संप्रदाय किंवा एक बंधुसमाज तयार करूं शकतात. जुन्या काळीं मंदिरें जें काम करीत असत

तेंच काम करण्यापर्यंत पत्रकार आपल्या पत्राला चढवूं शकतात. दुसऱ्या वर्गांचे पत्रकार देशसेवकांची दृढनिश्चयी सेना तयार करूं शकतात.

पत्रकारांचा तिसरा एक वर्ग म्हणजे पगारासाठीं वाटेल त्या मताचा प्रचार करणाऱ्यांचा. अमेरिकन निग्रो लोकांच्या एका शाळेंत पालकांनीं एका शिक्षकाला नोकरीवर ठेवतांना विचारलें, "पृथ्वी गोल आहे म्हणून तुम्ही शिकवाल कीं चौकोनी आहे म्हणून?" तो म्हणाला, "याबद्दल किंवा कशाबद्दलहि माझा मुळींच आग्रह नाहीं. तुमचें टाऊन कौन्सिल बहुमतानें जें नक्की करील तें शिकविण्यास मी तयार आहें." अशा लोकांच्या हातून काय समाजसेवा होत असेल तें एक ब्रह्माच जाणे!

पत्रकाराशिवाय एक नवीन वर्ग समाजांत उत्पन्न होण्याची आवश्यकता आहे. आपापल्या विषयांत किंवा क्षेत्रांत जी जी प्रवृत्ति चालली असेल, जें साहित्य प्रसिद्ध झालें असेल, नवीन शोध झाले असतील, निर्णय ठरले असतील, वाद उद्भवले असतील, नवनवीन नमुने जन्माला आले असतील त्या सर्वांचा वार्षिक संग्रह करण्याचें काम कोणीतरी आपल्या शिरावर घेतलें पाहिजे. सामाजिक जीवनाचीं कित्येक उपांगें जरूर अशीं आहेत कीं ज्यांच्यासाठीं साप्ताहिक काय पण स्वतंत्र मासिकपत्र देखील चालवितां येणार नाहीं, तरीहि ज्यांच्या-विषयींची माहिती सामान्य वर्तमानपत्रांत यदृच्छया येऊन विखुरलेली पडून राहील तर तें चालणार नाहीं. 'वार्षिक' काढणारा कोणी मनुष्य असेल तर कांहीं लोक अशा माणसाकडे त्या त्या विषयाची सामग्री अवश्य धाडून देतील.

साहित्यचर्चा करणाऱ्या नव्हे तर जुन्या नव्या सर्व प्रकारच्या ग्रंथांचा संक्षिप्त परिचय देणाऱ्या एखाद्या मासिकाला गुजरातींत अवश्य स्थान आहे. असें मासिक विद्यार्थ्यांच्या आणि सामान्य जनतेच्या दृष्टीनें खूपच मौल्यवान् ठरेल आणि साहित्याचा इतिहास लिहितांना तर त्याच्या सेवेचा किती फायदा होईल हें सांगावयास नकोच. मॅझिनीची साहित्यसेवा अशा प्रयत्नापासूनच सुरू झाली होती हें पुष्कळांना ठाऊक आहे. अशा मासिकांत फक्त गुजराती साहित्याचाच परिचय यावा असें नाहीं तर गुजराती

साहित्याला मुख्य ठेवून हिंदुस्तानांतील इतर साहित्यांना देखील यथाप्रमाण स्थान देतां येईल.

सामान्य वाचक वर्तमानपत्रें आणि मासिकें यांच्या चाकोरीबाहेर जातात ते कथाकादंबऱ्यांत उतरण्यासाठींच. अशी स्थिति जोंपर्यंत आपल्या देशांत आहे तोंपर्यंत साऱ्या दुनियेची माहिती तिच्या पूर्वापर संबंधासहित देण्याची व्यवस्था लोकशिक्षणाच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. जग कोठें कोठें पसरलेलें आहे, तेथें काय काय चालतें, प्रत्येक देशाचीं काय काय दुःखें आहेत आणि दुनिया कोठपर्यंत येऊन पोहोंचली आहे याची कल्पना आपल्या लोकांना असलीच पाहिजे. यांतहि आपण पुष्कळ अंशीं परावलंबी राहावयाचेच. तें अपरिहार्य आहे. तरीहि आपल्या दृष्टीनें प्रत्येक वस्तूचें प्रमाण आणि महत्त्व नक्की करून लोकशिक्षणाचें काम सुरू हें केलेंच पाहिजे.

तीस कोटि गुलामांच्या राष्ट्रांत आपलें वृत्तविवेचन पुष्कळ अंशीं इंग्रजींतच चालतें, समर्थ लेखक इंग्रजीकडेच धाव घेतात; आणि ज्यांच्यासाठीं ही सर्व खटपट चाललेली असते त्यांना या सर्व खटपटीच्या फळापासून वंचित रहावें लागतें ही किती शरमेची स्थिति आहे! या शरमेकडे ध्यान जात नाहीं, ध्यान खेंचलें तरी खरी गोष्ट गळीं उतरत नाहीं, यापेक्षां जास्त केविलवाणी स्थिति कोणती?

देशी भाषेंत जीं पत्रें चालतात त्यांच्यामागें तयारी अशी फारच थोडी असते. पत्रकारांना अत्यंत आवश्यक असलेली माहिती समजेल अशा स्वरूपांत ज्यांत दिली आहे अशीं पुस्तकें आपल्या भाषेंत नाहींतच असें म्हटलें तरी चालेल. 'इंडियन ईयर बुक', 'ॲन्युअल रजिस्टर', 'हू इज हू', 'पीअर्स सायक्लोपीडिया', 'कमर्शियल ॲटलास', 'हँडबुक ऑफ कमर्शियल इन्फर्मेशन' वगैरे सर्वोपयोगी साधीं पुस्तकें देखील अजून देशी भाषेंत तयार झालेलीं नाहींत. यामुळें व योग्य अभ्यासाच्या अभावामुळें देशी वर्तमानपत्रें इंग्रजी वर्तमानपत्रांचे फक्त टीपकागद बनून गेलीं आहेत!

एवढी प्राथमिक तयारी देखील जेथें नाहीं तेथें अमुक एका विषयाची

मराठी ग्रंथ संग्रहालय

किंवा घटनेची खात्रीलायक हकीगत मिळविण्यासाठीं खास बातमीदार धाडण्याची, वर्तमानपत्राच्या वतीनें तपाससमित्या नेमण्याची गोष्टच कोठली ?

वृत्तविवेचनावर जगणारा आणि वृत्तविवेचनाला पोसण्याचें ढोंग करणारा एक भारी रोग म्हणजे जाहिराती. सार्वजनिक नीति बिघडविणारी आणि कौटुंबिक अर्थशास्त्र कोलमडून पाडणारी ही अनीति इतकी कांहीं पसरली आहे कीं 'नवजीवना'मार्फत गांधीजींनीं तिचा जो इतका जबरदस्त आणि सक्रिय विरोध केला आहे त्याचा कांहींच प्रभाव इतर वर्तमानपत्रांवर पडलेला दिसत नाहीं. वर्तमानपत्रांत इतक्या हीन जाहिराती जेव्हां मी पाहतों तेव्हां मनांत विचार येतो कीं प्रभुसेवेसाठीं एखादें उत्तम देवमंदिर बांधून नंतर त्याचा खर्च चालविण्यासाठीं त्याच्या आवारांतील खोल्या दारूच्या गुत्त्यांना व वेश्यांना भाड्यानें देण्यासारखेंच नाहीं का हें ?

## ४

पत्रकाराचा धंदा अथवा वृत्तविवेचन हें आपल्याकडे युरोपमधून आलेलें आहे. मुलें ज्याप्रमाणें त्यांचें चरित्र आणि आदर्श नक्की होईपर्यंत आपल्या आईबापांचें किंवा गुरूचेंच अनुकरण करतात त्याप्रमाणें आतांपर्यंत आपण विलायती 'जर्नालिझम्'चें अनुकरण केलें. अमेरिकन पद्धति दाखल करण्याचेहि प्रयत्न सुरू झाले आहेत. अजून अनुकरणाचा काळ पूर्ण झाला नाहीं काय ? स्वतंत्र व्यक्तित्व बनविण्यासारखें आपल्या राष्ट्रांत कांहीं नाहींच कीं काय ? जर आपल्याजवळ सांस्कारिक व्यक्तित्व असेल, जर आपल्यांत अस्मिता जागृत झाली असेल, तर तिला ओळखण्याची, अंगीं बाणविण्याची व प्रकट करण्याची वेळ आतां आलेली नाहीं काय? आपला प्रश्न कांहीं फक्त राजकीय नाहीं. तो जर नुसताच राजकीय असता तर तो कधींच सुटला असता. ज्याप्रमाणें जगांतील सर्व धर्म या देशांत गोळा झाले आहेत त्याप्रमाणें जगांतील जवळ जवळ सर्वच प्रश्न या देशांत जमा होऊं लागले आहेत, झाले आहेत. अजून कांहीं राहिले असल्यास तेहि गोळा होणार आहेत. सर्व बाजूंनीं पुराच्या पाण्यानें वेढलें असतां किंकर्तव्यमूढ लोक ज्याप्रमाणें उंचांत उंच जागा शोधतात त्याप्रमाणें दुनियें-

तील सगळे सवाल– धर्माधर्मांतील, जातीजातींतील, सामाजिक, आर्थिक, शिक्षणाविषयक सर्वच सवाल– या देशांत गोळा होऊं लागले आहेत आणि त्यांची चर्चा करण्याचें कर्तव्य वर्तमानपत्रकारांच्या नशिबीं आलें आहे. पत्रकार झाला म्हणजे कांहीं तो विचारक झाला असें होत नाहीं; तरीहि त्यानें प्रत्येक प्रश्नाचें स्वरूप आणि गांभीर्य बरोबर समजून घेतलें पाहिजे आणि श्रेष्ठ विचारकांनीं त्यांचेसाठीं काय काय उपाय सुचविले आहेत किंवा योजिले आहेत त्याचें सूक्ष्मपणें अध्ययन केलें पाहिजे आणि त्यानंतर यथाशक्ति यथामति देशासमोर ते रुजू केले पाहिजेत. आपल्या जीवनांत आणि इतिहासांत, आपल्या धर्मांत आणि आपल्या समाजरचनेंत त्याच बाजूनें उपयोगी असें काय काय आहे हेंहि तपासून तें जगासमोर ठेविलें पाहिजे.

ही गोष्ट सोपी नाहीं. दीर्घ वाचनानें मनुष्यांत विद्वत्ता येईल; पण शुद्ध आणि उच्च जीवनाशिवाय दिव्य दृष्टि आणि अढळ श्रद्धा येत नाहीं. आजचा काळच असा आहे कीं जितकें चढणें शक्य असेल तेवढें चढणें जरूर आहे. सैतान जवळ जवळ शिरजोर होऊन बसलाच आहे. त्याचेवर मात करण्यासाठीं देवसेना सज्ज होण्याची जरूर आहे. अशा या प्रसंगीं पत्रकार कोणतें कार्य करणार हाच आज त्यांच्यापुढें मोठा प्रश्न आहे.*



*अमदाबाद येथें भरलेल्या पत्रकार परिषदेपुढें वाचलेला निबंध. नोव्हेंबर, १९२४.

## जुन्या शेताची नवी नांगरणी : : १३ :

एका म्हाताऱ्यानें आपल्या शेवटच्या घडीला मुलांना सांगितलें कीं आपल्या शेतांत खूप खोलवर द्रव्य पुरून ठेवलेलें आहे. मुलांनीं सारें शेत खणून काढलें तरी पण कुठेंहि द्रव्य मिळालें नाहीं. पण त्या वर्षी पीक मात्र इतकें कांहीं चांगलें आलें कीं त्यापुढें पुरलेलें द्रव्य जरी मिळालें असतें तरी तें तुच्छ समजलें गेलें असतें. खोलवर केलेली नांगरणी फळास आली.

समाजामध्यें सामान्य लोक जोंपर्यंत विचारक्षेत्राची नांगरणी वरून-वरूनच करीत असतात तोंपर्यंत सामाजिक जीवन प्राकृत आणि क्षीणच राहतें. जेव्हां जेव्हां धैर्यवान् लोकांनीं त्या म्हाताऱ्याच्या मुलांप्रमाणें विचारक्षेत्र खूप खोलवर खोदलें आहे तेव्हां तेव्हां विचाराचें पीक अपूर्व आलेलें आहे. श्रीकृष्णांनीं एकदां असें केलें होतें. त्यामुळें भारतीय विचार-सागरांत इतकी भरती आली. बुद्ध भगवानांनीं आत्मप्रतीतीपेक्षां भिन्न असें कोणतेंहि प्रमाण मानण्याचें नाकारलें. आणि म्हणून आर्यसंस्कृतीच्या

ज्ञानाग्नीवर सांचलेली राख उडून गेली व आर्य विचारराशि चकाकूं लागला. फ्रान्सच्या डिडेरो आणि इतर विश्वकोशलेखकांनीं मनुष्यसमाजाचा आधार कोणकोणत्या तत्त्वांवर आहे हें नांगरून पाहिलें आणि युरोपांत क्रांति होऊन सामान्यवर्ग स्वतंत्र झाला. मार्टिन ल्यूथरनें आपल्या वेळची धर्मव्यवस्था धगधगत्या अग्नीमध्यें फेकून दिली; तेव्हां समाजधर्माची घाण साफ होऊन स्वाभाविकता प्रतिष्ठित झाली. याप्रमाणें जेव्हां जेव्हां मनुष्य अंधपरंपरेला फेकून देऊन लहानमोठ्या प्रत्येक पदार्थाला कोऽसि ? तस्मिंस्त्वयि किं वीर्यम् ? असे सवाल विचारण्याची हिंम्मत करतो तेव्हां धर्मसंस्करण होतें, जनतेंत नवें बळ येतें, विद्वानांना नवी दृष्टि मिळते आणि या दृष्टीचा प्रभाव चौदा विद्या आणि चौसष्ट कळा यांवर पडतो.

आज हिंदुस्तानांत अशाच तऱ्हेची तत्त्वजिज्ञासा, धर्मजागृति आणि कर्मविचिकित्सा प्रज्वलित झाली आहे. प्रत्येक वस्तूचें रहस्य आपण शोधतों; जीवनाचें परम रहस्य पुन्हा नव्यानें समजून घेऊन तें आचरणांत आणूं इच्छितों; नवीन समाजव्यवस्था आणि नवीन आचारविधींच्या द्वारा आपण तें समाजांत दाखल करूं पाहतों, आणि हा नवीन प्राण धारण करून आपण विचारांच्या विश्वावर शुद्ध सात्त्विक दिग्विजय मिळवूं इच्छितों.

आज कृष्ण आणि शंकराचार्य, बुद्ध आणि महावीर, चैतन्य आणि नानक, मेसाया आणि महादी सर्वच नवे नवे अवतार धारण करणार आहेत; नवनवीन रूप धारण करणार आहेत. कदाचित् ते एकरूप पण होतील; कदाचित् एकच अनेक रूपें धारण करील कारण आपण विचारसागराचें मंथन करण्याचा प्रयत्न करीत आहोंत.

—१९१९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५१९८
REFBK-0015198